REGISTERED No. N.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ॥

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंकास....................२ आणे

नोटिशी बद्दल

१० ओळींचे आंत ह० १

दर ओळीस..........॥१ ०॥

दुसरे खेपेस.... ......॥१

Mofussil ... ... ... 2 ( With posting

All Subscriptions to be paid in advance.

Single copy ........................ 2 as

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......3 as

Repetitions Per line :2 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 5 SEPTEMBER 1904 NO 35

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ५ माहे सप्तेंबर सन १९०४ इ० अंक ३५

दि कि. क्रा. नं. २१

मु. नंबर ४

——

१९०४

बिा सिव्हिल ज्यडज्य साहेब बाहादुर जि० आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार

लवजुबाई नवरे किसनलाल राहणार आकोलें जाहागिर तर्फे मुखत्यार मोतीराम कण्णीराम व अबाराव लक्ष्मणदास रहणार आकोलें जाहागिर.

या नोटिशीनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं वरील अर्जदार हीनें घोंथमल शीवनाथ दुकान कर्ता मयत किसनलाल कालुराम यांचे लोकांकडून येणें असलेलें कर्ज रुपये १७३०८।४॥१० वसूल करण्याबद्दल सरटीफिकीट मिळण्याकरितां ता० १८-८-१९०४ इसवी रोजीं अर्ज दिल्यावरून या अर्जाचे चौकशीची तारिख २४-९-१९०४ इसवीची नेमली आहे. तरी सदर्हू तारखेस अर्जदार हीचे ह्मणण्याप्रमाणें तीस सरटीफिकीट देण्यास ज्यांची हरकत असेल त्यांनीं वरील तारिखेस आमचे कोर्टांत आपले जवळ असलेल्या लेखी अगर तोंडी पुराव्यासह हजर राहावें.

आज तारिख २० माहे आगष्ट सन १९०४ इसवी रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं दिले असे.

Sk. Ismail

सिव्हिल ज्यडज्य.

आकोला.

---

नोटीस

बेशावी (१) बुढीबी (२) रतनबी } मर्द बुढनखा

राहणार ताजनापेठ, आकोला यांसः——

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यात येते कीं ताजनापेठेतील भाजीबाजारांत मशिदीच्या पूर्वेला आमचें वडिलार्जित राहतें घर आहे. माझा मऊ बुढनखा मेल्या नंतर घराबद्दल बायका बायकामध्यें तंटा होऊं नये ह्मणून मी तुह्मास त्या घरांत स्वतंत्र निराळें ठेविलें. आतां असें ऐकतों कीं तुह्मी तें घर येथील मुनसिपालिटीला विकणार आहां. त्या घरावर तुमची मालकी नाहीं. तुह्मी तें घर विकूं नये ह्मणून तुह्माला या नोटीशीनें आगाऊ सुचवित आहे. या उपर तुह्मी तें घर कोणास विकाल तर त्याची जबाबदारी तुह्मावर व विकत घेणारावर राहील. कळावें. तारिख २ सप्तेंबर सन १९०४ इ०

सही

जोरावरखा वल्द हिदायतखा सौदागर राहणार ताजनापेठ आकोला निशाणी खुद्द.

---

नोटीस

रा. रा. चुनीलाल बुलीदान मारवाडी दुकान वडाळी देशमुखाची ता० आकोट. यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं कन्हयालाल मोतीलाल साहु दुकान आकोट यांचीं शेती तुह्मी तुमचे नांवानीं आह्मांस निमे बटाईनें फसली सन १३१२ ला मला आणि दुसरे भागीदार यांस वहण्यास दिली आणि फसली सन १३१३ साली मनला ऐकट्यासच एक शेत वाहण्यास दिले. असे असतां आह्मी दोन्ही वर्षी माल तयार करण्याचे वेळीं कन्हयालालजी हे येऊन माल वेचून घेऊन गेले. आणि त्यांनीं असे सांगितले कीं माल सर्व गोळा झाला ह्मणजे आह्मी तुह्मांस सर्व माल तयार झाला ह्मणजे निम वाटून देऊं. त्या प्रमाणें त्यांनीं अद्याप पावेतों माल आह्मास वाटून दिला नाहीं हरहमेश ते ह्मणतात कीं चुनीलाल यांस घेऊन या ह्मणजे माल वाटून देतो. असे ते ह्मणतात तर तुह्मास नोटिशीनें कळविले जाते कीं तुह्मी त्यांचे दुकानीं जाऊन सर्व हिशोब करून आमचा निमे माल आमचे पदरांत घालावा. जर या प्रमाणें न झालें तर आह्मी तुमचे वर जी आमची नुकसानी होईल त्याबद्दल दावा करून या नोटिशीचे खर्चासुद्धां व नुकसानीसुद्धां सर्व पैसे भरून घेऊं कारण आमची जी नुकसानी होईल त्याबद्दल जबाबदार तुह्मी आहां ही नोटीस दिली. ता० १।९।०४

सही

बळीराम वा. मल्हारी पाटील राहणार किनखेड तालुके दस्तुर खुद्द.

---

जाहीरात

तमाम लोकांस या जाहीर लेखानें कळविण्यांत येतें कीं माझा कनिष्ठ भाऊ नामें गोविंदा वल्द श्रावणा कलाल राहणार हातें तालुका बाळापूर हा वेडा झालेला आहे. तो वेडाच्या भरांत वाटेल तें करितो. आणि यामुळें त्याजला कोणीही अनायासें फसवूं शकेल. तो आपल्याचपाशीं राहत आहे. तरी तो नजर चुकवून गांवांत हिंडतो व कधीं कधीं तरी दंगा सुद्धांहि करितो. तर कोणीहि त्याजपासून कांहीं लेख करून घेऊन याचा हात बांधून घेईल अगर कर्ज देईल किंवा खरेदी, गहाण, बक्षीस घेईल तर तो सर्व व्यवहार बातल होईल व असें करणारा मनुष्य फसेल. तो व्यवहार आमच्या कोणाच्या इरेटर्टीस बांधू शकणार नाहीं. ह्मणून मुद्दाम या जाहीर लेखानें कळविलें आहे. कळावें. तारीख २९।८।०४ इ.

सही

नागोसा वल्द श्रवणसा कलाल राहणार हातें. ता. बाळापूर पोस्ट शेगांव द. खु.

---

नोटीस

रा. रा. कन्हयालाल मोतीलाल मारवाडी दुकान आकोट यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची शेती मौजे किनखेड येथील चुनीलाल मारवाडी दुकान वडाळी याचे जवळून फसली सन १३१२ साली मी आणि दुसरे भागीनदार असें मिळून आणि १३१३ फसली साली मी एकट्यानेच एक शेत अशी दोन वर्षे निम्में बटाईने वाहण्यास साल फेडीनें घेतली आणि माल तयार झाला त्यावेळीं तुह्मी मनला माल आणूं न देतां असें सांगितले कीं सर्व माल तयार होई पावेतों आह्मी आमचेपाशीं अनामत ठेवितो आणि नंतर आपण निम्मे निम्मे वाटून घेऊं. सदरहु बोली चुनीलालचे मंजुरांतीनें झाली नसून तुह्मी तुमचे मुखत्यारीनें केली तुमची आणि चुनीलालची काय भानगड आंतली आहे हे आह्मांस मुळींच समजलें नाहीं. तुह्मी वरील शेताचे मालक असल्यामुळें आह्मीहि तुमची तकरार कबूल करून करून सर्व माल तुमचे घरीं जमा करण्यास तुह्मांस परवानगी दिली त्याप्रमाणें तुह्मी माल सर्व आपले दुकानांत न ठेवितां बुलीदान यांचे मारफत त्यांचे दुकानांत जमा केला तर आह्मी आमचे निम्मे बटाईचा माल अगर रुपये तुह्मांस अनेक वेळां हिशोबानें जे होतील तें मागितले असतां तुह्मी आह्मांस चुनीलालची खबर दाखवितां तर या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आजपासून आठ दिवसांत आमचा दोन वर्षाचा पिकाचा हिशोब करून आमचा निम्मे बटाईचा माल आह्मांस देऊन आमची पावती घ्यावी. या प्रमाणें तुह्मी न केल्यास आह्मी तुमचे वर दिवाणी फिर्याद करून या नोटिशीचा खर्च व दिवाणी कोर्ट खर्च वगैरे रकम वसूल करून घेऊं. ही नोटीस दिली असें. कळावें. तारीख १।९।०४ इ.

सही

बळीराम वा॥ मल्हारी पाटील रा. किनखेड ता. आकोट पोस्ट—दहिहांडा द. खु.

---

नोटीस

रा. फुटुजी वल्द लक्ष्मण गावंडे रा० सुईखेड ता० आकोट यांसीः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास सुमारे १२ वर्षे झालीं, मी अज्ञान असल्यामुळें मी आपले आईबापाचे घरीं होते. मजला तुह्मी नेले नाहीं. माझा बाप सुमारे ६ वर्षे झालीं मरण पावला असून आई तेव्हांच दुसरा घरठाव करून गेली. त्यामुळें मजला कोणाचाच आधार नाहींसा झाला. बाप मयत झाल्यावर माझे आईचा मामा नामें कुकाजी व. रेवाजी तराळे राहणार पाथरडी ता० आकोट यांनें माझें पालनपोषण केलें. हल्लीं मी वयांत येऊन सुमारे ३ वर्षे झालीं. मजला कळू लागल्यामुळें सदर्हु कुकाजीनें मजला तुमचे घरीं आणून घातलें त्यावेळीं तुह्मी मजला वागवीत नाहीं ह्मणून सांगून घरांत सुद्धां येऊं दिले नाहीं तेव्हांपासून मी कुकाजीचे घरी राहिली. हल्लीं कुकाजीचे मजकडे खानेपिणें व कपडा या संबंधानें १५० रुपये कर्ज झालें आहे. मी तुमचे येथें नांदण्यास तयार आहे करितां या नोटिशीनें तुह्मांस कळविले जात आहे कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून एक महिन्याचें आंत सदर्हु कुकाजी यांचे १५० रुपये कर्ज देऊन त्याची पावती मजला आणून देऊन मजला तुह्मी घेऊन जावें त्याप्रमाणें तुह्मी न केल्यास तुमचा लग्नाचा हक्क कांहीं मजवर राहीला नाहीं असें समजावें. सदर्हू कर्जाची फिर्याद करून तुमचे पासून खर्चसुद्धां रुपये घेतले जातील आणि ही नोटीस फारकत असे समजून मुदत संपतांच दुसरा घरठाव केला जाईल मग तुमचा मजवर कोणतेच प्रकारचा हक्क संबंध राहणार नाहीं. हे समजावें कळावें ता० १।९।०४

सही

भिकी मर्द फुटुजी निशाणी हातची बांगडी.

---

जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं माझ्या मालकीचें राहतें घर ताजनापेठेंत भाजी बाजारांत मशिदीच्या पूर्वेला आहे. त्या घरांत माझ्या भावजया नामें बुढीबी व रतनबी या राहतात तर तें घर कोणी मला विचारल्या शिवाय गहाण खरेदी वगैरे घेऊं नये. कळावें ता० २।९।०४ इ०

सही

जोरावरखा वल्द हिदायतखा सौदागर राहणार ताजनापेठ आकोला निशाणी खुद्द.

### नोटीस

सुरजमसाद वल्लद बिहारीलाल कलाल राहणार खोलापूर तालुका व जिल्हा उमरावती यांस:—

खालीं सही करणार याजकडून ह्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं; मौजे चेंडकापूर ता. दर्यापूर येथील शेत सर्वेनंबर २५३ एकरगुंठे १३८६ आकार रुपये ३० खातेदार चिपडाजी वा बापुजी हें शेत आमचे जवळ फरोक्त आहे. हें तुह्माला माहीत असून व आह्मी तुह्माला वेळोवेळीं सांगितलें असून तुह्मी फरोक्त घेतलें असें समजतें. सदरीलचें शेत आमचे कबज्यांत आहे तरी ह्या शेतावर तुमची मुळींच मालकी पोंचत नाहीं. या नोटिशीचा खर्च तुमच्यावर आहे. कळावें. तारीख २।९।०४ इ.

सही
पुरुषोत्तम भगवंतराव देशपांडे
प्रगणें इलीचपूर व खोलापूर
तर्फे मुखत्यार बळवंतराव
कृष्णराव देशपांडे.

---

### जाहिरात

सर्वत्रांस ह्या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं, मौजे चेंडकापूर ता० दर्यापूर येथील शेत सर्वे नंबर २५३ एकर गुंठे १३८६ आकार रुपये ३० खातेदार चिपडाजी वल्लद बापुजी हें शेत आमचे कबज्यांत आहे ह्या शेताची लागवण वगैरे आमचे शिवाय दुसरे कोणाजवळून करूं नये. ह्या शेतावर दुसरे कोणाचीहि मालकी व हक्क वाबा नाहीं. कळावें ता० २ माहे सप्टेंबर १९०४ इ०

सही
पुरुषोत्तम भगवंतराव देशपांडे
प्रगणें एलिचपूर व खोलापूर
तर्फे मुखत्यार बळवंतराव
कृष्णराव देशपांडे.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती श्रावण वद्य १० शके १८२६

---

### कपाशीचा हंगाम

यंदा कापसाच्या पिकावर शेतकऱ्यांची मोठी भिस्त आहे. कपाशीचा पेरा एवढा मोठा पूर्वी कधींच झाला नव्हता. गुदस्तांच हा पेरा अत्यंत वाढला होता आणि या सालीं या वाढीला पराकाष्ठेचा ऊत आला आहे. एकंदर कपाशीचा पेरा ४० लक्ष ९३ हजार एकरांपेक्षां अधिक जमिनीवर झालेला आहे. गेल्या साला पेक्षां यंदा कपाशीचें क्षेत्र सरासरी षष्टांशानें वाढलें आहे. प्रथमतः जून महिन्यांत पाऊस वेळेवर पडला नाहीं. तथापि जुलै व आगष्टचा पहिला चरण यांतील पावसानें कपाशीचीं पिकें सध्यां उत्कृष्ट रंगारूपाला आलीं आहेत. कपाशीचें पीक ह्मणजे शेतकऱ्यांचा मेवा होऊन बसला आहे. कपाशीच्या पिकाला दगदग कमी असते, पीक फार जलदीं हातीं येतें आणि पाऊसही थोडा पुरतो. गेल्या वर्षी भावाची तेजी विलक्षण होती. या सर्व अनुकूळ गोष्टींनीं शेतकऱ्यांची सर्व ओढ कपाशीच्या पिकाकडे विशेष लागली आहे. वऱ्हाड, वर्धा, नेमाड, हुशंगाबाद, चिंधवाडा, बैतूल इत्यादि भागांत कपाशीचीं पिकें मी मी ह्मणत आहेत. या भावी ऐश्वर्याची व धनसमृद्धीची आशा शेतकऱ्याला वेडावून सोडीत आहे. पण अशा वेळीं परमेश्वराची कृपाच पाहिजे ह्मणजे पर्जन्याची अमृतवृष्टी होऊन ही गोडबोली आशा सत्यप्रतिज्ञ होईल.

---

### एकचित्त

आमच्या स्थानिक सरकारचा अभिप्राय असा आहे कीं पोलिस व माजिस्ट्रेट यांचा जितका एक विचार असावयाला पाहिजे तितका चांगलासा दृष्टीस पडत नाहीं. राज्यकारभाराच्या या दोन्ही अंगांचें एक चित्त नीटसें होत नाहीं ह्मणून अन्यायाचा दरवाजा खुला होतो इतकेंच नाहीं तर पोलिसाच्या कामाला फार विघ्नें येतात. ज्या लोकांचा धंदाच गुन्हे करण्याचा आहे अशा लोकांवर पोलिसांचा दरारा बसत नाहीं व गुन्हे कमी कमी होत नाहींत याचें कारण पोलिस व माजिस्ट्रेट यांच्या विचारामधील फांटाफूट होय असें स्थानिक सरकाराच्या नजरेस आणिलें आहे. गेल्या सालच्या पोलिस रिपोर्टांत या संबंधाचा मोठा उहापोह आहे आणि पोलिस खात्याचे इनस्पेकटर-जनरल यांनीं माजिस्ट्रेटांचा अध्यापकपणा आपल्याकडे घेतला आहे व त्यांचा हा श्रेष्ठपणा स्थानिक सरकारानें आंपल्या अभिप्रायानें बराच मंडित केला आहे. पुराव्याचें विवेचन कसें करावें या संबंधानें माजिस्ट्रेटांस शिकवावें असाच खरोखर प्रकार असेल तर हल्लींचे माजिस्ट्रेट आपल्या जागेला नालायक आहेत असाच या वादाचा भावार्थ निघतो. अशा योग्यतेचे माजिस्ट्रेट आमच्या प्रांतांत असल्या विषयीं आमचा अनुभव नाहीं आणि पोलिसाच्या कानमंत्रा शिवाय माजिस्ट्रेटाची गाडी चालत नाहीं असेंहि आमच्या पाहण्यांत क्वचितच येतें.

गेल्या सालच्या पोलिस रिपोर्टावरील ठरावांत असा एक उल्लेख आहे कीं पोलिसाचे खटले प्रत्येक जिल्ह्यांतील एका विवक्षित माजिस्ट्रेटाकडे पाठविण्यांत यावेत. हा मुद्दाम निवडावयाचा माजिस्ट्रेट अनुभवी व जोरदार असा असला पाहिजे अशी सूचना आहे. नामदार चीफ कमिशनर मि. ह्रेली यांची या सुचनेला मोठी हरकत एवढीच कीं अशी योजना केल्या पासून फौजदारी खटल्यांचा निकाल तावडतोब होणार नाहीं व इतर कामांच्या वांटणी बद्दल बऱ्याच अडचणी येतील. वरील सुचनेचा सारांश असा निघतो कीं पोलिसाला सांगकामी माजिस्ट्रेट पाहिजे, व त्या माजिस्ट्रेटानें पोलिसाच्या तराजूनेंच सर्व पुरावा जोखला पाहिजे. असे कुळसूत्री माजिस्ट्रेट पोलिसाच्या हातीं फारसे नाहींत हें पोलिसाचें दुर्भाग्य खरें पण रयतेचें व न्यायदेवतेचें सुदैव होय !

आमच्या मतानें पोलिसाच्या इन्स्पेक्टर जनरलला माजिस्ट्रेटाच्या कामावर टीका करण्याचा मक्ता कोणी दिलेला नाहीं. या बाबदींत स्थानिक सरकारला देखील टीका करण्याचा अधिकार फारच अल्प असला तर असेल असें आह्मांस वाटतें. माजिस्ट्रेटांनें चुकी केली तर त्याच्या निकालावर हायकोर्टापर्यंत अपिल कोर्टें आहेत. हीं अपिल कोर्टें माजिस्ट्रेटाच्या निवाड्यावर यथायोग्य टीका करितील आणि कायद्यानें प्रणीत केलेल्या उच्चतर अधिकारा पुढें माजिस्ट्रेटाला आपले हात जोडावे लागतात पण बाकीच्या कोणाही माणसा पुढें त्याला जी हुकूम ह्मणण्याची गरज नाहीं. न्यायासनावर असतांना त्याची सत्ता पोलिसावर व स्थानिक सरकारावर सारखीच चालते. पोलिस रिपोर्टांत माजिस्ट्रेटावर टीका येऊं दिली आणि स्थानिक सरकारानें तिला प्रोत्साहन दिलें ही गोष्ट वाईट होय. अशा रितीनें पोलिसाचा दरारा माजिस्ट्रेटांवर बसेल हें निर्विवाद आहे पण त्या पासून अर्था पेक्षां अनर्थच अधीक ओढवतील. पोलिस खात्यामध्यें जितक्या सुधारणा पाहिजेत तितक्या निदान माजिस्ट्रेटांच्या वर्गांत नको ही गोष्ट मुद्दाम बसविलेल्या पोलिस कमिशनाच्या रिपोर्टावरून स्पष्ट दिसणारी आहे. सध्यांच्या स्थितींत पोलिसांला शिकविण्याचा अधिकार माजिस्ट्रेटाकडे आहे, आणि माजिस्ट्रेटांच्या निकालांपासून पोलिसांनीं पुष्कळशा गोष्टी शिकल्या पाहिजेत. पोलिस खात्यांत चांगले लोक चाकरी धरीत नाहींत तोंपर्यंत हें खातें असेंच निंदेला पात्र राहील इतकेंच नाहीं तर त्यांचे खटले माजिस्ट्रेटांच्या समोर टिकणारही नाहींत माजिस्ट्रेटावर रागावण्यापेक्षां आमचे इनस्पेक्टर- जनरल आपलें खातें चांगलें सुधरतील तर त्यांचा लोकांवर मोठा अनुग्रह होईल.

माजिस्ट्रेट व पोलिस यांचें एकचित्त होण्यासाठीं डिस्ट्रिक्ट- माजिस्ट्रेटानें उत्कृष्ट देखरेख ठेवावी ह्मणून स्थानिक सरकारानें आपला अभिप्राय प्रदर्शित केला आहे. या अभिप्रायाची दिशा पुष्कळच चुकली आहे जिल्हा- माजिस्ट्रेटांची देखरेख चांगली खरी पण ती पोलिसाला संतुष्ट करण्यासाठीं नसली पाहिजे. माजिस्ट्रेटाच्या चुक्या काढणें ही गोष्ट निराळी आणि पोलीस त्या माजिस्ट्रेटाला नाराज होतात ह्मणून त्याच्यावर कडक नजर ठेवणें ही गोष्ट अगदीं निराळी. हा दुसरा प्रकार अत्यंत गर्हणीय आहे आणि त्याच्यामुळें जुलूम होण्याचा मोठा संभव असतो.

वरील जुलमाचीं उदाहरणें आमच्या प्रांतांतच काय पण सर्वत्रच दृष्टीस पडतील. गेल्याच महिन्यांत मद्रास सरकारानें त्रिचनापल्ली येथील जिल्हा माजिस्ट्रेटाची बढती तीन महिने बंद ठेविली, पोलिस सुपरिनटेंडेंटाचा एक वर्ग कमी केला आणि सब माजिस्ट्रेटाची माजिस्ट्रेटी काढून घेतली. या गोष्टी करण्याला कारण असें घडलें कीं त्रिचनापल्लीच्या सब माजिस्ट्रेटानें पोलिसा विरुद्ध कांहीं टीका केली. ती टीका सुपरिंटेंडंटच्या कानावर गेली व त्यांनीं जिल्हा माजिस्ट्रेटाकडे धांव घेतली. अखेर निकाल असा झाला कीं सब-माजिस्ट्रेटांनीं पोलिसाची माफी मागावी, आणि ती देखील जिल्हा-माजिस्ट्रेटाच्या बंगल्यावर न मागतां भर कोर्टांत मागितली पाहिजे असा हट्ट सुपरिंटेंडंटांनीं धरला. तो हट्ट शेवटास गेला ! सब माजिस्ट्रेटाला चाकरीची आशा मोठी होती ह्मणून त्यानें माफीचा हुकूम कबूल केला. सुपरिनटेंडंट आपल्या लवाजम्यानिशी कोर्टांत आले आणि सब-माजिस्ट्रेटांनीं मोकळा कंठ करून माफी मागितली. पुढें ही गोष्ट स्थानिक सरकाराला कळली तेव्हां जिल्हा-माजिस्ट्रेट, सुपरिनटेंडंट, व सब-माजिस्ट्रेट या तिघासही दोष देण्यांत आला पण पहिल्या दोघांच्या पातका साठीं त्यांस सौम्य शिक्षा दिल्या पण सब माजिस्ट्रेटाची माजिस्ट्रेटी हिरावून घेतली. हा न्याय संन्याशाला फांशी देण्याच्या गोष्टी प्रमाणेंच होय.

वरील उदाहरणावरून लक्ष्यांत येईल कीं डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाकडे आणखी नवी देखरेख निःसंशय नको. त्यांची देखरेख प्रस्तुत आहे तीच मोठी आहे. पोलिस व माजिस्ट्रेट यांचें एकचित्त करण्यासाठीं जिल्हा—माजिस्ट्रेटाच्या हातीं नवीन अधिकार बिलकूल असतां कामा नये. पोलिसाच्या आवडीचा ह्मणून अनुभवी व जोरदार असे माजिस्ट्रेट निराळे वगळून काढण्याची संधी जिल्हा— माजिस्ट्रेटाला कधींही देण्यांत येऊं नये. पोलिस रिपोर्टांत माजिस्ट्रेटा संबंधाचा कल्लोळ प्रसिद्ध न होईल असाच बंदोबस्त स्थानिक सरकारानें मुद्दाम केला पाहिजे. वार्षिक रिपोर्टांची जागा अशा वादविवादाला योग्य स्थळ नाहीं असें आमचें मत आहे आणि तें दर्शविण्याचा आमचा संकल्प आमच्या प्रांतिक वहिवाटीला अनुसरूनच आहे. वार्षिक रिपोर्टांत अशा वादग्रस्त गोष्टी येऊं नयेत ह्मणून सर फ्रोडन यांनीं पूर्वीच नियम घालून दिलेला आहे आणि तोच नियम अनुकरणासाठीं नामदार चीफ कमिशनर यांच्या समोर आज मांडला आहे.

---

### मोहक आपदा

मदिरा पानाचें व्यसन अत्यंत निंद्य होय अशा बद्दल द्विधा मत असेल असें संभवत नाहीं. परंतु मदिराभक्तांनीं तिचे गुण फार रसाळ वाणीनें वर्णिलेले आहेत, व ते गुण वर्णन करितां करितां ते अगदीं देहभानहि विसरून जातात इतकी त्यांची तिच्या ठायीं तल्लीन वृत्ति होते. मदिरा ही एक समुद्रांतून मंथन करून काढलेल्या चतुर्दश रत्नांपैकीं एक होय. तिच्या सेवेंत क्षणैक ब्रह्म-

सुखाचा आनंद प्राप्त होतो. हिच्या प्राशनानें मनास फार हुषारी वाटते, काम करण्यास हुरूप चढतो व सर्व दुःखें विलयास जातात. पण ह्या गुणसमुच्चयास कोणी भुलूं नये. ह्या व्यसनाच्या आधीन मनुष्य झाला ह्मणजे तो जन्माचा तिचा बंदा गुलाम झालाच. हिच्या पायीं लाखो रुपयांचा चूर झाला आहे. हिच्या कृपा प्रसादानें अनंत कुटुंबें रसातळास पोंचलीं आहेत. हिच्याच मदुमकीमुळें कित्येक राष्ट्रें राज्यक्रान्तीच्या भोंवऱ्यांत पडलीं आहेत. ही अकाबाई जेथें वास करील तेथें अ.घा. फेरा पुरा गाजविल्या खेरीज कधींहि राहणार नाहीं. हिच्या त्या नेत्रकटाक्षांत कोणीहि न सांपडो! परंतु खुद्द आपल्याच हिंदुस्थान देशांत ह्या मदिरादेवीचें प्राबल्य आहे फार ही मोठी दुःखाची गोष्ट होय! हें उंटाचें पिलूं वरांत शिरल्या पासून त्यानें फार नासाडी मांडली आहे. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं सर्वत्र व्याख्यानें, सभा व नियमनें होत आहेत. हें व्यसन ह्मणजे हिंदुस्थानास पोखरून दरिद्री करणारा भुंगाच आहे. हें खरें स्वरूप आपल्या लक्ष्यांत अद्याप येत नाहीं इतकेंच नाहीं तर आपलें सरकारचें मत याच्या अगदींच उलट आहे.

वर्षाच्या वर्षास अबकारीचे हरास होतात तेव्हां ह्या हरसाच्या रकमा दांडग्या प्रमाणानें वाढत असतात ही गोष्ट चांगली महशूर आहे. हें खरें ह्मणजे सरकारास एक पैशाची खाणच होय. ह्या हरासांचे आंकडेनोडी वरून सरकारी रिपोर्ट बाहेर पडत असतात कीं, ही वाढती रक्कम ह्मणजे देशाच्या वाढत्या संपत्तीचें सुचिन्ह होय! प्रत्येक वर्षी ह्या रिपोर्टांत लोकांच्या सुखसंपत्तीची अशा रीतीनें नोंदच केलेली असते. सालोसाल ह्या ठरीव नोंदींत बिलकुल फरक पडत नाहीं. अबकारी उत्पन्नाची वाढ ह्मणजे प्रजेची सुस्थिती हा जो सरकारी पक्का विचार तो फार घातुक व चुकीचा आहे असें आह्मी प्रत्येक वेळीं स्पष्ट सांगितलेलेंच आहे. पण सरकारी विचाराचा हट्टीपणा फार दुर्भेद्य होय. परंतु खुद्द विलायतेंत नुकतीच एक शास्त्रीय कमेटी सरकारानें नेमिली होती. ह्या कमेटी चें मत अगदीं स्पष्ट आहे कीं, "मदिरापानाच्या व्यसना मुळें देश दारिद्री होतो व हें दारिद्र्य एक सारखें वाढत जातें. लोक जें मद्य पितात तें कांहीं हौसेनें किंवा चैनीनें पीत नाहींत तर पोटाची आग शांत करण्यासाठीं तिचें सेवन करणें त्यांस प्राप्त होतें.

ह्या शास्त्रोक्त रीतीनें सिद्ध झालेल्या गोष्टीनें तरी सरकारास आमची दीन स्थिती कळो व लोकांच्या संपदेचें हें चिन्ह नसून सर्व राष्ट्रास आपत्तींत ओढणारें संकट होय अशी त्यांची पूर्ण खात्री होवो ह्मणजे झालें.

---

( आमच्या एका मित्राकडून )

जीवित्व तें किती। हेंचि धरितां बरें चित्तीं।
संत सुमनें उत्तरें। मृदु रसाळ मधुरें।
विसावतां कानीं। परिपाक घडे मनीं।
तुका ह्मणे जोडी। हेचि जतन रोकडी।

या तुकारामाच्या अभंगावर रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनी हायकोर्ट वकील यांचे येथें गेल्या रविवारीं व्याख्यान झालें. आत्मनिरीक्ष करण्याचा अभ्यास तुकाराम विशेष करीत असत तेव्हां स्वकीय दोष घालविण्याचा उत्तम उपाय ते असा सांगतात कीं महान् महान् पंडिताच्या अजरामर ग्रंथसमुच्चयाचें निरीक्षण करावें, संतांचीं वचनें अल्पकालिन आयुष्यांत होतील तितकीं सांठवावीत, परोपकार करीत असावें इत्यादि गोष्टीला धरून व्याख्यात्यांनीं उपदेश केला. त्या नंतर अध्यक्ष रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं आपल्या गोड वक्तृत्वानें लोकांस आनंदित केलें पण अभंगाचा अर्थ उभयतांच्या संभाषणांत चांगलासा सुगम व विषद झाला नाहीं असा लोकांचा आक्षेप आहे.

वरील अभंगांत तुकारामांनीं लोकांस उपदेश केला आहे कीं, अहो जनहो, तुह्मी आपलें जीवित्व ( आयुष्य ) किती आहे ( अत्यल्प आहे ) ही गोष्ट मनांत सदोदित वागवा. भावार्थ काय कीं, मनुष्याचें आयुष्य फार थोडें आहे ह्मणून त्यांतील एक क्षणहि व्यर्थ न घालवितां त्याचा सदुपयोग करावा. पुढें काय केलें असतां आयुष्याचा सद्व्यय होईल याचा उलगडा तुकारामांनीं पुढील चरणांत सांगितला आहे. पुढील दोन चरणांचा अन्वयार्थ असा आहे— मृदु, ( कोमल ) रसाळ ( रसभरित ) आणि मधुर ( गोड, कर्णप्रिय ) अशीं उत्तरें ( बोल, उक्ती ) हींच कोणी सुमनें ( पुष्पें ) हीं जर संत ( साधु जनांनीं ) कानीं विसांवितां ( कानांत ठेविलीं ) तर मनीं परिपाक घडे ( ह्मणजे हीं सुबोध वचनें संतांच्या मुखांतून ऐकिलीं असतां तीं चांगलीं ठसतात, मनांतल्या कुकल्पना दूरावतात व तें मन सुसंस्कृत होतें. )

साधूचीं वचनें आधींच फार मृदु, रसाळ आणि मधुर आणि तींच त्यांनीं आपणास स्वमुखांनीं सांगितलीं व आपण चांगलीं ऐकिलीं तर त्यांचा परिणाम मनावर अति उत्कृष्टच होणार हें निराळें सांगणें नकोच. ह्या वचनामृतानें मनुष्याच्या चंचल मनःप्रवृत्तींचा अंकूर सत्कर्माकडेच ओढ लाऊं लागतो.

ह्मणून तुकाराम बोवा सांगतात कीं, जोडी ( जोडा, सत्संगती मिळवा, त्यांचा उपदेश घ्या ॥ सद्गुरु वांचोनी सांपडेना सोय। धरावे ते पाय आधीं आधीं॥ आणि हें तुह्मी केलें ह्मणजे जीविताचें सार्थक झालें. हीच रोकडी जतन होय. ह्मणजे ही ह्या जन्मांतील उत्कृष्ठ ऐन ठेव होय. आपणास ह्या एका अत्यल्प जीवितामध्यें जर कांहीं चांगला संचय करून ठेवावयाचा असेल व आयुष्याचा सदुपयोग करावयाचा असेल तर तो संतवचनामृताचें पान करण्यानेच साध्य होणार आहे.

साधारणतः मनुष्यास ह्या आयुष्यांतील कर्तव्य कर्म ह्मणजे खूप धनसंचय करणें हें होय असें वाटतें व तो या समजुती प्रमाणें नगदी रोकड पैसा जमा करण्यांत आपलें सर्व आयुष्य वेंचतों असा सर्वांचा अनुभव आहेच. पण खरोखरी ह्यामुळें आयुष्याचा सद्व्यय होत नाहीं. पुढील जन्मासाठीं हा द्रव्यनिधी आपणांस उपयोगीं पडत नाहीं. पुढील जन्मासाठीं जी रोकडी जतन ठेवावयाची ती ही:— पवित्र निर्मल मन आणि ह्या मनानें सत्कृत्याकडे घेतलेला ओढा— आणि हाच ठेवा उत्तरत सन्मार्गाचा सोपानपंथ निरंतर चढण्यास मनुष्यास सहाय्यभूत होईल. 'हेंचि दान देगा देवा, संतसंग देईं सदा' अशा अर्थाचीं वचनें तुकारामांच्या अभंगांत पुष्कळ ठिकाणीं आहेत. एवंच 'सत्कर्मे योगें वय घालवावें' असा उपदेशाचा मंत्र तुकारामांनीं लोकांस दिला आहे.

वर सांगितल्या प्रमाणें वरील अभंगाचा साधा सुगम व खरा अर्थ होय. ह्या पेक्षां ह्या अभंगाचा निराळा सोज्वळ अर्थ संभवत नाहीं. रा. खापर्डे यांनीं तुकारामाचे अभंग ह्मणजे कल्पवृक्षाप्रमाणें आहेत ह्मणून सांगितलें. ह्या अभंगांत जो अर्थ मागावा तो प्राप्त होतो. आणि ह्या प्रमाणें त्यांनीं एका वार्तिकाचा आधार घेऊन एक अर्थ ह्या कल्पवृक्षापाशीं मागून सर्वत्रांस दिला. हा अर्थ पुष्कळास पटला नाहीं तरी कल्पवृक्षापासून प्राप्त झालेला अर्थ येथें सांगणें अवश्य होय.

जीवित्व तें किती ह्मणजे फार मोठें व अनेक महत्वाचीं कृत्यें करण्यास योग्य असाही एक अर्थ निघतो. दु अर्थ, जीवित हें फार अल्प व जलबुद्बुदवत् चंचल आहे असें जाणून वैराग्य प्राप्त करून घ्यावें व मोक्षास साधनीभूत असलेल्या ह्मणजे ॥ वैराग्य बोधोपरमाः सहाया स्ते परस्परं ॥ या वार्तिकांत सांगितलेल्या साधनत्रयीपैकीं पहिलें वैराग्य साधन हें हस्तंगत झाल्यावर सदुपदेशानीं राहिलेली जोडी ( ज्ञान व उपरति ) हें युग्म प्राप्त करून घ्यावें ह्मणजे हीच रोकडी जतन होय.

परंतु जोडी शद्बाचा हा वार्तिकानुसार खोल व दुरान्वयी अर्थ तुकाराम बोवास अभिप्रेत असेल असें आह्मांस वाटत नाहीं. ह्या अर्थानें तुकारामाच्या कवित्व स्फूर्तीनें भरलेल्या अभंगाचा भंग झाला असें आह्मांस वाटतें. मधल्या मुख्य दोन चरणांच्या अर्थाचें विवेचन विस्तारानें व्हावयास पाहिजे होतें तसें झालें नाहीं. वरील अर्थामुळें त्या अभंगाचें रूप विषदतर असें झालें नाहींच पण उलट गहन [ न समजण्याजोगें ] मात्र झालें. कल्पवृक्षाचें सहाय्य घेऊन हा ओढून ताणून आणलेला अर्थ संग्राह्यच आहे. पण हा मनास कितपतसा पटतो ह्याचा सुज्ञ वाचकच विचार करोत. शेवटीं, असल्या शद्बवादाच्या जाळांत न पाडतां सर्व जनांस ॥ सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो ॥ अशी ईश्वरा पाशीं प्रार्थना आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—गेल्या सोमवारीं कांहीं कांहीं ठिकाणीं थोडासा पाऊस पडला; पण तेव्हां पासून हें पूर्वा नक्षत्र अगदीं कोरडें चाललें आहे. पाऊस आतां अगदीं अवश्य पाहिजे आहे. कापूस व जवारी हीं दोन्हीं पिकें एकत्र चाललीं असून सर्वांचे डोळे आकाशाकडे रात्रंदिवस लागले आहेत. जळगांव. तेल्हारा वगैरे भागाकडे प्लेगचा व इवेचा उपद्रव चालूच आहे.

मे. गाडवीन आस्टिन कमिशनर साहेब यांची स्वारी आकोल्यास आली असून येथील कचेऱ्यांची वार्षिक तपासणी चालू आहे.

रा. रा. एच. जे. स्टानियन सी. आय. इ. आफि. जुडिशीअल कमिशनर वऱ्हाड यांनीं आपल्या नव्या जागेचा चार्ज घेतला आणि रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी हे परत स्पेशल ज्युडीशर गेले.

रा. रा. रेन आफि. पोलीस सुपरिन्टेंडेंट इलिचपूर यांस १ ले आक्टोबर पासून ६ महिन्यांची रजा देण्यांत आली.

रायबहादूर मनसुखराय एक्स्ट्रा असिस्टंट कानसरव्हेटर वर्ग १ ला यांस एक्स्ट्रा डिपुटी कान्सरव्हेटर वर्ग ४ च्या दर्ज्याची बढती देण्यांत आली.

रा. रा. हनुमंत धनाजी नायब तहशिलदार, मंगरूळ यांस तीन महिन्यांची आजारीपणाची रजा देण्यांत येऊन त्यांच्या रजेंत रा. रा. महमद वाहिउद्दीन यांस नायब तहशिदार नेमण्यांत आलें.

---

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००। |
| सोनें | २४।= | चांदी | ७१।। |
| जवारी | ६०-६९ | कपास | ९० |
| गहूं काठे | ८९-८७।। | कनशी | ९९।१०० |
| सरकी | | | ६। |
| मीठ | | | ३।। रु. मण |
| चणे | | | ३-३।। रु. मण |
| तूप | | | ८।।-९ रु. मण |
| तेल | | | ४।। रु. मण |

---

## वर्तमानसार.

बॉंबे-पूना-रेस-एक्सप्रेस—या नांवाची मुंबईहून पुण्यास जाणारी, व तीहि फक्त पुण्याच शर्यती असतील त्याच दिवसाकरितां जाणारी स्पेशल गाडी नवीन निघालेली आहे. ही पुण्यास ३ तासांत जाते. हिचा वेग ७० मैलांवरहि असतो. ह्या दोन प्रकारच्या स्पेशल गाड्या आहेत. एक फक्त फर्स्ट क्लासच्या उतारू साठीं व दुसरी सेकंड क्लासच्या उतारू साठीं. तिकिटाचे दरहि कमी केलेले आहेत. आतील डब्यांत विजेचे दिवे, पंखे व घंटा आहेत. डबे फार सुशोभित आहेत. चहा काफी सोडा वगैरे साठीं व स्वयंपाक साठा निराळा डबा असतो. हे डबे फारच चांगले व सोईचे आहेत. हे डबे पहाण्यासाठीं मुद्दाम हजारों लोक प्लाटफार्म तिकिटें काढून स्टेशनवर जातात. ज्यास शक्य असेल त्यानें ह्या गाडीची एक वार तरी अवश्य मौज पहावी.

**संस्थानिकांची खरी स्थिती**— परवां सिमला येथे हाउसमध्ये नेटिव्ह राजासंबंधानें लार्ड कर्झन साहेबांनीं जे मित्रत्वाचे उद्गार काढले यावरून यांचें त्या राजाशी फार मोठें सख्य असलें पाहिजे असा समज होण्याचा संभव आहे आणि खरोखर बाह्यतः तशी स्थिती आहे. पण खरा प्रकार कांहीं निराळाच आहे. गेल्या पांच वर्षांत यांच्या एकंदर स्थितींत बराच फरक झाला आहे. त्यांच्या राज्यांत जे रेसिडेंट राजाचे प्रतिनिधी म्हणून असत ते आतां प्रतिनिधी नसून आतां ते राज्यकर्ते झाले आहेत. राज्याच्या प्रत्येक कामांत ते ढवळाढवळ करूं लागले आहेत. होळकरसारख्या बलाढ्य राजासही हा धडा शिकविण्यांत आला आहे!

**नवी युक्ती**—लांब उभें राहून, विजेच्या साह्यानें तारा व चुना दारूगोळा पेटवून हजारों सैन्य मारण्याची युक्ति कोलंबिया विश्वविद्यालयांतील दोन विद्वान काढीत आहेत.

**तंबाखूचें व्यसनाबद्दल बिल**—इंग्लंडांतील १६ वर्षांपेक्षां कमी वयाचा मुलगा जर तमाखु ओढतांना आढळेल तर प्रत्येक खेपेस त्याला १० शिलिंग दंड करावा व तो दंड त्याच्या आईबापांपासून वसूल करून घ्यावा आणि अशा मुलास जो कोणी तमाखु विकील त्यास पहिल्या खेपेस २० शि० व दुसऱ्या खेपेस ४० शि० दंड करावा. आपल्याकडे असाच एखादा कायदा पाहिजे आहे.

**खोटी खबर**— कांग्रेसचा उघळेपणा १९०२ सालीं अमदाबाद येथें जी कांग्रेस झाली होती त्यावेळीं अध्यक्षांवर फक्त उधळण्याकरितां ४०० रु. खर्च झाले तसेंच कांहीं प्रतिनिधींच्या जागेचें एका आठवड्याचें भाडें ७००० रुपये झालें, तसेंच खुर्च्या घेण्याकरितां १०००० रुपये खर्च झाले !! काय हा बादशाही खर्च ! खरोखर वरील रकमा खर्चीं पडल्या असल्यास कांग्रेसबद्दल जी ओरड सुरू आहे ती केवळ निराधार आहे असें म्हणतां येत नाहीं. अशी स्थिती असल्यास बरी नव्हे. परंतु ही उधळेपणाची बातमी सर्वथैव खोटी आहे असें कांग्रेसच्या खर्चाच्या आकारण्या करून स्पष्ट दिसेल.

**फार चिमुकलें घड्याळ**—बर्लिन शहरीं एक घड्याळ आहे. याचा व्यास पाव इंच आहे. त्याचे तोंडाचा आकार लोखंडी चुलीच्या डोक्याएवढा आहे. त्याचें वजन दोन ग्रेनपेक्षांही कमी आहे, आणि तें उत्तम रीतीनें चाललें आहे.

---

## नोटीस

छन्नुसिंग वल्लद चंनलसींग रजपूत हल्लीं राहणार डोणगांव यास व सर्वत्र लोकास:—

या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं आमचा भाऊ बपु वल्लद हानवंता बाजड हा मयत होऊन सहा महिने झाले आहेत व त्याचे मागें त्याची बायको शेवंती मर्द बापू बाजड इने विहीर मळा व वतनदारीचे नंबर व जागा यांतील भाऊकीचे हिश्शावर ताबा केला आहे तरी पण त्या जिनगीवर तिचा कोणतेही प्रकारचा हक्क नसुन फक्त पोटगी पुरताच हक्क आहे कारण तिला मुलबाळ वगैरे कांहीं एक नसून तरुण आहे म्हणून ती दुसरा घरठाव करून जाण्याचा संभव आहे करितां तिचे जवळून जिनगी संबंधाचा कोणतेही प्रकारचा लेख कोणीच करून घेऊ नये घेतल्यास तो खोटा होईल.

सही

१ सखाराम हानवंता बाजड निशाणी रेघ.

१ रोडाजी हानवंता बाजड राहणार डोणगांव निशाणी रेघ.

---

## नोटीस

शेवंती मर्द बापु बाजड राहणार डोणगांव इला:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा नवरा बापु वल्लद हानवंता बाजड हा आमचा भाऊ होता त्याला मरून ६ महिने झाले तितक्या अवधींत तूं जिनगीची अफरा तफरा मांडली आहे. तुला मुलगा नाहीं करितां त्या जिनगीवर तुझी फक्त पोटगी पुरती मालकी आहे. तुला पोटगी देण्यास आम्ही राजी आहेत. जिनगी विकण्याचा तुला अधिकार नाहीं करितां तूं कोणतेही प्रकारचा कोणासही लेख करून देऊं नये व दिल्यास तो बातल व खोटा ठरला जाईल.

सही

१ सखाराम हानवंता बाजड राहणार डोणगांव निशाणी रेघ.

२ रोडाजी हानवंता बाजड राहणार डोणगांव निशाणी रेघ

---

## नोटीस

मे. सेक वडु वल्लद गुलमहमद साहेब मुसलमान राहणार आकोट, मे. महमद उंबर वल्लद शेख मन्नू राहणार आकोट, शेख इमाम वल्लद शेख गुलाब राहणार आकोट यांस:—

खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यांत येते कीं तारीख १ माहे मार्च सन १८९३ इसवी रोजीं मौजे लखमापूर परगणे धारूर तालुके आकोट येथील शेत सर्वे नंबर ३१ एकर १६ गुंठे ४१७ आकार रुपये ४७ चे खाते सेक छन्नु वल्लद महमद अजीम याचे नांवें असून ते शेत साठीम मजला ताब्यगहाणखत वरील तारखेस मजला खातेदारांनीं रुपये ७५० चे दुहोत्रा व्याजाचे लिहून दिलें आहे. या सातशे पन्नास रुपयांत रुपये ४०० रिणकोनीं माझे जवळून शेख नगदी नोंदणार अंमलदारासमोर घेतले असून बाकीचे रुपये ३५० साडेतीनशे तुम्हांस फसली सन १३१४ ला तुम्हास देण्याचेसाठीं मजपाशी अनामत आहेत त्या कराराप्रमाणें तुम्ही आमचे पासून फसली सन १३१४ चे करारप्रमाणें रुपये ३५० साडेतीनशे घेऊन साल मजकूर पेरलेलें पीक काढून घेतल्या नंतर माझे ताब्यांत वरील काळी जमीन आणि त्यांत असलेले आंब्याचे २०० झाडासमेत माझे ताब्यांत देऊन माझी पावती घ्यावी आणि मजला रुपये साडेतीनशे घेतल्याबद्दल पावती देऊन तुम्हास सेक छनु वल्लद महमद अजीम यांनें जें कांहीं कागद पत्र करून दिले असतील ते परत मजला द्यावे या प्रमाणें तुम्ही न केल्यास तुमचे वर दिवाणी कोर्ट मार्फत दावा करून वरील नोटीसीचे खर्चासुद्धां सदहू कोर्ट खर्चासमेत वरील काळी जमीन आंत असलेले २०० आंब्याच्या झाडासमेत ताब्यांत घेतली जाईल ही नोटीस दिली. सही तारीख १।८।०४ इसवी०

सही

अंबीरबेग वल्लद इसबबेग राहणार आकोट महिला धारूर वेशीजवळ याची मोहोर असे.

---

## नोटीस

किसनसींग व रतनसींग वा बाळसींग अज्ञान पालन करणार चुनी मर्द बाळासींग रजपूत राहणार कसबे शेगांव ता. खामगांव जिल्हे आकोला यांस:—

खालीं सही करणार इन कडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचा बाप व पालन करणार इचा नवरा याचा आमचे मालकीचे घरा पैकीं एका कोठडींत भाड्यानें ठेविले आहे. याणें तारीख ३ माहे नव्हेंबर सन १९०२ रोजीं भाडेचिठ्ठी करून दिली आहे. दर महा भाडें १ रुपया ठरले होते. या प्रमाणें एक वर्षांचें भाडें त्यानीं आम्हास दिलें आहे आतां तारीख ३ माहे नव्हेंबर सन १९०३ पासून आज पावेतों भाडें येणें राहीले आहे. बाळासींग वा खडुसींग हा अदमास सवा महिना झाला मरण पावल्या नंतर आम्ही तुम्हास भाडें देऊन टाका व घर खालीं करून द्या असें म्हटले परंतु तुम्ही या प्रमाणें कांहींच केले नाहीं म्हणून या नोटीशीनें तुम्हास कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत भाड्याचें रुपये आम्हास आणून देऊन आमची पावती घ्यावी. तसेंच आमचे घर आम्हांस सदरील तारखे पासून आठ दिवसांत खालीं करून आमचे ताब्यांत द्यावे. आतां आम्ही तुम्हास भाड्यानें ठेवण्यास बिलकुल इच्छीत नाहीं. दिलेले मुदतीचे आंत भाडें आणून दिले नाहीं व घर खालीं करून आमचे ताब्यांत दिले नाहीं तर मुदत संपल्या बरोबर आम्ही तुमचेवर कोर्टांत फिर्याद करून ह्या नोटीशीचे खर्चासुद्धा व बाकी खर्चासुद्धां रकम भरून घेऊं. व घर खालीं करून घेऊन ताब्यांत घेऊं. नोटीस पावल्या पासून मुदतीचे आंत घर खालीं करून आमचे ताब्यांत न दिल्यास पुढें घर आमचे ताब्यांत येई पावेतों दर महा आम्ही जितकें भाडे मागूं तितकें तुम्हास द्यावें लागेल तसा प्रसंग न यावा म्हणून अगाऊ पोस्टमार्फत नोटीस दिली होती. परंतु तुम्ही ती न घेतां वापस केली. म्हणून आम्हास वर्तमान पत्रांतून नोटीस देणे भाग पडले. तुमचे तुम्ही खर्चांत पडूं नये म्हणून अगाऊ सुचना केली आहे. कळावें. तारीख २।९।०४ इ.

सही

गंगा बाप खंडु रजपूत रा. शेगांव द खु.

---

## नोटीस

शेख यासीन व. शेख इमाम पिंजारी राहणार बाळापूर. यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही मजला व मजा खरिदीदार दत्तु व. उकाजी पाटील राहणार कुपट असे दोघ जनास वर्तमानपत्रांतून तारीख २०।८।०४ च्या दोन नोटीसा तारीख २९-८-०४ चे अंकांत दिल्या या पावकया त्यांत जो मजकूर लिहिला तो बद नियत खोटा आहे. तुमचा व आमचा मौजे कुपट ता० बाळापुर येथील शेत सर्वे नंबर ९ एकर गुंठे १०-३४ आकार रुपये १२-८ या शेतां संबंधीं तुमचे आमचे कांहीं बोलणें वगैरे झालें नाहीं व मी इसार घेतला नाहीं व तुम्ही रुपये गोपाळदास नारायणदास गुजराथी याचे दुकानावर ठेविले किंवा नाहीं हे मजला माहीत नाहीं. फक्त तुम्हापाशीं पत्र नें वहितीस दिलें. त्याचें जी तुमची साक्षें भरणें आहेत तितका तुमचा हक्क ठेवून मी दुसऱ्यास खरिदी दिलें आहे. त्या संबंधीं तुमचा कांहीं हक्क नाहीं. इतक्यावर तुम्ही कोर्टांत फिर्याद वगैरे कराल तर त्याच्या खर्चाची वगैरे जबाबदारी मजवर नाहीं नाहीं. शिवाय मी तुम्हास नोटीस दिली आहे त्याचा खर्च तुम्हापासुन भरून घेतला जाईल. कळावें तारीख २।९।०४ इसवी.

सही

यादो वल्लद कृष्णाजी पट्टेवाले राहणार बाळापूर निशाणी खद्द

---

## नोटीस

रा. रा. काचा दादजी वेणी मुक्काम कसबे वडोदे तालुके भुसावळ जिल्हा खानदेश पेटा येदलाबाद यांस:—

खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यात येतें कीं माझी चुलती सारजाबाई जवजे मारुती दातरकर ही मयत साक्षांत चुलती असून तिचे नावें असलेली स्थावर जिनगी ती मयत असल्यामुळें तीचे नावें मौजे वरणवाडी येथील शेत सर्वे नंबर एकर गुंठे आकार रुपये

२७ २.७८३८ ४६८९.८९

व घर तीचे नावें आहे. हल्ली ती कमजर मजकूर तुमचे जवळ आहे व ती फार आजारी असल्याबद्दल ती शुद्धींत नाहीं असें मजला समजलें आहे करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं सदरहू शेताबद्दल व घराबद्दल मृत्युपत्र अगर बक्षीसपत्र अगर कोणतेही प्रकारचा लेख करण्यास तुम्हांस मालकी नसून सदरहु जिनगीचा मी पूर्ण हक्कदार आहे. लेख वगैरे केल्यास रद्द असे ता० २९।८।१९०४

सही

भिकाजी नारायण दताळकर राहणार पिंपळगांवकाळे

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मण आपा व्हलूर सोना आपा वणी राहणार सातन गाव पूर तालुके दर्यापूर यांस:—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी मुलगी ना सेवंती ही तुमचा मुलगा नामे यांस आपास लग्नानें दिली आहे लग्नास ९ वर्षे झाली लग्न झाल्यावर तिजला एक वेळ तुम्ही नेऊन तीचे फार हाल केले वरून मी तुमचे गांवी येऊन तिजला माझे समागमें घरी आणलें ते वेळेपासून ती माझेच घरी आहे त्यास सात वर्षे झाली तिजला तुम्ही नेलें नाहीं वरून मी तिजला लोकांचे कर्ज काढून पोसले हल्लीं तिजला वयांत येण्यास दोन वर्षे झाली तिजला नेऊन नांदविण्याबद्दल तुम्हास बरेच निरोप पाठविले परंतु नेले नाहीं उलट तुम्ही मजला पत्र पाठविलें कीं ती आमचे कामाची नाहीं. आम्ही फारकत देतो तर ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत तिजला सात वर्षांत लागणारा वगैरे लागलेला सर्व दरसाल रुपये ३६ प्रमाणें सात वर्षांचे रुपये २५२ देऊन घेऊन जा व चांगले तऱ्हेनें वागवा तसें न केल्यास तुमचे नर सात वर्षांचे रुपये २५२ बद्दल कोर्टा दावा करून रुपये खर्चासुद्धा भरून घेऊं व हीच नोटीस फारकत समजून तिजला दुसरा पाट करून देऊं मग तुमचे कोणत्याही तऱ्हेची तकरार ऐकिली जाणार नाहीं ही नोटीस दिली सही तारीख २४ आगष्ट सन १९०४

सही

निशाणी रूडूं आपा व.
कडतु आपा वणी गा०
मौजे वेलुरा ता०
दर्यापूर.

---

### श्रीमद्भागवत दशमस्कंध
### श्रीशिवकल्याणाच्या प्राकृत
### ओवीबद्ध टीकेसहित

१

## कृष्णजन्म

( प्रथम पंचाध्यायी )

किंमत एक रुपया ट. ख. दोन आणे.

ही पंचाध्यायी निर्णयसागर छापखान्यांत उत्तम मोठ्या कागदावर छापून तयार होत आहे. छपाई व बांधणी निर्णयसागरची आहे इतकें सांगितल्यावर ती उत्तम होईल हें निराळें सांगावयास नकोच. पृष्ठसंख्या अष्टपत्री सांच्याचीं सुमारें २९० पृष्ठें पूर्वी संकेताप्रमाणें पुस्तकें गणेश चतुर्थीस तयार होतील. श्रीशिवकल्याणाची टीका म्हणजे मूळ श्लोकांचें रसभरित निरूपण असून तें इतकें चित्ताकर्षक आहे कीं, त्याची माधुरी प्रत्यक्ष चाखल्याशिवाय कळणारी नाहीं. आधीच भागवत ग्रंथ रमणीय, त्यांत दशमस्कंद रमणीयतर, त्यांत श्रीकृष्ण जन्म अतिमोहक आणि त्याला अवगुंठन श्रीशिवकल्याणाच्या वाग्रसाचें!

पुस्तकें पंढरपूर येथें आमचेकडे अथवा खालीं दिलेल्या पत्त्यावर विकत मिळतील.

दा० द० कृ० कंत्राटदार, आकोला ( वऱ्हाड )
रा० रा० बा० गा० मोडक लायब्ररेअन, कोल्हापूर
प्रो० नि० बा० रानडे बी. ए. सितारामबिल्डिंग, फोर्ट मुंबई
'महाराष्ट्र कवि' ऑफिस, ठाणें.'
स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी, नागपूर ( अथवा असतील तेथें)

हायस्कूल, पंढरपूर ता. २४।८।१९०४ } गणेश बळवंत मोडक संपादक.

---

## जाहिरात.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, आमचा विडीचा व्यापार पुष्कळ वर्षांपासून चालू आहे, परंतु आमच्या व्यापारास कमीपणा आणण्याकरितां व माल लोकांस नापसंत होण्याकरितां कांहीं दुष्ट बुद्धीच्या लोकांनीं त्याच लटकी केल्या त्यापैकीं शीनाभाई बेचरदास मुक्काम मलकापूर प्रांत वऱ्हाड यांनीं आमच्या नांवाची खोटी लेबलें केल्या मालावर लावून आमचे नांवानें माल विक्री करून बरेच दिवस आपला उदर निर्वाह केला. परंतु आम्ही त्यास सुमारें सोळा महिन्यापूर्वीं मलकापूर येथें धरून त्याजवर सदर कृत्याबद्दल फौजदारी खटला केला. या कामांत त्यास कैद व दंड या प्रमाणें शिक्षा झाली असून त्याच इसमानें पुन्हां तसेंच खोटें काम गेल्या कार्तिक महिन्यापासून सुरू करून माल विक्री करीत होता. करितां त्यास पुन्हा आम्ही मलकापूर येथें पकडून त्याजवर फौजदारी खटला केला त्यांत त्यास तारीख २८ माहे जून सन १९०४ इ० रोजीं सहा महिने सक्तमजुरी व २०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली तरी अशीं खोटीं कामें करून मालविक्री करणारांनीं व आपल्या नांवाचा खोटा माल घेणारांनीं सावध रहावें. तरी आमचे नावाचा माल घेणारे ठोक व्यापारी लोक यांनीं व किरकोळ घेणारे इसम यांनीं सदर ट्रेडमार्क रजिस्टर नंबर व आमचे नांव पाहून माल घेत जाणें.

सही—बाळाराम पुलय्या द० खु०
सही— गुंडाप्पा नसाप्पा दस्तुर येलप्पा नरसप्पा
शुक्रवारपेठ कामाट पुरा,—पुणे सिटी.

---

## कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु पेबलनें माल पाठविण्याची सोय केली आहे एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या कसोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा
ठिकाणा— कॉटन मार्केट समोर कच्छी बाजार, आकोला.

---

ॐनमःश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

### धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अभ्रक सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रमेह, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांचीं धुपणी कार्तितील राग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळालेलीं व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान वगैरे सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ गो० | १ रु० | ७६ गो० | २ रु० |
| ११६ गो० | ३ रु० | १६६ गो० | ४ रु० |
| २७६ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

**सूचना**— अलिकडे २।३ वर्षें आमरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकळ देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यानीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

## जाहिरात

लक्ष लावून एक वेळ वाचा! वाचा!!

### एम. एम्. ॲन्ड सन्स

फोटोग्राफर रबर स्टांप मेकर वॉच रिपेरर आणि स्टेशनरी मरचंट आकोला [वऱ्हाड]

आज पर्यंत कोणत्याही कंपनीनें इमीटेशन रासकोप अथवा यांनीचे घड्याळ किमतींत विकली नसेल ती आम्ही रुपये ९ मध्यें ग्यारंटी वर्षें ५ ची देत आहे. तर त्वरा करावी आणि घड्याळाबरोबर काच, कमान, पेटी आणि याचे बरोबर घड्याळें घेणाराचे नांवाचे रबरी पेनसनसील स्टाप तयार करून पाठवूं आणि तीन घड्याळें घेणारांस व्ही. पी. खर्च माफ. व एक डझन घेणारास एक घड्याळ बक्षिस देऊं हे घड्याळ एक वेळ घेतलें तर पुन: १० वर्षें पर्यंत ब्यावपास नको. आणि दुसरे हर एक जातीचे घड्याळ किंवा हर एक जातीचें स्टेशनरी सामान माफक दरानें व कसोटीनें खात्री लायक पाठवूं. या शिवाय रबराचे छाप नांवानें हर एक जातीचें करून देऊं. आणि रबर स्टांपाच्या नमुन्याकरितां अर्ध्या आण्याचें तिकीट पाठवावें म्हणजे नमुना फुकट पाठवूं. आणि फोटो काढून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं येथें यावें. नाहीं पेक्षां आम्हांस बोलावावें. म्हणजे आम्ही येऊ. आणि २५ रुपया पेक्षा जास्त माल घेणारास दर रुपयास ८॥ अशा आण्या प्रमाणें कमिशन देऊं. आणि या शिवाय काहीं विचारावयाचें असेल तर पत्र व्यवहार करावें म्हणजे उत्तर देऊं. नाहींपेक्षां समक्ष येऊन भेटावें म्हणजे समजेल. आणि कोणास घड्याळ दुरुस्त करायला शिकणें असेल त्यानीं यावें. शिकविण्या बद्दल फी रुपये १० पडेल. रबरस्टांप करितां हर एक गांवास एजंट पाहिजेत. कमिशन भरपूर मिळेल. या सर्व कामाची व सामानाची मागणी करावी म्हणजे खात्री होईल.

एम्. एम्. ॲन्ड सन्स आकोला

---

## जाहिरात

### अल्प किंमतींत मोठा लाभ

खालीं लिहिलेलीं बोधपर, मनोरंजक, मोक्षमार्गदर्शक, चित्तवेधक व अगदीं नवीन पुस्तकें छापून तयार आहेत. तरी जिज्ञासु व मुमुक्षु लोकांनीं अवश्य मागविण्याची त्वरा करावी. खालील कोणतीही पुस्तकें एकदम एक रुपयाची घेतल्यास टपाल खर्च माफ.

| पुस्तकाचें नांव | किंमत | ट० ख० |
|---|---|---|
| आत्मबोधामृत | ०—। | ०॥ |
| श्री सद्गुरुप्रासादिक अभंग | ०= | ०॥ |
| श्री व्यंकटेशाष्टक | ०।. | ०॥ |
| श्रीरामप्रासादिक जिवन्मुक्तीचे अभंग | ०= | ०॥ |

पुस्तकें मिळण्याचा पत्ता— व्ही. बी.
हेड मास्तर मु० अमळगांव
जि. आकोला वऱ्हाड.

## आर्यौषधालय

( खामगांव- मल्हारपुरा )

आमच्या औषधालयांत ( दवाखान्यांत ) नाडी परीक्षा वगैरे अष्टविध परीक्षेनें रोगाचें निदान करून औषध योजना केली जाते. बाहेर गांवच्या रोग्यांनीं खुलासेवार प्रकृतिमान वगैरे विन्यास त्यावरूनही अनुभवशीर गुणकारक औषधें पाठवूं. सर्व रोगांवर खात्रीचीं औषधें तयार आहेत; त्यां पैकीं मुख्य खालीं लिहिल्या प्रमाणें:—

सार्सापरिला— रक्तशुद्धि करणाऱ्या देशी व विलायती वनस्पतीं पासून हें औषध तयार केलेलें आहे. गरमी ( उपदंश ) पासून सर्वांगावर पुरळ उठणें किंवा काळे डाग पडणें, कच्चें रसायन अंगावर फुटणें किंवा त्यापासून सांधे दुखणें, सुजणें यावर हें अगदीं खात्रीचें औषध आहे. गरमी शिवाय दुसऱ्या कोणत्याहि कारणानें रक्त बिघडणें, कोरडी खरूज, कंडू, पुरळ, गळ्यावरच्या वगैरे गांठी सुजणें, संधिवात, ( सांधे दुखणें व सुजणें ) शरीराचा कोणताहि भाग दुखणें व सुन्न होणें, गंडमाळा यांवरही ह्याचा उत्तम उपयोग होतो. किं० लहान बाटली १। रु. मोठी बाटली २॥ रु. पोस्टेज अनुक्रमें ।= व ॥·

धातुवर्धकगुटि—कामोद्दीपक गोळ्यापेक्षां ह्या गुटिका गुणांनीं फारच श्रेष्ठ आहेत; कारण कामोद्दीपक गोळ्यांनीं सप्त धातु न वाढतां विषय वासना मात्र वाढते; व त्यामुळें धातूचा फाजील व्यय होऊन त्या पासून धातु क्षीणता, धातुपातळ होणें वगैरे वाईट परिणाम होतात तसे ह्या गुटिकांनीं न होतां सप्त धातु वाढून कामोद्दीपन ( विषयवासना ) होते. कोणत्याहि कारणानें आलेलें नपुंसकत्व अशक्तता, लवकर धातुपात होणें, स्वप्नांत धातुपात होणें वगैरे सर्व विकारांवर फारच उपयोगी किं० २६ गोळ्यास १ रु.

गरमी ( उपदंश ) वर गोळ्या—चट्टे. सुज, बद, पुरमा वगैरे सर्व विकार कितीही दिवसांचे असले तरी ह्या गोळ्यांनीं खात्रीनें बरे होतात. ह्यांत अपायकारक रसायनी औषध मुळीच नाहीं. पथ्य विशेष नाहीं किं० ३० गो. रु. २

परम्यावर औषध— लघवीची जळजळ, तिडीक इ० २४ तासांत बरें होतात. किं० रु. १॥

बाळंत रोगावर औषध— हें अनुभवशीर खात्रीचें औषध आहे, किं० ३० गो. रु. १

बालामृत— संग्रहणी. पंडु, अशक्तता, खोकला इ० विकारांवर मुलांना उपयोगी. किं० दर बा. ·॥।·

हिवताप व पानथरी यांवर औषधें-- प्रत्येक औषधास किं० १ रु.

भस्में, मात्रा, पाक, आसव वगैरे सर्व शास्त्रोक्त औषधें तयार आहेत त्यां पैकीं मुख्य:--

| | |
|---|---|
| अभ्रक भस्म- क्षय, खोकला, इ० | किं० दर तो. रु. १९ |
| लोहभस्म ( शतपुटी ) पंडु, अशक्तता इ० | ,, ,, रु. ३ |
| मंडूर भस्म-पंडु, संग्रहणी इ० | ,, ,, रु. १ |
| मडुमंडूर- वरच्याहून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| प्रवाळ भस्म नं. २ जीर्णज्वर, धातुविकार इ० | ,, ,, रु. १ |
| प्रवाळ भस्म नं० १ वरच्याहून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| सूत शेखर- पित्तविकार, मोंवळ इ० | ,, ,, रु. ४ |
| खोकल्यावर गोळ्या—खोकला दमा | ,, ,, ·॥· |
| सुवर्णमाक्षिक—धातुविकार जीर्णज्वर इ० | ,, ,, रु. ९ |
| हेमगर्भ मात्रा— वात कफ इ० | ,, ,, रु. १८ |
| चंद्रप्रभा— मेह, मुरलेली गरमी इ० | ,, ,, रु. १॥ |
| सु० मा० वसंत-जीर्णज्वर, अग्निमांद्य इ० | ,, ,, रु. ६ |
| महायोगराज गुग्गुळ- सर्व वात विकार | ,, ,, रु. २ |
| रेचक गोळ्या ( जुलाब होण्यास ) | ३२ गो० रु. १ |

औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. पांच रुपयावर घेणारांस कमिशन. खुलासा पत्रद्वारें.

वैद्य वासुदेव शास्त्री गोडबोले
खामगांव ( वऱ्हाड )

---

## ORIENLTAL

### GOVERNMENT SECURITY

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED,
Established 1874,
Head Office—**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED

## TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

### IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*

---

### मुंबई बँकची सेव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खाली लिहिल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाच्या १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

### जाहिरात

### स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी बळवंतराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण बळवंतराव फडके यांनी छापून प्रसिद्ध केलें.

STERED No. N

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........०१ ०१
दुसरे खेपेस.... .......०१

advance.
Single copy .................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs.
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line :2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 12 SEPTEMBER 1904 NO 36

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १२ माहे सप्तेंबर सन १९०४ इ० अंक ३६

### नोटीस

बैरागी कलशमपुरी गुरु नथुपुरी राहणार दादगांव पोस्ट-जळगांव तालुका खामगांव यास:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तारीख २९।७।०४ रोजींची जाहिरात वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केली आहे. त्या जाहिरातींतील मजकूर चुकीचा असून तुह्मी स्वकल्पित गोष्टी छापल्या आहेत. सर्व इस्टेटीचा माझा मी संपूर्ण मालक आहे. मी विद्यमान आहे तों पावेतो ह्या स्थावर जंगम जिनगीवर कोणाचाच हक्क वगैरे कांहीं नाहीं. तुमचे गुरु नथुपुरी यांचीही कधींच मालकी नव्हती. त्यांच्याकडे माझ्या जिनगीचा वारसा जाण्याच्या अगोदरच नथुपुरी मरण पावला आणि यामुळें आमच्या जिनगीवर तुमचा भावी हक्कासारखा कांहींच चालणार नाहीं. आह्मी जें व्यवस्थापत्र तारीख २९ सप्तेंबर १९०३ रोजीं लिहून नोंदून दिलें आहे त्यात आह्मी साफ स्पष्ट लिहिलें आहे कीं आमच्या मरणा नंतर आमच्या पश्चात त्या लेखाप्रमाणें व्यवस्था चालवायाची आहे. आमच्या हयातींत या व्यवस्था- ... नाहीं. या वेळेस तर आह्मी जीवंत आहों आणि आमचे संपादन केलेले इस्टेटीचे आह्मी मालक असतां या वेळेस त्या लेखाची तामील पोकळ आहे.

तुह्मी जी जाहिरात दिली आहे कीं व्यवस्थापत्राकावरून तुह्मी जिनगीची व्यवस्था करीत असतां इत्यादि. हें तुमचें ह्मणणें मोठें बनावटीचें आहे कारण माझे हजिरींत तुह्मी व्यवस्था करूं पहात आहां; परंतु तसें करण्याविषयीं तुह्माला परवानगी दिलेली नाहीं. मला अंतकाळा सारखी जबर मांदगी असतांही त्यावेळेस तुह्मी समोर येऊन थोडी देखील देखरेख केली नाहीं व प्रत्येक कामाची बेपरवाई दाखविली. अशा रितीची वागणूक चांगल्या व्यवस्थे विरुद्ध आहे हें निराळें लिहिणें नको; आणि या बाबतींत तुमची लबाडी पुष्कळशी दिसून आलेली आहे.

यावेळेस तुमची कुबुद्धी व बेपरवाई वगैरे वर्तणूक दिसून आल्यामुळें मी नाराज होऊन पूर्वी करून गुजरलेलें व्यवस्थापत्र या जाहिर नोटिशीनें रद्द केलें आहे. आतां या पुढें तुह्मी जेथून आला तिकडे चालते व्हा. तुह्मास आमच्या मकानांत किंवा देवस्थानांत येण्याची परवानगी नाहीं व गोसावी पंथा प्रमाणें तुह्मी भीक मागून चरितार्थ चालवावा असी तुह्मास आज आह्मी ताकिद करितो. आज तारिख २ सप्तेंबर १९०४ इसवी.

सही
मकुनपुरी गुरु दौलतपुरी दस्तुर
भवानापुरी गुरु भवानपुरी
राहणार दादगांव तालुका
खामगांव दस्तुर खुद्द.

---

### पंचांगशोधन

(पंचांगशोधन करण्याकरितां माहिती पाहिजे ती)

१ आपले प्रांतांत पंचांग तयार करणारी जोशी मंडळी किती आहेत? २ त्यांचीं नांवें, गांव व पेठ्याचा पूर्ण पत्ता देणें ३ पंचांग कोणत्या ग्रंथावरून तयार करितात? ४ पंचांग ज्या ग्रंथावरून तयार होतें असे ग्रंथ आपल्या प्रांतांत कोणकोणते आहेत? ५ हे ग्रंथ छापील किंवा हस्तलिखित आहेत? ६ स्वतः पंचांग तयार करीत नसून पंचांग कसें तयार करितात ह्याबद्दल पूर्ण माहिती असलेले कोणी आहेत काय? असल्यास त्यांचीं नांवें व पूर्ण पत्ता कळवावा. ७ प्राचीन ग्रंथावरून केलेलें पंचांग सध्या दृक्प्रत्ययास बरोबर उतरत नाहीं ह्मणून कोणी नवीन ग्रंथ दृक्प्रत्यय देणारे पंचांग तयार करण्यासाठीं केले आहेत काय? ८ केले असल्यास ... सदर ग्रंथ छापले आहेत किंवा हस्तलिखितच आहेत? १० सदर ग्रंथ हस्तलिखित असल्यास तो तसा या कमेटीकडे पाठवावा व छापील असल्यास त्याची एक एक प्रत कमेटीकडे पाठवावी. हस्तलिखित प्रतीची विशेष काळजी घेतली जाईल. ११ ह्या नवीन केलेल्या ग्रंथकर्त्यांचीं नावें व त्यांचा पूर्ण पत्ता कळवावा. १२ या नवीन केलेल्या ग्रंथांस मूळ आधार कोणते ग्रंथ आहेत व त्यांचीं नांवें काय? १३ पंचांगांत नाक्षत्रसौरवर्षमान किती दिवस, घटि, पळें वगैरेचे धरण्यांत येत आहे? १४ हें वर्षमान कोणत्या ग्रंथाधारें घेतलें आहे? १५ हें वर्षमान किती वर्षापर्यंत एक सारखेंच असल्याचें सिद्ध होतें? १६ चालू शके १८२६ चे आरंभीं अयनांश किती धरले आहेत? १७ हे अयनांश कोणत्या ग्रंथाधारें घेतले आहेत? १८ शून्य अयनांश कोणते वर्षी होते? १९ ह्या वर्षीच शून्य अयनांश होते यांस कांहीं आधार आहे काय? २० असल्यास तो कोणत्या ग्रंथांत व काय आहे? २१ दरवर्षास अयनगति किती धरली आहे? २२ ती कायम आहे किंवा तींत कांहीं फेरफार होत असतो? २३ फेरफार होत असल्यास एक वर्षाची गति कमींत कमी किती व अति मोठी किती होते? व याचा प्रमाण काय? २४ पंचांग सायन किंवा निरयण करितात २५ हल्लीं प्रचारांत निरयण पंचांग चालते ह्मणूनच फक्त निरयण पंचांग काढीत असून सायन पंचांगच करावें अशा मताचे कोणी लोक आहेत काय? असल्यास त्यांचीं नांवें व पूर्ण पत्ता कळवावा. २६ सायन पंचांगच धर्मकृत्यास घ्यावें अशाबद्दल आधार कोण कोणत्या ग्रंथाचे देतात व ते आधार काय आहेत? २७ निरयणच पंचांग धर्मकृत्यास घ्यावें अशाबद्दल कोण कोणत्या ग्रंथाचे आधार आहेत व ते कोणते? २८ पंचांग स्वतः काढीत नाहींत पण त्या संबंधी प्राचीन सिद्धान्तादि ग्रंथ जाणणारे कोणी विद्वान लोक आहेत काय? असल्यास त्यांचीं नांवें व पूर्ण पत्ता कळवावा. २९ पंचांग स्वतः काढीत नसून अर्वाचीन इंग्रजी ज्योतिष गणित विषय जाणणारे लोक कोणी आहेत काय? असल्यास त्यांचीं नांवें व पूर्ण पत्ता कळवावा. ३० इंग्रजी ज्योतिष गणित विषय जाणणारे असून त्यावरून पंचांग करणारे कोणी आहेत काय? असल्यास त्यांचीं नांवें व पूर्ण पत्ता कळवावा. ३१ प्राचीन ज्योतिष गणित व इंग्रजी ज्योतिष गणित असे दोनही विषय जाणणारे कोणी आहेत काय? असल्यास त्यांचीं नांवें व पत्ता कळवावा. ३२ ज्यांनीं ज्यांनीं प्राचीन गणित ग्रंथ छापले असतील त्यांनीं प्रत्येकाची एक एक प्रत कमेटीकडे पाठवावी. ३३ हल्लीं जे लोक पंचांगें प्रसिद्ध करितात, त्यांनीं गुदस्त सालचें एक व चालू सालचें एक अशीं दोन पंचांगें पाठवावीं व पंचांगें कोणचे गांवचे अक्षांश रेखांश धरून केलीं आहेत हें त्यावर लिहिलें नसल्यास लिहावें व दृक्प्रत्ययास मिळतें किंवा चुकतें याबद्दलचा अनुभव काय आहे तो कळवावा. ३४ प्राचीन गणितग्रंथ हस्तलिखित असल्यास तोही या कमेटीकडे पाठवावा. त्याची विशेष काळजी घेतली जाईल. ३५ वेध घेण्यासाठीं कोणी यंत्रें तयार केलीं असल्यास त्यांचीं नावें व तीं तयार करणारांचा पूर्ण पत्ता कळवावा. ३६ गणित करण्याकरितां मध्यरेषेची जरूरी असते. एकच गणितग्रंथ पंचांगें तयार करण्यासाठीं सर्व हिंदुस्थान देशाबद्दल करावा, असें होण्यास मध्यरेषा कोणचे ठिकाणची धरावी? ३७ पंचांग गणित बरोबर आहे असें तपासण्याकरितां वेध घेतले पाहिजेत किंवा नकोत? ३८ घेतले पाहिजेत तर मग वेधशाळा त्याला पाहिजे ती कोठें असावी? ३९ कोणाजवळ ज्योतिष गणितविषयासंबंधीं तसेंच सायन निरयण वादासंबंधीं छापील अगर हस्त लिखित पत्रव्यवहार, टिपणें वगैरे साधनें असतील, त्यांचाही शोध करून कमेटीकडे पाठविण्याचें करावें. ४० अयनांश आरंभस्थानसंबंधीं हल्लीं मतभेद आहे तो येणेप्रमाणें:—

(१) नवीन अथवा पटवर्धनी पंचांगांमध्यें अयनांश घेण्याची रीति आहे ती—शके ४९६ मध्यें रेवती तारा क्रांतिवृत्तावरील वसंतसंपातांत होता व इष्ट वर्षी त्या ताऱ्याचे वसंतसंपातापासून क्रांति वृत्तावर मोजलेलें जें अंशात्मक अंतर ते अयनांश धरतात व ते सांप्रत सुमारें १८ अंश ३२ कला आहेत.

(२) केतकी पंचांगांत अयनांश मानले आहेत ते असे—सूर्य सिद्धान्तामध्यें चित्रा ताऱ्याचा भोग १८० अंश आहे ह्मणून इष्ट वर्षी तुळा संपातापासून क्रांतिवृत्तावरील चित्रा ताऱ्याचें जें अंतर ते अयनांश होत. ते सांप्रत सुमारें २२ अंश ३० कला आहेत.

(३) पंडित बापुदेव शास्त्री यांचे पंचांगांत अयनांश घेण्याची रीति आहे ती—इष्ट वर्षी सूर्य सिद्धान्तावरून आलेल्या मेष संक्रमणकाळीं छायेवरचा रवि जितका असेल तितके अयनांश घ्यावे व हीच रीति मद्रास येथील रघुनाथाचार्य यांच्या पंचांगांत आहे. शिवाय तिरुवादी येथें कुंभकोण येथील शंकराचार्यांच्या आज्ञेवरून सुंदरेश्वर श्रोती व्यंकटेश्वर दिक्षीत हे जें पंचांग करितात त्यांतही अयनांश घेण्याची हीच रीति आहे. तसेच खेतडीचे राजे अजितसिंह यांचे आश्रित रूढमल ज्योतिषी जें पंचांग करितात त्यांतही अयनांश याप्रमाणेंच घेतात. हीं सर्व पंचांग नॉटिकल वरून करितात.

(४) यातील केतकी व पटवर्धनी या दोन पंचांगाखेरीज बाकीच्या पंचांगांत नाक्षत्र सौर वर्षाचें मान सूर्य सिद्धान्तोक्त ह्मणजे ३६५ दिवस १५ घटिका ३१ पळें ३१ विपळें व २४ प्रतिविपळें धरतात. पटवर्धनी व केतकी यांत या नाक्षत्र सौर वर्षाचें मान ३६५ दिवस १५ घटिका २२ पळें व ५४ विपळें धरितात. करितां अयनांश कोणते घ्यावे व नाक्षत्र सौर वर्षाचें मान पंचांग गणितास कोणतें घ्यावें याचे बद्दलचा ज्योतिषी मंडळीनें आपला स्वतःचा अभिप्राय स्पष्ट कळवावा.

सदर प्रश्नांचीं उत्तरें देतांना नुसता प्रश्नाचा अनुक्रमांक लिहून त्या पुढें उत्तरें लिहावी. प्रश्न उतरण्याचें कारण नाहीं.

सदर प्रश्नांचीं उत्तरें येत्या भाद्रपद वद्य सप्तमी इंग्रजी ता० १ आक्टोबर सन १९०४ पर्यंत येऊन पोंहचतील अशी पाठवावी. ह्मणजे त्या त्या जोशी मंडळीस येथें अमुक दिवशीं येण्याविषयीं कमेटीकडून लिहून जाईल त्याप्रमाणें त्यांनीं येथें येण्याचें करावें. तसेंच (अ) ज्यांस येण्या जाण्याबद्दल व (ब) येथें रहाण्याबद्दल या कमेटीकडून पैसे पाहिजे असतील त्यांनीं तसें स्पष्ट लिहावें.

कमेटीकडे जे ग्रंथ येतील त्यांचें काम झाल्यावर ते ज्याचे त्यास परत देण्यांत येतील.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ३ शके १८२६

## राष्ट्रीय सभा

यंदाच्या सभेचें अध्यक्षस्थान सर हेनरी काटन साहेब विभूषित करितील असा अंदाजा आहे. यंदा पार्लमेंटाची निवडानिवड पुनः होईल असा रंग दिसत नाहीं आणि त्या कारणानेंच सर काटन हे इंडियांत येत्या हिवाळ्यांत राष्ट्रीय सभेसाठीं येणार आहेत. हा योग जुळून येईल तर फार बरें होईल. सर काटन यांची भक्ती या देशावर फार आहे आणि त्यांच्या अध्यक्षपणानें राष्ट्रीय सभेच्या कार्याविषयीं सर्वत्र निराळीच जागरूकता दिसून येईल. राष्ट्रीय सभे विषयीं अलिकडे एक निराळीच शिथिलता उत्पन्न झाली आहे आणि तिचा प्रतिकार होईल तितका अवश्य केला पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या कामांत पुष्कळ निराशेच्या गोष्टी घडतात आणि त्या निराशेच्या उद्विग्न अवस्थेंत पुष्कळ लोकांच्या तोंडून असे उद्गार निघतात कीं सालोसाल सभा भरविण्याच्या या खटाटोपालाच संक्षेप द्यावा आणि. दु- [illegible] मार्गाचा स्वीकार करावा हें बरें. हा युक्तिवाद सकृद् दर्शनीं मोठ्या मुत्सद्दीपणाचा वाटतो पण खरोखर याच सल्ल्यांत मोठा दगा आहे. हा विचार म्हटला म्हणजे निर्व्यापाराचा व कृतीशून्यत्वाचा आहे. शून्यकार्याचा धडा मोठा घातुक होय आणि त्याच्या अंगिकारानें राष्ट्रांचीं राष्ट्रें रसातळास पोचलीं आहेत. आम्ही जित लोक आहों तेव्हां आपल्या मागण्याला सरकार तिलांजली देतील यांत नवल नाहीं. पण निराशेला आपण जिंकलें पाहिजे व आपला कार्यक्रम चालूंच ठेविला पाहिजे- सभा भरविण्याचा, अर्ज करण्याचा आणि सरकारापाशीं मागणी करण्याचा प्रजेचा हक्क आहे. हा हक्क जसा आपण गाजवूं तसा आपला लाभकाल समीप येत जाईल. राष्ट्रीय सभेसारख्या सभा म्हटल्या म्हणजे लोकमताच्या दुंदुभी आहेत. सरकाराला या सभांपासून लोकांची बाजू आपोआपच कळते. रशियांत अशा सभा फारशा भरत नाहींत तर तेथें कुलुपी गोळे राजावर सुटतात, अराजक स्थितीच्या अंदाधुंदी लवकर चालू होतात आणि प्रजेच्या गुप्त कारस्थानी टोळ्या बनतात. हा प्रकार इंडियांत नाहीं याचें कारण लोकमताची वाफ बाहेर चटकन खेंचू लागते- रक्तपातानें लढाईचा शेवट होतो व बाह्य अरिष्टें टळतात पण लढाई संपल्या नंतर राष्ट्राची प्रगती होण्याला, सरकार व प्रजा यांचीं अंतःकरणें एकवटण्याला किंबहुना सामाजिक, राजकीय, औद्योगिक इत्यादि प्रकारची उन्नती होण्याला असल्या सभाच आपलीं सर्व साधनें आहेत. आपल्या इष्टकार्यासाठीं आपण आपली पराकाष्ठा केली पाहिजे. आपला धर्म तरी अशीच आज्ञा देतो कीं, आपल्या देशासाठीं आपण अनन्य भावानें झटलें पाहिजे आणि या दृढ देशभक्तीनें आपण आपली कार्यमाला प्रज्वलित करीत गेलों तरच आपल्या राष्ट्रीय सभेला यशसंपदा लाभतील. अंतर्बीज खऱ्या कार्य दृष्टीचें असलें म्हणजे निराशेच्या आकाशांत देखील आशासूर्य आपल्या किरणांनीं आमचा मार्ग प्रकाशित करील आणि आपण कार्य करण्याच्या मार्गांतच असलों म्हणजे आपोआपच यशाच्या नव्या नव्या वाटा आपल्यास दिसूं लागतील.

## औद्योगिक मंडळी

आमच्या देशावर राज्यसत्ता विलायतची आहे पण या पराधीनते विषयीं आम्हांस कांहींच विषाद वाटत नाहीं. परिचयानें हें इंग्रजी साम्राज्य आम्हांला कल्याणकारीच वाटतें. त्याच्या नांवाखालीं आम्ही एकजीव बनलों आहों व आम्ही त्याचा परकीपणा काढून टाकला आहे. इंग्रजी राज्य हीच आतां आमची कार्यभूमी बनली आहे. आमच्या राशीभूत आशाधनाची खाण याच इंग्रजी राज्यांत आहे. आम्ही विलायतवाल्यांचे प्रजाबंधु आहों आणि या बंधुत्वाच्या जोरावरच आम्हाला आमचें भावी राष्ट्र उभारावयाचें आहे. इंग्रजी राज्य आम्हाला परकी वाटत नाहीं पण तें माहेरघर न वाटूं देण्या इतका सापत्नभाव आमच्या राज्यकर्त्यांच्या अंगीं अजून वसत आहे हें पाहून मनास फार खेद होतो. इंडियन माणसा विषयीं बोलतांना कित्येक इंग्रज लोक स्वतांस देवमाणूस कल्पितात आणि इंडियनास फार धिक्कारबुद्धीनें कमी लेखितात.

ही धिक्कारबुद्धि प्रचलित असण्याला कारण अगदीं निराळेंच आहे. आमच्या अंगीं भलताच पराधीनपणा शिरला आहे आणि तोच पराधीनपणा आपल्या देशास सर्वत्र हीनपणा व लघुपणा आणीत आहे. हा पराधीनपणा म्हणजे आमचा औद्योगिक पंगुपणा होय. आमच्या देशाच्या सर्व गरजा विलायतवाल्यांच्या हातीं आहेत. विलायती कारखाने ज्या चीजवस्तु तयार करितात त्यांच्या वरच आमची प्राणसंभावना होत असते. ही औद्योगिक गुलामगिरीच आमच्या नाशाच्या बुडाशीं आहे; व तिनेंच आमच्या देशावर ही सुधारलेली गुलामगिरी आणलेली आहे. आमची राजिक प्रगती फारशी होत नाहीं. आमचा समाज प्रस्तुत काळाला अगदीं कुचकामाचा बनला आहे आणि आमची दिनचर्या म्हणजे एक विशिष्ट गुलामगिरीच होय.

अशा अनन्यगतिक गुलामगिरींत देखील एखादी आशा मन प्रसन्न करिते व निराळी प्रेरणा देते. नुकतीच बंगाल्यांत एक औद्योगिक मंडळी निघाली आहे. या मंडळीचा उलेख आम्हां पूर्वीही केला आहे. ही मंडळी गेल्या सहा महिन्यांत चांगली नांवारूपाला आली आहे. आमच्या आकोल्यासही एक औद्योगिक मंडळी कुमार श्रीहरभाजी यांच्या परिश्रमानें निघालेली आहे. पण या शेवटील संस्थेपेक्षां बंगाल्यांतील मंडळींत आम्हांस विशेष जीव दिसतो. देशी उद्यम वाढवावा, देशी कलाकौशल्यास जीवनकला आणावी आणि बाह्य राष्ट्रांचें सर्व यांत्रिक कलाकौशल्य देशी करावें असा या बंगाल संस्थेचा महा संकल्प आहे. सर्व बंगाल इलाख्याभर ही चळवळ प्रसृत झाली असून लोकांच्या मनानेंही तशीच धांव घेतली आहे. युरोप, अमेरिका, जपान इत्यादि राष्ट्रांत देशी कारागीर विद्या शिकण्यास पाठवावे, त्यांच्या विद्यार्जना नंतर त्यांस कारखाने घालून द्यावेत, देशी पदवीधरांस शास्त्रीय अभ्यासासाठीं विलायतेला पाठविण्याची सोय करून द्यावी, आणि अशा रितीनें देशी कारागिरी व कलासंग्रह यांचें पुनरुज्जीवन करावें इत्यादि गोष्टी बंगाली संस्थेनें हातीं घेतल्या आहेत. या बंगाली मंडळीचा हा हेतु म्हणजे सर्व इंडियाचा हेतु झाला पाहिजे. या चळवळीनें सर्व देशाला हालवून सोडला पाहिजे. अशा मंडळीच्या द्वारानें जे प्रयत्न होतात ते निष्फल झाले तरी ते पुढील कार्यक्रम अधिक यशप्रद करून सोडतात. ही नवी चळवळ आमच्या देशाचा इतिहास निराळाच बनवील अशी आमची मनोदेवता साक्ष देते. आमच्या अंतःकरणांत ही नवीन आशा प्रकाशली आहे. ही आशा आमच्या गत औद्योगिक वैभवाच्या अंतःस्फूर्ती जोरानें प्रदीप्त करिते. अशी ही प्रस्तुतची सोन्यासारखी वेळ आम्ही साधलीच पाहिजे. औद्योगिक उन्नतीचा संदेश सर्व राष्ट्रभर विदित करा, या कार्याकडे आपलें जीवित अर्पण करा, व [illegible] म्हणजे राष्ट्राचा भाग्यकाल फार समीप आहे हें ध्यानांत धरा आणि या राष्ट्रीय गोष्टीचा अंतर जिव्हाळा प्रत्येक इंडियनाच्या मनांत सतत खेळूं द्या असें सद्गदित उंच स्वरानें सांगतांना बाबू नरेंद्रनाथ सेन आपल्या देशबांधवापुढें प्रतिज्ञा देतात कीः—तरो अगर बुडो, प्राण जावोत अगर राहोत अशाच एका दृढभावानें या राष्ट्रीय सत्संकल्प साठीं आपला देह व अंतःकरण मीं अर्पण केलें आहे. आणि बंगालच्या औद्योगिक मंडळीचा हा उद्योग सर्व राष्ट्रभर प्रसृत होवो एवढीच इच्छा आहे.

## स्वदेशावरील अंधळें प्रेम

आपल्या देशाचा व देशी वस्तूंचा आपणांस जितका अभिमान वाटावयाला पाहिजे तितका वाटत नाहीं असेंच अनुभवास येतें नुसता शाब्दिक अभिमान नको आहे. 'आपलें' असें ज्यास आपण म्हणतो त्याजवर किती प्रेम पाहिजे हें शब्दानें सांगणें कठीण आहे. 'आपलें' हा शब्दांतील प्रेम अनिर्वाच्यच होय. परदेशी वस्तूंच्या रम्य रंगरूपास आपण फसत आहों. त्यांस जवळ करण्यानें आपण स्वदेशी वस्तू दूर करीत आहों आणि आपल्या देश दारिद्र्याच्या खोल दरींत ढकलीत आहों. आपल्या पैशावर परदेश श्रीमान होत आहेत आणि आपण मात्र कंगाल होत आहों. ही गोष्ट आपणांस दिसत नाहीं असें नाहीं पण परदेशी वस्तू आपणांस लुब्ध करून सोडतात. पण त्यांची भुरळ आपण जुमानतां कामा नये आणि कित्येक लोकापवादांची पर्वाहि धरितां कामा नये. इतका मनाचा पक्का निश्चय झाला पाहिजे. स्वदेशावरील प्रेम खरोखरी अंधळेंच पाहिजे. स्वदेशी जें नसेल त्या वांचून माझें चालेल मला स्वदेशाच्या वस्तू खेरीज कांहींच येणें नाहीं असा मनाचा निर्धार पाहिजे. आपल्या गरजा कमी करून त्या स्वदेशावरील वस्तूंवरच भागविण्यास शिकलें पाहिजे. परंतु इतकी प्रेमळ देशभक्ती भरलेला मनुष्य क्वचितच दृष्टीस पडतो. स्वदेशाच्या ठिकाणीं आपल्या मनाचा लय लागत नाहीं तर आपण स्वतंत्र्याच्या सौख्यास अनाधिकारी ठरूं. आपणामध्यें असे एक तंद्री लागलेले पुढारीच नाहींत. नुसत्या सभा भरवून व्याख्यानें देणारे पुढारीच आपल्या हाताशीं आहेत. असें एकहि लहानसें खेडेंगांव नाहीं कीं जेथील सर्व लहान थोर लोक स्वदेशी वस्तूंचेच उपभोक्ते आहेत! आपणांस चांगल्या पुढाऱ्यांचीच फार गरज आहे. पुढाऱ्यांच्या आचार विचारांचेंच बहुजनसमाज अनुकरण करणारा असतो आणि तो पुढारीवर्गच धरसोडीच्या विचारांचा असला म्हणजे जनसमुहासहि तीच गती मिळते. आपल्या देशांत उद्यागधंदेहि मोठेसे नावाजण्यासारखे नाहींत व स्वदेशी अशा वस्तू फार थोड्या उपलब्ध आहेत ही गोष्ट खरी आहे परंतु आपल्या जवळ असलेली एक मोहोर दुसऱ्या जवळ असलेल्या हजार मोहारांहून थोर आहे हें कोणी विसरूं नये. आपल्या घरची मीठभाकरी दुसऱ्याच्या घ- [illegible] गोष्ट नित्याच्या अनुभवांतली आहे. आपण परदेशी वस्तू पाहून त्या प्रमाणें स्वदेशांत तयार करवून नंतर त्यांचा मोठ्या अभिमानानें उपभोग घ्यावा. दुसऱ्यांनीं तयार केलेल्या वस्तूप्रमाणें हुबेहुब वस्तू स्वदेशी तयार करविण्याचे कारखाने आपण काढले पाहिजेत. सध्यांची आपली स्थिती पाहिली तर दिसून येईल कीं आपण बहुतेक परपोष्य आहोंत. आपल्या पाया पासून डोक्या पर्यंत सर्वांगावरील वस्त्रभूषणें परदेशांहून आणविलेलीं आहेत असें आपणांस दिसून येईल. हा साठीं आपल्यांतील श्रीमान श्रीमान लोकांनीं आपली संपत्ती एकत्र करून मोठमोठे कारखाने उभारले पाहिजेत व कारागिर लोक तयार करविले पाहिजेत. आपणांस अनंत वस्तू संसारास लागतात त्या वस्तूंचे कारखाने काढून जें देशाचें कल्याण होईल तितकें कल्याण दुसऱ्या कशाचानेंहि होणार नाहीं. प्रत्येक गांवांतील श्रीमान, वजनदार व विद्वान मंडळींनीं स्वदेशाचें कल्याण करण्याचा हेतु मनांत वागवून स्वदेशीच वस्तू वापरांत घेण्याकडे लोकांची प्रवृत्ती वळविली तरी मोठाच कार्यभाग होणार आहे. गांवोगांवची मंडळी ही चळवळ करण्याचा आग्रहास करितील काय

## नवीन विचार दिशा

आपल्या देशांतील व्यापार व उद्योगधंदा यांचें चित्र मोठ्या गंमतीनें आहे-

आपले लोक तुसेत पोटार्थी आहेत असें दिसून येईल. एका देशबंधूनें दुसऱ्या देशबंधूची पगडी आपल्या डोक्यावर चढवावी आणि कांहीं वेळांनें तीच पगडी तिसऱ्याच्या जवळ जावी या पलीकडे निराळा उद्योगधंदा असा कांहीं नाहीं. आपल्या देशांतला माल परदेशीं पाठवून त्याजवर पैसा मिळवून आणला आहे असें दिसत नाहीं. आपल्या देशांतून जितकी संपत्ती बाहेर जाते त्यापेक्षां जास्त संपत्ती बाहेरून घरीं परत येत नाहीं, दुसऱ्यांनीं पाठविलेले जिन्नस जितके आपण खरेदी करितों, तितक्या पैशाचे आपले जिन्नस बाह्य देशीं विकले जात नाहींत, आणि ह्मणूनच आपल्या व्यापाराचा आंत पाय आहे. दुसरी गोष्ट ज्या कांहीं थोड्याशा वस्तू आपण बाहेर पाठवितों त्या अशा पाठवितों कीं आपल्याच घरांतील लोकांस त्या विपुल मिळत नाहींत. आणि ही गोष्ट विशेषतः धान्या संबंधानें फारच दिसते. आपल्या देशास पुरून उरेल इतकें धान्य आपल्याकडे पिकतें परंतु आपण पैशाच्या लोभास पडून तें धान्य बाह्य देशीं पाठवितों ह्मणून आपल्या घरांतील लोकांसच तें महागाईनें मिळतें. आणि दुष्काळासारखी आपत्ती आली ह्मणजे धान्य संग्रहाची उणीव दिसून येते. ओली कोरडी भाकरी आपल्या लोकांस पोटभर मिळेल अशी आपण व्यवस्था केली पाहिजे. प्रत्येक खेड्यांतील लोकांनीं आपल्या गांवच्या सर्व मंडळीस वर्ष दोन वर्षे पुरेल इतकें धान्य संग्रही ठेवून बाकीचें बाहेर पाठवावें. पुष्कळ पैसा मिळतो ह्मणून दुसऱ्यास तें विकून टाकण्याचा मार्ग मोठ्या अदूरदृष्टीचा आहे. अशी व्यवस्था ... खेडोखेडीं ... जुळून भीती उरणार नाहीं. बाहेर देशीं धान्य न पाठवितां तें सर्व धान्य स्वस्त भावानें आपल्याच बांधवांनां खाण्यास मिळावें अशी योजना झाली पाहिजे. आपण बाहेरचा माल घेऊं नये व आपला बाहेर पाठवूं नये असेंच धोरण ठेवलें पाहिजे. अनियंत्रित व्यापाराच्या तत्वास ही कल्पना बाधक आहे तरी असल्या नियंत्रित व्यापाराचीच आपल्या देशास अत्यंत गरज आहे. आपली स्वदेश भूमी ह्मणजे खरोखर सुवर्णभूमी होय. व ती आपणांस जें वाटेल तें देण्यास समर्थ आहे. आपल्या देशांत पाहिजे तितका कच्चा माल तयार होतो आणि त्या मालाच्या नाना वस्तूं आपण कारखाने काढून तयार केल्या व त्या बाह्य देशी पाठविल्या तर आपला देश सुसंपन्न होईल. आपण आपल्याच हाता तोंडानें खाण्या पिण्यास शिकलें पाहिजे आणि आपण जर दुसऱ्याच्या तोंडानें खाऊं लागलों तर आपली स्थिती कालत्रयींहि सुधारणार नाहीं. मोठमोठ्या राष्ट्रीय विचारांचा पाया अशा लहानशा विचारांनींच भरून पक्का केला पाहिजे. हे विचार पुष्कळांस रुचणार नाहींत व ही एक प्रकारची पिच्छेहाटी आहे ही गोष्ट निर्विवाद होय. पण ह्या विचारांचीच अमलबारी परिणामीं हितकर होणार आहे. ह्मणून याच विचारांच्या मार्गानें आपण गेलें पाहिजे.

## अमृतवृष्टी

परमेश्वराची कृपाच खरी ह्मणून गेल्या चार दिवसांत पावसानें मोठी बहार करून दिली. एक एक पाण्याचा थेंब अमृताच्या मोलाचा होता. पिकें आनंदानें डोलूं लागलीं आहेत. पृथ्वीचें रमणीय हिरवें आच्छादन दृष्टीला फारच फार मोहकारक वाटतें. पृथ्वीची इतकी प्रसन्नवृत्ती क्वचितच दृष्टीस पडत असेल. आह्मी तर असें ह्मणतों कीं प्रत्येकानें ही संधी घालवूं नये. एकदां तरी शेतांत व वनांत फेरी करावी आणि पृथ्वीची श्री व लक्ष्मी हीं नेत्रांनीं पाहावी ह्मणजे या वृष्टीनें सर्व वनस्पतीच्या वर्गाला नवा जोमदार जीव कसा प्राप्त झाला आहे आणि त्यांनीं सर्वत्र कसा शुद्धानंद पसरलेला आहे याची थोडीशी कल्पना येईल. सध्यां पिकें फार जोमांत आहेत आणि त्यांच्या ऐन रंगांत इतका विपुल अमृत वर्षाव झाला आहे कीं हीं पिकें आमच्या शेतकऱ्याला लाभतील तर त्याचें दैन्य पाठमोरें होईल आणि भावी सुखाच्या आशा वृद्धिंगत पावतील. ईश्वर करो आणि हा लक्ष्मीदर्शनाचा सुदीन उगवो !

## लढाईची खबर

आज बरेच दिवसापासून युद्धाची कथा मोठीशी मनोरंजक वाटेनाशी झाली होती. युद्धाचे जे पंचप्राण ह्मणजे अग्नीचा वर्षाव आणि मानवी रक्ताच्या धारा यांचें चांगलेंसें उद्दीपन झालेलें नव्हतें, परंतु गेल्या आठवड्यांत जो रणसंग्राम झाला त्यामुळें ह्या युद्धांत हे पंचप्राण नव्यानें ओतले गेले. ... केलें होतें. इतक्या दिवसाच्या अनुभवानें जें अनुमान करण्यांत आलें होतें कीं, म्यांचुरियाच्या रणभूमीवर एक घनघोर लढाई झाल्याशिवाय राहणार नाहीं तें अनुमान चांगलेंच प्रत्ययास आलें. म्यांचुरियाकडे रशियन जनरल क्युरोपॅटकिन हे ह्या लढाईच्या तयारींत गुंतले होते. पुष्कळ दिवसापासून त्यांनीं या लढाईची मांडणूक मांडणें सुरूं केलें होतें. ही लढाई ह्मणजे मोठ्याच आणीबाणीची व निकराची होती. ह्या लढाईच्या जयाअपयावर पुढील सर्वच धोरण अवलंबून होतें. लिआओयांग येथें जें तुमुल युद्ध झालें त्यांत रशियन लोक व जपानी लोक मोठ्या जीवावर उदार होऊन लढले. ह्या लढाईंत जर आपण जिंकलें तरच आपलें राष्ट्र जीवंत राहील ही गोष्ट प्रत्येक जपानी शिपायाच्या अंतःकरणांत वागत होती आणि ह्मणूनच तो आपल्या जीवाकडे न पाहतां एकसारखा लढत होता. त्यांच्या पराक्रमा प्रमाणें जपानी लोकांस विजय प्राप्त झाला व रशियन लोकांनीं रचलेला सर्व व्यूह खचून गेला. ह्या युद्धांत रशियाची फारच फार हानी झाली. ह्या जमिनीवरील लढाईंत जपानी लोकांची पूर्ण उच्छेद करूं व त्यांस 'देमाय धरणी ठाय' करावयास लावूं अशी जी रशियाची गर्वोक्ती व त्याची जी मोठी मदार ती सर्व विलयास गेली. रशियाचाच पाय जमिनीवर लागेनासा झाला आहे, रशियन लोकांचा धीर तुटला आहे. जपानास तोंड देण्याची त्यांच्यांत हिंमत राहिली नाहीं. रशियाचा विध्वंस झाला तरी रशिया सारख्या राष्ट्राचा मोठासा घात झाला अशांतला प्रकार नाहीं; तरी ह्यामुळें रशियाचें खरें खरें सामर्थ्य व त्याच्याच बरोबर युरोपियन राष्ट्रांची शक्ती चांगली अजमावली. जपानानें आशिया खंडांतील लोकांच्या रक्तांत जें शौर्य गुप्तपणें खेळत आहे त्याची थोडीशी छटा दाखविली. पण जर कां जपान या लढाईंत कच खातें तर मग त्याजवर ओढवणाऱ्या संकटराशीस पारावर नव्हती व या अपजयामुळें जपाननें आणखी पाच पन्नास वर्षें वर मान केली असती किंवा नाहीं याची शंका आहे. असो. ईश्वरानेंच जपानची बाजू राखली आणि ओयामा सारख्या युद्धकुशल सेनापतीच्या हातास यश दिलें. ह्या लढाईंत दोन्ही पक्षांचे इतके लोक होते कीं इतके लोक अलीकडील इतिहास प्रसिद्ध अशा कोणत्याहि लढाईंत एकदम एका लढाईंत लढत नव्हते ह्मणतात. ह्या प्रसंगीं रशियाचे ३० हजार लोक धारातीर्थी पडले. बाकीचें रशियाचें सैन्य मुकडेन येथें जाऊन पडलें आहे. मुकडेनपासून हारबिनला जाण्याचा रस्ता आहे आणि मुकडेन येथें न जुळल्यास हारबीन येथें तरी आणखी एक असाच भयंकर संग्राम घडून येईल असें ह्मणतात. वरील जयाची शुभ वार्ता ऐकून जपानी बादशहास अत्यंत हर्ष झाला असेल यांत नवल नाहीं तरी पण आपली स्थिती तो पूर्णपणें जाणूनच आहे. त्यानें जी तार पाठविली त्यांत त्यानें दर्शविलें आहे कीं, लढाईचा शेवट अद्याप फार दूर आहे आणि ह्मणून मोठ्या धीरानें व काळजीनें वागण्यांत हयगय होऊं नये. हें जपानच्या बादशहाचे उद्गार अगदीं यथार्थ आहेत व ते ध्यानांत धरूनच जपानी लोकांनीं आपला पाय पुढें टाकला पाहिजे.

पोर्ट आरथर कडील बातमी विशेष नाहीं. तरी जपान तें काबीज केल्या खेरीज राहील असें दिसत नाहीं. त्यांचे नित्यशः प्रयत्न सुरूं आहेत. फक्त कालावधीचाच प्रश्न आहे.

## व्यापारीवाचनपाठ

धनुर्धारीकृत व्यापारी-वाचन पाठ नांवाचें पुस्तक १ लें आह्मांकडे अभिप्रायार्थ येऊन बरेच दिवस झाले. ह्या १००-१२५ पानांच्या पुस्तकांत व्यापार संबंधीं २०-२५ धड्या मध्यें जी माहिती संकलित केलेली आहे ती सर्वतोपरी संग्राह्य होय. व्यापारी मनुष्यास हें पुस्तक जितकें उपयुक्त आहे तितकेंच तें दुसऱ्यासहि वाचण्यास फार मनोरंजक असें झालेलें आहे. यांतील भाषा फार सोपी, बालबोध व मुद्देसूद असून व्यापारी वाङ्मयात्मक ज्ञान यांत चांगलें गोंवलें आहे व्यापारी उद्योगास प्राथमिक व अवश्यमेव लागणारें असें शिक्षण या पासून मिळाल्या खेरिज राहणार नाहीं. शाळांतून जीं क्रमिक पुस्तकें प्रचलित आहेत त्यांत या पुस्तकास स्थळ मिळेल तर विद्यार्थी जनांस नानाविषयांचें सारभूत ज्ञान या पासून प्राप्त होईल. मुलांच्या वाचनांत व्यापारी भूगोल, व्यापारी इतिहास किंवा हा व्यापारी वाचनपाठ असलीं पुस्तकें येऊं लागलीं तर मुलें व्यवहार चतुर व शहाणी होतील असा आह्मांस मोठा भरंवसा आहे.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस सर्वत्र होऊन पिकांची स्थिती फार चांगली झाली आहे. व रोगराईचें मान मंदावत चाललें आहे.

मौलवी महमद निजामुद्दीन हसनखान बी. ए. बी. एल. डिपुटी कमिशनर, वणी यांची चाकरी इंडिया सरकारच्या होम खात्याकडे बदलण्यांत आली आहे आणि तेथून त्यांची नेमणूक भोपाळ संस्थानाच्या दिवाणगिरीवर झाल्या अन्वयें ते तिकडे लवकरच रवाना होतील.

रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी यांचाय कडील स्पेशल ड्यूटीचें काम संपूर्ण झाल्यामुळें त्यांस आकोल्यास डिपुटी कमिशनर नेमण्यांत आलें आणि राजश्री रुस्तुमजी साहेब येत्या बुधवारीं आकोल्यास आपल्या कामावर दाखल होतील.

त्या नंतर मेजर एफ. आर. डी. एम. सा. डा. आर. माडवा आफीशिएटींग डिपुटी कमिशनर आकोला यांस यवतमाळच्या डिपुटी कमिशनरीच्या जागीं नेमल्या अन्वयें ते तिकडे रवाना होतील.

रा. रा. गाडविन आस्टिन कमिशनर साहेब यांची स्वारी येथन गेल्या गुरुवारीं खामगांवागला गेलीं. पुढील मुक्काम बुलढाण्याकडे न करितां साहेब बहादूर उमरावतीला परत गेले.

रा० रा० वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर वकील यांनीं काल सायंकाळीं 'आत्मोन्नती'वर सुरस व्याख्यान दिलें.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००॥ |
| सोनें २४।= | | चांदी ७१॥ | |
| जवारी ५०-५५ | | जवस ८६ | |
| गहू काठे ८०-८५ | | बनशी ९० | |
| सरकी | | | ५॥।= |
| मीठ | | | ३॥। रु. मण |
| चणे | | | ३ रु. मण |
| तूप | | | ९॥ रु. मण |
| तेल | | | ४॥ रु. मण |

## वर्तमानसार.

**८० वा वाढ दिवस**—परवाची ४ थी सप्टेंबरची तारीख ह्मणजे इंडियाचे ग्रांड ओल्ड मॅन दादाभाई नौरोजी यांचा ८० वा वाढदिवस होय. परमेश्वर कृपेनें या देशभक्तांचे असलेच पुष्कळ वाढदिवस आह्मांस पहाण्यास मिळोत! यांनीं आपल्या आयुष्याच्या ऐन उमेदीच्या भरांत जी देशसेवा पत्करिली आहे ती अद्याप सतत व फार परिश्रमानें त्यांनीं चालविली आहे. हे गृहस्थ ह्मणजे मूर्तिमान देशभक्तीच होत. परिणत अनुभव, राजकार्याची पूर्ण वाकबगारी आणि सोज्वळ व सम्मन्य कार्यदिशा यांच्या योगानें यांच्या आयुष्यांतील प्रत्येक मुहूर्त आमच्या देशास फार मौल्यवान झाला आहे. यांची सुदृढ शरीरप्रकृति, यांच्या मनाचा उल्हास व देशकार्याबद्दल निष्ठा ही आपल्या देशाच्या आगामी ऐश्वर्यभाग्याचें चिन्ह होय. असलीं नररत्नें ईश्वरानें आपल्या पदरीं घट्ट बांधलीं याबद्दल आह्मी अनन्यभावें शरण गेलें पाहिजे.

**दुःखद मृत्यु**—आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रा. रा. नारायण चिंतामण केळकर बी. ए. यांस धुळें येथें ज्वराने देवाज्ञा झाली. कै. वा. वामन दाजी ओक यांच्या पश्चात काव्यसंग्रहाचें बंद पडलेलें काम यांनीं आपल्याकडे घेतलें होतें आणि हें कार्य त्यांनीं निरळ मातृभाषेची सेवा करावी आणि स्वतांच्या ज्ञानभांडारांत भर घालावी ह्या हेतूनेंच अंगीकारिलें होतें. काव्यप्रकाशाचा संपादकपणा चांगला उन्नत अवस्थेला आलेला आहे असें अलीकडील त्या मासिकाच्या अंकावरून दृष्टीस पडेल. यांच्या सारखा होतकरू, सात्विक व विद्वान गृहस्थ निवर्तला ही महाराष्ट्राची मोठी हानी होय!

**गाईनें जीव वांचविला**—फत्तेपूर येथें एक मूल रस्त्यांत खेळत असतां त्याच्या वरची गाय त्याच्या नजिक होती. तेव्हां दोन गोऱ्हे झुंज घेत घेत तेथें येऊन धडकले त्यांच्या झुंजींत तें मूल चिरडून जाणार तोंच त्या गाईनें त्यास आपल्या शिंगानें अचूक उचलून जवळच्या ओट्यावर ठेविलें व त्याचा प्राण रक्षण केला. हें गाईचें शहाणपण अलौकिकच होय!

**एका मुलाची अजब महत्वाकांक्षा**—अमेरिकेंत एका ७-८ वर्षांच्या वयाच्या मुलाच्या मनात एकदम जग प्रसिद्धी मिळविण्याची अचाट जिज्ञासा उत्पन्न झाली आणि ह्मणून त्यानें एका २५ हजार रुपयाच्या हवेलीस आग लावून दिली. हेतू हा कीं आपलें नांव वर्तमानपत्रांतून जगजाहीर होईल व आपल्या असल्या अजब कारस्थानाबद्दल आपले फोटो वाटले जातील. कल्पना अजब तर खरीच! या वामनमूर्तीनीं थोर कीर्ति मिळविली यांत शंका नाहीं.

**पाठीवर झाड वाढलेला कांसव**—पाठीवर एक लहानसें ताडाचें झाड वाढलेलें आहे असें एक मोठें हिंदुस्थानी कांसव धरून अमेरिकन लोकांनीं सेंट लुईच्या प्रदर्शनाचे जागीं मांडिलें आहे. मोठ्या गमतीचीच गोष्ट होय!

**फार जंगी घड्याळ**—चालू सालीं युनायटेड स्टेट्समध्यें सेंट लुई येथें जें प्रदर्शन चालू आहे, त्यांत एक जंगी घड्याळ दाखविलें आहे. हें घड्याळ जमिनीवर उताणें ठेवण्यांत आलें आहे. तें इतकें मोठें आहे कीं तें पाहण्यासाठीं लोकांना यंत्रांच्या मधून मधून जागा ठेवण्यांत आली आहे. त्याचा व्यास सुमारें ७५ फूट व घेर १५० फूट आहे, त्याची उंची अर्थात् जाडी ४० फूट आहे व तें सर्व बाजूंनीं पहाण्याच गिलावें ह्मणून त्याला तिने मांडलेले आहेत. बॅलन्स चक्राचें वजन एक टन आहे. व जिला हेअर-स्प्रिंग (केश-कमान) ह्मणतात, तिची जाडी एक माणसाच्या मनगटाइतकी आहे! मुख्य कमानीची लांबी ३०० फूट आहे, आणि ती दोन इंच जाडीचे दहा पट्टे एकत्र जोडून केलेली आहे, हे घड्याळ दाखविण्याकरितां वाटाड्ये ठेविले आहेत, ते प्रत्येक भाग काय आहे, काय आहे त्याचा काय उपयोग बगैरे माहिती प्रेक्षकांस देतात. या घड्याळास विजेच्या एका बारीक यंत्राच्या साहाय्यानें रोज नियमित वेळीं देण्यांत येते.

**मातीच्या भाकरी खाणार लोक**—माती खाणें आपल्यास कितीही किळसवाणें वाटलें, तरी लहान मुलें माती खातात हें आपल्याला ठाऊकच आहे. पण माती खाऊन निर्वाह करणारे लोक ही नौन, न्यू कॅलिडोनिआ, न्यू गिनी व मलाया द्वीपकल्पांत आहे! पूर्वेकडील देशांत प्रवास करणाऱ्या लोकांच्या असें अनुभवास आलें आहे कीं, 'पिवळे लोक' यांना माती खाण्याची चटक फार. जावा व सुमात्रा बेटांत ती खाण्यापूर्वी चांगली तयार करण्यांत येते. ती पाण्यांत भिजवून चांगली कुटतात, तींतील वाळू व दगड चाळून काढतात. नंतर तिच्या करंगळी इतक्या जाड भाकरी करतात व त्या तव्यावर भाजतात व नंतर त्या खातात!

**कापराची उत्पत्ती व उपयोग**—कापूर हा एका झाडाच्या चिकापासून व रसापासून तयार करतात. हीं झाडें जपानांत व त्या देशाच्या ताब्यांतील फॉर्मोसा बेटांत मात्र होतात. ह्या झाडाच्या चिकापासून कापूर तयार करावा लागतो. कित्येक वेळां ह्या झाडाचें लांकूड चिरलें असतां मध्यंतरीं शुद्ध कापूरही सांपडतो. परंतु तो या लांकडांत बहुधा स्फटिकरूपानें असतो. अलीकडे जी बिनधुराची बंदुकीची दारू तयार करण्याची युक्ति निघाली आहे, तिच्यामध्यें मुख्य द्रव्य—किंवा पुष्कळसें असणारें द्रव्य—कापूरच होय. तेव्हां जपानानें आपल्या दूरदृष्टीनें आपल्यास त्याची जरूर लागेल हें ह्मणून कापूर किंवा कापराची माती आपल्या राज्यांतून जाण्याची बंदी केली. तेव्हां अर्थातच तो महाग झाला आहे.

**बोला फुलाला गांठ**—कोट्टायम येथील मॅजिस्ट्रेटनीं एका अपराधी इसमास सहा महिन्यांची शिक्षा देण्याचा हुकूम केला. त्यावेळीं त्या कैद्यानें असें बोलून दाखविलें कीं 'परमेश्वर' खरा असेल तर, माझ्यावर फिर्याद करून मला शिक्षा करविणारास सर्प डसेल. त्यावरून लवकरच त्यास एका सर्पानें दंश केला व त्यामुळें तो मरण पावला.

**९८ वर्षें पुरुषवेषानें**—कॅथेराइन कूम्ब्स नांवाची एक ९८ वर्षांची परकीय स्त्री आहे. या स्त्रीनें आपल्या आयुष्यांतील ९८ वर्षें पुरुषवेषांत व समुद्रप्रवासांत घालविलीं. लहानपणीं तिचें एका पुरुषाशीं लग्न झालें होतें. पण तो वेडा निघून तिला फार त्रास देऊं लागल्यानें तिनें त्याच्याशीं संबंध तोडून पुरुषवेष धारण केला व जहाजावर एका कॅप्टनच्या हाताखालीं ती कारकून ह्मणून नोकरीस राहिली. अशा रीतीनें पुरुषवेषांत समुद्रावरील नोकरी तिनें बरींच वर्षेंपर्यंत केली. या मुदतींत तिजवर एक सुंदर पुरुष समजून कित्येक तरुण युवती मोहित होऊन गेल्या होत्या. पण तिनें कोणास दाद दिली नाहीं. शेवटीं समुद्रावरील नोकरीस कंटाळून तिनें नोकरी सोडून दिली व ती स्वतंत्र संसार मांडून राहिली. तिनें दोन स्त्रियांशीं लग्नें केलीं एक स्त्री लग्न केल्यानंतर चार वर्षांनीं मरण पावली व दुसरी बारा वर्षेंपर्यंत राहून पुढें मरण पावली. याप्रमाणें ९८ वर्षें तिनें पुरुषवेषांत काढलीं. स्त्रियांपेक्षां पुरुषांची योग्यता फार उंची आहे असें तिचें ठाम मत झालें आहे.

**लक्ष्यांत ठेवण्यासारखी आख्यायिका**—सुभेदार मल्हारराव यांचे हयातींत त्यांचा एकुलता एक प्रिय पुत्र खंडेराव हा मरण पावला, तेव्हां त्याची स्त्री श्रीमती अहिल्याबाई सती जाणार होती; पण सुभेदारांनीं तिच्यापुढें पदर पसरून तिला ह्मटलें, 'बाई, खंडेरावाच्या मागें तू राहिलीस तर मी समजेन कीं, अहिल्या मेली, आणि खंडू आहे.' सासऱ्याच्या अशा प्रकारच्या विनवणीनंतर अहिल्या- [illegible] तेव्हां तिनें सती जाण्याचा आपला बेत बदलला. हें पाहून सुभेदाराच्या मनाचें समाधान झालें, आणि यांनीं अहिल्याबाईला दुःख करीत बसण्यास वेळ मिळूं नये ह्मणून तिचें मन राज्यकारभारांत गुंतविण्याच्या बुद्धीनें आपल्या राज्यांतला कांहीं मुलूख अजिबात तोडून त्याची पूर्ण मुखत्यारी तिला दिली. हा तोडून दिलेला मुलूख ह्मणजे खाजगी संस्थान होय. हा मुलूख स्वतंत्रपणें तोडून देण्यांत आणखी एक मोठा मुत्सद्दीगिरीचा डाव असा साधिला होता कीं, होळकराच्या घराण्यांतले पुरुष उत्तमप्रकारें शूर, कर्तृत्ववान् आणि दक्ष असावे, त्याचप्रमाणें राण्याही राजकार्यधुरंधर निघाव्या असें मल्हाररावांची इच्छा होती, आणि त्यासाठीं त्यांना राज्यकारभाराचें शिक्षण देण्यासाठीं खासगी नांवाचें संस्थान दौलतीपासून निराळें काढणें व त्याची व्यवस्था वंशपरंपरेनें राण्यांच्या हातीं ठेवणें अगत्याचें होतें. तिसराही त्यांत एक हेतु असा होता कीं, एक पुरुष मृत होऊन त्याचा पुत्र गादीवर बसला, ह्मणजे पुष्कळ वेळां पहिल्या पुरुषाच्या स्त्रीचा मानमरातब पुढील पुरुषाच्या हातून रहावा तसा रहात नाहीं. यासाठीं त्यांना कांहीं कायमची नेमणूक करून देणें अवश्य असतें. असें हें खासगी संस्थानें दौलतींत सामील करण्याचें धाडस केलेलें पाहून कोणास वाईट वाटणार नाहीं बरें!

**सत्पात्रीं दानधर्म**—देवासचे राजेसाहेब कोल्हापुरास गेले असतां मराठी एज्युकेशन सोसायटीच्या एका विद्यार्थ्यास त्याचा शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत शंभर रुपये देण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. उपटसुंभांना दानधर्म करून आळशी बनविण्यापेक्षां असें दान खरोखरच ग्राह्य!

**एका गोऱ्याचें सामर्थ्य**—मि. स्टेड यांच्या मतानें चार हजार हिंदुनां एक गोरा शिपाई वठणीस आणण्यास पुरा आहे असें ठरतें. मि. स्टेड साहेब हें विधान करितांना, जरा म्हणजे जरा किंवा संकोचले नाहीं! चार हजारांचे ठिकाणीं चाळीस हजार जरी त्यांनीं ह्मटलें असतें तरी त्यांचें कोण काय करणार होता.

**एका पायानें चालण्याची शर्यत**—नुकतीच कलकत्ता येथें झाली या शर्यतींतील उमेदवार तरी होते. त्यापैकीं तिघजण सर्वांच्या अगोदर एक तास व एकूण पन्नास मिनिटांत नऊ मैलांचा रस्ता चालून गेले.

---

## नोटीस

बेसमी लक्ष्मी मर्द तुकाराम रा० सुकळी ता० आकोट इसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आपलें शेत सर्वे नंबर ४६ एकर ३९०२९ आकार रुपये ५७ याचें खातें माझेच नावानें आहे. सदर्हु शेताचा चौथा हिस्सा मला पूर्वी तुह्मी मक्तानें १३ वर्षें पर्यंत दिला होता ह्याची मुदत फसली सन १३११ साल अखेर होती. मी ७।८ वर्षें मक्तानें सन १३०७ सालीं खरेदी देऊन नोंदून वगैरे दिले. त्याच्याहि ६।७ वर्षें पूर्वी तुह्मी तुमचा मावसभाऊ नामदेव वल्लद दत्तु पाटील रा० जऊळके ता० आकोट त्याजला खरेदी दिलें. मी मक्तानें शेत वाहत असतां मला मुळींच समजलें नाहीं. पुढें जेव्हां तुमचा भाऊ मजला ह्मणाला कीं तुह्मी ते शेत द्या नाहींपेक्षां मी दुसऱ्यास विकून टाकतो. तपासा अंती तुह्मी खरोखरच त्यास खरेदी दिलें. या शेताचें खातें माझे नांवें असल्यामुळें तें शेत मला त्या जवळून ८०० रुपयास विकत घेणें भाग पडलें तुह्मी माझा विश्वासघात केला हें योग्य केलें नाहीं तरी ही नोटीस पावतांच मी तुमचे मार्फत जवळून शेत खरेदी घेऊन ८०० रुपये दिले ते रुपये मला ही नोटीस पावतांच आठ दिवसांत आणून द्यावे. व माझे हातची पावती घ्यावी असे मुदतींत न झाल्यास तुह्मी माझ्याशीं लबाडी केल्या बद्दल मी तुमचेवर फौजदारीत फिर्याद करीन व या नोटिशीच्या खर्चासह सर्व खर्च भरून घेईन. तुह्मी बायको मनुष्य तुमचेवर प्रसंग न यावा ह्मणून अगाऊ सूचना केली आहे. कळावें ता० ८।९।०४ इ.

सही

शांबिरबेग व० इसनबेग रा० आकोट निशाणी मोहोर

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे,
किरकोळ अंकास..................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........रु० ०१
दुसरे खेपेस........रु० ०१

# वऱ्हाडसमाचार.

Single copy ...

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs.
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ..2 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 19 SEPTEMBER 1904 NO 37

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १९ माहे सप्टेंबर सन १९०४ इ० अंक ३७



गुण न आल्यास पैसे परत

**पस्म्यावर रामबाण औषध**

शंभरां पैकीं शभरांस गुण

दोनच दिवसांत हटकून गुण येतो

कसाही जुनाट व नवा परमा स्त्रात्रीनें नाहींसा होऊन लघ्वीची जळजळ व तिडीक एकच भाग घेतल्यानें बंद होते.

किंमत १। रुपया ट. ह. ।≈

व येथील चांदीची मांडी वगैरे पाठवूं १ रुपयास ≈॥ कमिशन.

पत्ता:— एन्. जी. कान्हेरे ॲन्ड को. [ नाशीक सिटी ]


---

## नोटीस

बेशरमी शेख हसन वल्द शेख छटू मन्यार राहणार लाखनवाडा बुद्रुख तालुका बाळापूर यांस:—

खाली सही करणार इजकडून यां नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मला दुष्काळाच्या वेळीं माझ्या माहेरी आणून घातलें आणि पुढें मला सोडून चालते झाला. तुह्मी मला न्याल ह्मणून चार वर्षे वाट पाहिली पण तुह्मी मला मुळ धाडलें नाहीं किंवा स्वतां येऊन घेऊन गेला नाहीं. मी माझ्या मावाला तुमच्या तपासा साठीं पाठविलें होतें तेव्हां तुह्मी तोंड चुकवून खेड्यावर चालते झाला. ह्मणुन लाचारीनें ही जाहिर नोटीस देणें भाग पडलें. मी आतां माझ्या भावाच्या घरीं राहूं इच्छित नहीं. तुमच्या तेथें येऊन संसार करण्याला तयार आहे. ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत माझ्या पोटगीचे इतक्या वर्षाचे पैसे चुकते करावें आणि मला घेऊन जावें. असें करण्यास चुकाल तर तुमचा नवरेपणाचा मजवर हक्क राहणार नाहीं. योग्य मुदतींत नीट व्यवस्था न कराल तर ही नोटीस हीच फारकत समजून दुसरा घरठाव करीन. कळावें. तारीख ११ सप्टेंबर १९०४ इ.

सही

हयातबी मर्द शेख हसन राहणार पातुरनंदापूर तर्फे मुखत्यार भाऊ सय्यद कासम वल्द रुय्यद रसुल निशाणी खुद.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, शहर आकोला येथील कबीर महमद जमादार यांच्या दक्षीण बाजूकडील घर खपरेली दोन आढ्याचे आवार सुद्धां दर्शनी भाग पश्चिमस आहे. हें मकान आम्माजान महजतीच्या मालकीचें असून ह्मानवर देखरेख महल्यातील पंचांची आहे. त्याची वहिवाट पंचातर्फे शेख महताब हे मरेपर्यंत करीत होते आतां शेख महताबाचे चिरंजीव शेख चांद व अमसाहाबुद्दीन वा अजीजुद्दीन हे तें घर विक्रीस काढणार आहेत असें ऐकतो तरी सदरील घर कोणी खरेदी अगर गहाण अगर बक्षीस घेऊं नये. घेतल्यास तो व्यवहार रद्द समजला जाईल ह्मणून या जाहिरातीनें मुद्दाम कळवित आहों. कळावें. तारीख १६।९।०४ इ.

सही ( उर्दूत )

चांदखा वा कासमखा

जमादार पंचाकडून

वहिवाटदार

---

## तिनशें वर्षें जगेल असा मनुष्य

अपल्या सध्यांच्या मानप्रमाणें मनुष्याचें आयुष्यमान ६० पासून ७५ वर्षें पर्यंत आहे. पण ७५ शेच्या घरांत आलेले गृहस्थ फारच थोडे आढळतील. परंतु एक मनुष्य अमेरिकेंत आहे त्याच्या संबंधानें मोठमोठ्या शास्त्रज्ञ मनुष्यांचा अभिप्राय फार निराळा आहे. तो मनुष्य ३०० वर्षे जगेल अशीं सर्वजण खात्री देतात. हा विलक्षण मनुष्य युनायटेड-स्टेट्स् मधील इंडियाना संस्थानांतील रॅडनॉर गांवीं आहे. हा सध्यां २४ वर्षांचा आहे पण ४–५ वर्षांच्या मुला एवढाच दिसतो. हा फुट उंच असून याचे वजन ३५ पौंड आहे. तो आठ दिवसांत तीनच वेळां जेवतो. तो २४ तास खेळतो आणि २४ तास झोंप घेतो. हें याचें वर्तन अगदीं बिनचूक चाललें आहे. हा सध्यां मुळाक्षरें शिकत असून त्याला दहापर्यंत अंक मोजतां येतात. ह्मणजे त्याच्या शिक्षणास नुकताच प्रारंभ झाला आहे.

हा जन्मतःच अगदीं रोगी खुरट असा जन्मला असावा किंवा यांच्यांत जन्मतःच कांहीं व्यंग असेल असें वाटतें. पण तसें कांहीं नाहीं. याचा शरीर प्रकृती इतर मुला प्रमाणेंच पांच वर्षें पर्यंत निकोप होती. पण पुढें एकाकी काय झालें कोण जाणें! त्याची वाढ खुंटली आणि इतर मनुष्याची वाढ एक वर्षांत जितकी होते तितकी होण्यास यास ६–७ वर्षें लागूं लागली. या चमत्कारिक मनुष्याची नामांकित शास्त्रज्ञांनीं आणि वैद्यांनीं मुद्दाम पुष्कळ दिवस पर्यंत परीक्षा करून असें ठरविलें कीं, याच्या शरीरांतील प्रत्येक भाग अगदीं सावकाश हळू हळू वाढत आहे व याची संपूर्ण वाढ होण्यास तीनशें वर्षें लागतील तेव्हां कोठें तो ४०।५० वर्षांच्या मनुष्याप्रमाणें दिसेल. परंतु तो वयांत येईपर्यंत त्याचें पालण पोषणहि दुसऱ्यास करावें लागेल ह्मणजे निदान १००।१२५ वर्षें पर्यंत तो त्याचें पोरवयच राहणार. हा विलक्षण मनुष्य ह्मणजे एक जगांतील अद्भुत चमत्कारच होय! याचें प्रदर्शन करून पैसे मिळावण्याचे पुष्कळ कंपन्यांच्या मनांत होतें पण त्याचे आईबाप या गोष्टीस संमती देईनात ह्मणून नाइलाज झाला.

या वरील चमत्कारिक हकीकतीवरून असा एक विचार निघतो कीं, मनुष्याची वाढ जितकी हळू हळू होईल तितका तो जास्त जगेल. पण मनुष्याच्या सध्यांच्या वाढीचें प्रमाण कमी कमी होऊन आयुष्याची मर्यादा वाढणें इष्ट होईल कां नाहीं हा मोठा प्रश्न होय. आपणांस पुष्कळ वर्षें जगावयाचें असेल तर आपली वाढहि हळूं हळूं होणार हें स्पष्ट दिसतें.

खुद्द आमच्याहि पाहण्यांत एक मुलगी आहे. तिचें वय सध्या ६ वर्षांचे आहे पण ती ८।९ महिन्याच्या मुला प्रमाणें दिसते व तिचे इतर व्यापाराहि तसेच आहेत. पण तिला चार दोन शद्वच चांगलें बोलतां येतात. घरच्या मनुष्यास ती चांगली ओळखते. तिचे खाणेंपिणेंहि बेताबेताचेंच आहे. पण तिला चवी कांहीं नाहीं. वाटेल तो अभक्ष्य वा कटू पदार्थहि इतर चांगल्या पदार्थांप्रमाणेंच ती खाते. जन्मतः ती चांगली होती, पण पुढें महिन्या पंधरा दिवसांतच ती फार रोडली व पुढें दर वर्षी थोडीबहुत आजारीच असे. सध्यां तिची तबेत चांगली आहे व ती दिवसें दिवस सुधारत आहे. वरील मनुष्याप्रमाणेंच या मुलीची वाढ हळके हळके होत आहे या वरून हीहि मोठी दीर्घायुषी होईल असें आह्मांस वाटतें.

---

## मतस्वातंत्र्यावर रोष

मत स्वातंत्र्या संबंधानें वाईच्या 'धर्म' पुस्तकाच्या एका अंकांत जो उल्लेख केला आहे तो फारच अतिशयोक्तीचा व एकपक्षीय आहे ही गोष्ट लोकांच्या चांगली लक्षांत येण्यासाठीं त्याचा थोडासा मासला खालीं दिला आहे:—

" मतस्वातंत्र्याचा उपयोग ह्मणून जो कांहीं होतो तो वडील मनुष्यांचा अनादर, देवब्राह्मणांचा उपहास, आचाराची थट्टा, साधूंचा अपमान, व्यासप्रभृति महर्षींची निंदा, चहा बिस्किटांचें सेवन, मांसभक्षण, मद्यसेवन, परस्त्रीशीं संभाषणादि व्यवहार इत्यादि गोष्टीमध्येंच होतो. पोषाख, शेंडी, केस वगैरे राखण्याचा प्रकार इत्यादि बाबतींतील आपले मतस्वातंत्र्य ऊर्फ आचारभ्रष्टता हीं आपल्या व्यक्तींचा समाज बनूं देत नाहीं. युरोपियन लोकांचेंच उदाहरण पहा— शिरवळी, पुणेरी अथवा मिरजी जोडे वापरणारे युरोपियन लोक नाहींत. पुणेरी बडोदेशाई अथवा इंदुरी पागोटीं घालून हिंडणारे साहेब लोक दृष्टीस पडत नाहींत. नागपुरी, शहापुरी, अमदाबादी किंवा चंदेरी उपरणी पांघरणारे गोरकाय आढळण्यांत नाहींत. येवल्याचे अथवा काशीचे कद अथवा पितांबर नेसून किंवा पाटावर बसून जेवणारे ख्रिस्तानुयायी कोणाच्या निदर्शनास येत नाहींत. लुगडीं चोळ्या वापरणाऱ्या युरोपियन स्त्रिया पहावयास सांपडत नाहींत कुंकूं लावून बाहेर पडलेली कोणतीही मडम दृष्टीस पडत नाहीं. ढोसले, छंद, जुंब्या वगैरे प्रकारच्या बांगड्या घातलेल्या युरोपियन स्त्रिया कोणाच्या पाहण्यांत नाहींत. व घागऱ्या, वाळे, वाकडीं ताईत वगैरे घालून रांगणारी किंवा हिंडणारीं युरोपियन पोरेंही नाहींत. परंतु आमच्याकडे मतस्वातंत्र्य बोकळल्यापासून व इंग्रजी शिक्षण सुरूं झाल्यापासून प्रत्येक कुटुंबांत कांहींना कांहीं तरी खेळखंडोबा ह्या बाबतींत झाला आहे आणि शांतता व ऐक्य ह्यांचा पूर्ण अभाव होऊन कुटुंबांतील व्यक्ति परस्परांविषयीं उदासीन आहेत. ह्या व अशाच प्रकारच्या गोष्टी सध्यांच्या मत स्वातंत्र्यांत येतात.

शुद्ध उदकावर तहान भागविण्याऱ्या कुटुंबांत मूत्रतुल्य सोडावाटर पिणारा मनुष्य उद्वेगजनकच होणार. मुकटा नसून जेवणाऱ्या लोकांत, सोंजी ह्मणून ओवळ्यानें भात खाणारा दुःखदायकच होईल. सदरे घालून जेवणाऱ्यांचें, मुकटे नेसून जेवणाऱ्याशीं कधीं पटणार नाहीं. कांहीं बाष्कळ पोरें विलायतेस जाऊन येतात आणि कुटुंबांत राहून दारू पितां येत नाहीं ह्मणून गांवा बाहेर राहूं लागतात; असलीं पोरें जगल्यानें पुत्रवत्व कायम राहण्यापेक्षां तीं जन्मास न आल्यामुळें निपुत्रिकत्वच कायम राहिलें असतें तर बरें; असें ह्या पोरांच्या जनक जननीला वाटूं लागतें. पोषाख, खाण्यापिण्याची पद्धति वगैरे गोष्टी आचारांत मोडतात व हा आचार जो, देशांत, गांवांत अथवा कुटुंबांत परंपरेनें चालत आलेला असेल तोच देशस्थांनीं, ग्रामस्थांनीं अथवा कुटुंबांतील व्यक्तींनीं स्वीकारला पाहिजे."

वरील विचार ह्मणजे मनुष्याच्या सारासार विचारशक्तीस अनिवार फाटा देण्या सारखेच आहेत. आणि असले विचार कितीहि स्पष्टोक्तीनें पुढें मांडले तरी ते कोणाहि विचारी मनुष्यास ग्राह्य होणार नाहींत इतकें सांगितलें ह्मणजे पुरें आहे.

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद शुद्ध १० शेक १८२६

## लढाईची खबर

लायोयांगची रणभूमी शत्रूच्या रक्तानें मनसोक्त सिंचित करून लढाई देवी आतां थोडीशी विश्रांती घेत आहे. मुकडेन येथें रशियन लोकांनीं तळ दिलेला आहे आणि त्यांची पाउ शिवण्याचा जपानी लोकांनीं निश्चय केला आहे. तिकडे पाऊस असल्या-मुळें जपानी लोकांचा जरासा नाईलाज झाला आहे; परंतु पावसाची झडी संपेपर्यंत विश्रांती घेऊन नंतर मुकडेनकडे जपानी सैन्याचा मोर्चा फिरणार आहे. रशियन जनरल क्युरे-पॅटकीन याजपाशीं आणखी नवीन सैन्य व दारू गोळा, तोफा वगैरे सामुग्री येऊन पोहोंचली आहे. या वरून मुकडेन येथें एक चांगलेंच रणकंदन गाजेल असा तर्क आहे.

पोर्टआरथरच्या वेढ्या संबंधानें कांहीं विशेषशी बातमी नाहीं. परंतु जपानी लोक पोर्टआरथर घेण्याची लगट करीत आहेत आणि त्यांस वारंवार रशियन लोक मागें हटवीत आहेत. क्षणोक्षणीं पुढें पाऊल व पुन्हां पिच्छेहाट याच्याशिवाय मोठासा सामना झाला नाहीं.

मागील आठवड्यांतील लाओयांगची लढाई म्हणजे इतिहास बदलून टाकणारीच लढाई होय. जगाच्या इतिहासांत राष्ट्रांच्या गतीचा ओघ फिरवून टाकणाऱ्या अशा आजपर्यंत ज्या लढाया झाल्या त्या तोडीचीच ही लढाई झाली. ह्या लढाईंत पश्चिमेकडील एक सार्वभौम असें युरोपियन राष्ट्र दातीं तृण धरून पूर्वेकडील एका आशियाटिक यःकश्चित राष्ट्रापुढें शरण आलें ही गोष्ट विशेष लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. आज तागाईतच्या इतिहासांत पूर्वात्य राष्ट्रांनीं पश्चिमेकडील राष्ट्रास जित करून त्यास नम्र केल्याची कर्ण-कटु वार्ता कोठेंहि वाचण्यांत आली नाहीं. पण ही वार्ता ऐकल्यापासून प्रत्येक युरोपियन राष्ट्राच्या अंगांतील रक्त तापून गेलें असेल आणि युरोपियन राष्ट्राच्या कीर्तीस लाग-लेली ही काळिमा धुऊन टाकल्या शिवाय त्याचें मनास कधींहि स्वस्थता वाटणार नाहीं.

इतके दिवस आशिया खंडांत एखादें तरी राष्ट्र जिवंत आहे किंवा नाहीं अशी मोठीच शंका होती. आणि पांच सात वर्षांपूर्वी चीन व जपान या दोन राष्ट्रांच्या कलहांत इतर बाह्य राष्ट्रांस चंचुप्रवेशानें मुसलप्रवेश करण्यास उत्तमच संधी मिळाली. तों पर्यंत चीन राष्ट्रा संबंधानें इतर राष्ट्रांस जो थोडासा दरारा वाटत होता तो त्या काळीं सर्वस्वी लयास गेला. आशिया खंडांत चीनचें राष्ट्र आणि हिंदुस्थानचें राष्ट्र अशीं दोनच राष्ट्रें पुरातन काळपासून नावाजलेलीं व सुधारलेलीं होतीं बाकीच्या राष्ट्रांत कांहीं मोठेंसें कर्तृत्व नव्हतें. आणि हीं दोन्हीं महान् राष्ट्रें युरोपियन राष्ट्रांच्या पोटांत गेल्यावर पाश्चात्य राष्ट्ररूपीं सर्वभक्षक अग्नीच्या मुखांत इतर राष्ट्राची आहुती पडणें मोठेंसें कठीण नव्हतें. परंतु आशियांतील या राष्ट्रसंतर्पणाच्या राजसूययज्ञांत एकट्या जपा नानेंच आत्माहुती न देण्याचें धाडस केलें व त्याच्या प्रयत्नास चांगलें यशहि आलें. आजकाल जपाननें ह्या महाघोर यज्ञाचा उच्छेद मांडला आहे आणि आशिआ खंडांत अद्याप जीव आहे असें निदर्शनास आणून दिलें आहे.

यूरोपनें आशिआ खंडांची जी पादा-क्रान्ती चालविली होती तिला जपाननें चांगला-च आळा घातला आहे. लिओयांगच्या लढाईंत जपान जर चित झालें असतें तर त्याच्या बरोबर सर्व आशिया खंडहि चित होऊन पडलें असतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आशियांतील सर्व राष्ट्रें ह्मणजे नाम-धारीच राष्ट्रें आहेत. त्यांच्यांत कर्तुमकर्तुम अशी कांहीं शक्ती नाहीं. अशा प्रसंगीं जपा-ननें जी बाणी राखली तिचें महत्व शद्बानें सांगणें कठीण आहे. जपाननें आपल्या पराक्रमानें सर्व आशियास जागें केलें आहे. आशियाच्या सर्व राष्ट्रांमध्यें स्वातंत्र्याचा प्रखर अग्नी पेटवून दिला आहे; त्यांचे बाहु वीरश्रीनें स्फुरण पावतील अशी वीरश्री त्यांच्या रक्तांत ओतली आहे. जपानाचें सहाय्य करण्यास चीनचे लोक तयार झाले आहेत. अशा रीतीनें आशियाटिक राष्ट्रांनीं एका जुटीनें दिग्विजयास प्रारंभ केल्यावर आशियांतील कोणचें राष्ट्र पुन्हां जिवंत होणार नाहीं ?

तिबेटचें जें मोठें थोरलें मिशन होतें तें एकदांचें संपूर्ण झालें. तिबेटच्या राजनगरींत इंग्रजांनीं आपली पायधूळ झाडली आणि तिबेटास पवित्र केलें हे उपकार तिबेटच्या हातून फिटतील किंवा नाहीं याची शंका आहे. इंग्रजांनीं तिबेटांतील लढाई संपवून सर्वत्र शांतता केली. तिबेटी कैद्यांस बंधमुक्त केलें. तिबेटी लोकांस पंचपक्वान्नाचीं भोजनें दिलीं. त्यांचा मोठा दरबार भरवून त्यांना तहनाम्यावर सही करण्यास लावून त्यांचा मोठा गौरव केला. तिबेटी लोकांना इंग्रजांनीं आपले दोस्त असे ह्म-णवून जवळ केलें. तिबेटच्या लोकांनीं इंग्रजांच्या मिशनला आड येऊन त्याप फार त्रस्त केलें होतें तरी इंग्रज लोकांनीं त्यांचे सर्व अपराध पोटांत घालून त्यास आपल्या छत्रा खालीं घेण्याचें पूर्ण आश्वासन दिलें ही गोष्ट त्यांच्या मनाचा मोठेपणा व्यक्त करीत आहे.

तिबेटी लोकांना इंग्रजांच्या मैत्रीचा जो अपूर्व लाभ झाला आहे तो त्यांनीं कधींहि गमावूं नये. इंग्रजासारखा स्नेही मिळाल्यावर तिबेटास कोणत्याहि इतर राष्ट्राचें भय धर-ण्याचें कारण नाहीं. खुद्द तिबेटच्या राज्यांतहि कोणी बंडाळी करण्यास समर्थ होणार नाहीं. असेंच इंग्रजांच्या दराऱ्याचें सामर्थ्य आहे. इंग्रजी सुधारणा हळूहळू तिबेटांत सुरू झाल्यावर हिंदुस्थाना प्रमाणें त्यासहि सायुज्यता, समीपता, सलोकता आणि स्व-रूपता अशा चारहि मुक्तींचो क्रमाक्रमानें प्राप्ती होऊन त्याचे जन्मास आल्यासारखें सार्थक होईल.

पण तिबटचे लोक इतके कृतज्ञ असतील काय ? त्यांच्यावर उपकार करणारे जे इंग्रज लोक त्यांचा ते विश्वासघात करणार नाहींत कशावरून ? ह्या कलियुगांत विश्वास-घातकीच लोक फार निपजले आहेत. तिबेटास कोणी दुष्टानें त्रास देऊं नये ह्मणून मुद्दाम तेथें इंग्रज लोक आपला एक मोठा रेसिडेंट ठेवून ते तेथून परतणार आहेत. परवांच्या दरबारांत, आह्मी सांगतों त्या प्रमाणें तुह्मी वागत जा, नाहीं तर तुमे-च्यावर अरिष्ट येईल असा कळकळीचा उपदेश यंग हसबंड साहेबांनीं केला आहे पण हा उपदेश त्या रानवट लोकांस कित-पत रुचेल कोण जाणे ! इंग्रज लोकांच्या उपकृतीचें महत्व त्यांस कळण्या इतकें विचार-तारतम्यहि त्यांच्या ठिकाणीं नसेल ! आपल्या राज्यावर हे इंग्रज लोक चालून आले, ह्यांनीं आपल्या दलाईलामास पळविलें, आपल्या शांततेचा भंग करून आपल्या लोकांचा रक्तपात केला, आपला देश वि-टाळून टाकला, आपलें स्वातंत्र्य हिरावलें इत्यादि प्रकारचे कुविचार त्यांच्या मनांत शिरून ते इंग्रजाशीं बेमानकी करण्यास प्रवृत्त होतील. ईश्वरा, असले दुष्ट विचार त्यांच्या मनास न शिवतील असें कर आणि त्या तिबेटी लोकांस सुखी ठेव !

## पीकपाणी.

पीकपाण्याची आबादानी सांगण्याचा सुमुहूर्त आला आहे ही मोठी आल्हादाची गोष्ट होय. दुष्काळाची कहाणी सांगण्याची राक्षसी पाळी पत्रकाराची दृष्टी सैरावैरा फिरवून अंध करीत होती, इतक्यांत आनंदघनानें पत्रकारांचें कार्य किती रमणीय केलें याची कल्पना त्या त्या पत्राच्या प्रकाश-कालाच माहित ! गेल्या सात आठ दिवसांत पूर्वा नक्षत्राचा चतुर्थ चरण व उत्तरा नक्ष-त्राचा प्रथम चरण या दोन चरणांमध्यें सर्व महाराष्ट्र, गुजराथ, काठेवाड, मध्यप्रांत, मध्य इंडिया इत्यादि मोठमोठ्या भागांत विपु ल पर्जन्य झाला आणि त्यानें दुष्काळाचीं उद्भूत लक्षणें अस्तास नेलीं व इंडियाचा हा मोठा भाग भावी धान्यसमृद्धीच्या आशेनें आनंदित केला आहे. पंजाब, संयुक्तप्रांत रजपुताना, वऱ्हाड, खानदेश, भडोच, अम दाबाद, काठेवाड, कर्नाटक, मद्रास इत्यादि भागाकडून येणाऱ्या पर्जन्याच्या वार्ता लोकां च्या प्रसन्न चित्ताची चांगली साक्ष देतात. भूमी प्रांतावरील जोमदार लहान मोठीं रोपें हालूं लागतात तेव्हां पृथ्वी आनंदानें डोलत आहे असा भास होतो आणि हा भास मनाला मोठा आल्हाद देतो. आजच्या मित्तीला सर्वत्र पीकपाण्याची हालहवाल फार समाधानकारक आहे आणि ईश्वर कृपेनें असाच सोन्याचा दिवस अनु-भवाला येवो !

## मल्लक्रीडा

तालीम, पहिलवानी, जोरकसीचे खेळ इत्यादि नानाविध गोष्टी मल्लक्रीडा या शद्बानें नीट संबोधल्या जाण्या सारख्या आहेत. हल्लींच्या विद्यार्थी मंडळीला या मल्लक्रीडेची गोडी रा. रा. क्यांडी साहेब इन्स्पेक्टर वऱ्हाड यांनीं फार चांगली लाविली आहे आणि त्यांनीं या प्रांतांत मल्लक्रीडा समाज नांवाची एक, संस्थाहि स्थापित केली आहे. तरुण पिढ्यांची शरीरिक संपदा वाढवावी असा या संस्थेचा मूळ हेतू आहे. होतकरूं मंडळी शरीरानें ताकदवान कसलेली व जोमदार असावी हें फार अग-त्याचें आहे. सध्यांच्या पिढींत पुष्कळशीं ऱ्हासाचीं कारणें विद्यमान आहेत आणि ह्मणूनच तरुण विद्यार्थीचीं शरीरें सदृढ, बळकट व उत्साहपूर्ण होतील अशा सर्व गोष्टी आह्मांस पाहिजे आहेत. हल्लींचा नामर्द पणा भावी पिढ्यांस फार बाधक होण्याचा संभव आहे. शरीराची काठी चांगली मजबूत असेल तरच त्या आयुष्याची सर्व मजा आहे. आयुष्यांतील सर्व कार्यें शरीराच्या सामर्थ्या-वर चालावयाचीं असतात व ह्मणूनच शरीर संपदेची महती फार मोठी आहे. वऱ्हाडांती ल विद्यार्थ्यांमध्यें शरीर संपदेची लालसा चांगली जागृत आहे इतकेंच नाहीं तर कधीं कधीं कुमार श्रीहरभामजी सारखे थोर पुरुष अशा गोष्टी अग्रोदर हातीं घेत असतात. बुलढाणें जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची मल्लक्रीडा त्यांच्या पुढाकारामुळें मलकापुरास येत्या अनंत चतुर्दशी पासून तीन दिवस पाहण्यास मिळणार आहे. येत्या शुक्रवारीं शनवारीं व रविवारीं मलकापुरास विद्यार्थ्यांचे नानाविध खेळ होणार आहेत आणि त्या वेळेला कुमार साहेब मुद्दाम हजर राह-णार आहेत. कुमार साहेबांची ही आस्था व कळकळ ध्यानांत धरण्यासारखी आहे आणि त्यांच्या कृतीचें अनुकरण इतरत्र जरूर व्हावें असें आह्मी मना पासून इच्छितों.

विद्यार्थ्यांचें शारीरिक शिक्षण असें व्हाव-याला पाहिजे कीं मर्दुमकीच्या गोष्टी त्यांना जलदी ग्रहण करितां येतील. विद्यार्थ्यांच्या व्हालंटिअर पलटणी निघाल्या पाहिजेत. आणि या दृष्टीनें विद्यार्थ्यांच्या शरीरास कवाईत मिळूं लागली ह्मणजे अलिकडील विद्यार्जनापासून होणारी शरीराची झीनही नाहींशी होईल. आह्माला तर अशी भिती वाटते कीं, सरकारानें व्हालंटीअर पलटणी काढण्याची परवानगी जरी कष्टानें दिली तरी आमची तरुण मंडळी शरीराच्या बेढब बांध्यानें, कमकुवतपणानें, व ऱ्हासकारक अल्पायुष्यानें त्या कामाला देखील नालायक ठरतील. विद्यार्थ्यां-ची शरीरकांती मनाला आल्हाद देणारी पाहिजे, कारण ती आमच्या राष्ट्राची खरी खरी शोभा आहे. तरुण मंडळी मल्लक्रीडा खेळत असताव तेव्हां क्षणभर त्यांची ती ईर्षा, उत्साह, व सर्व जगाला जिंकणारी महा तृष्णा हीं किती तरी मनाला आल्हाद देतात ! विद्यार्थ्यांच्या क्रीडास्थल्या पासूनच राष्ट्राची भावी राज्यश्री उभारावयाची असते; तेव्हां असलीं हीं क्रीडास्थळें मोठीं उद्दीपक होतील, वीरश्रीचा रस अंगीं खेळवतील आणि इतर विद्या संपादण्याची उत्साहशक्ती देतील अशाच प्रकारें रमणीय असलीं पाहिजेत. अशा कामीं कुमार श्री-हरभामजी यांनीं मलकापुरास पुढाकार घेत-ला आहे आणि तीन दिवस ते आपला काल अंशतः विद्यार्थ्यांच्या क्रीडा मैदानांत घालविणार आहेत या बद्दल आह्मी त्यांचे विशेष धन्यवाद गातो.

### महोत्सव

श्रीमंगलमूर्तीचे महोत्सव दृष्टीस पडतात तेव्हां कालचक्राच्या फेऱ्याला आनंदाची गती मिळाली आहे असें वाटतें. हा सांवत्सरिक महोत्सव दर वर्षाला येतो तेव्हां पृथ्वी नवीन हिरव्या गार परिवेषानें सर्वत्र प्रसन्न मुद्रा दर्शविते आणि लोकवृंदही श्रीगजाननाचे महोत्सव करून ऋद्धि सिद्धी प्राप्त करून घेतात हे वार्षिक उत्सव जीवनयात्रा रमणिय करितात इतकेंच नाहीं तर हे उत्सव ह्मणजे एका प्रकारची आरामस्थानें आहेत. या उत्सवांत आपल्या वृत्ती तल्लीन केल्या पाहिजेत ह्मणजे ईश्वरभजनाच्या अनुपम सौख्याचे लाभ होतात. याच सौख्याच्या दृष्टीनें हे महोत्सव आपण सर्वांग सुंदर करण्यास शिकलें पाहिजे.

श्रीमंगलमूर्तीचे उत्सव उत्तरोत्तर फार चांगले होऊं लागले आहेत. आमच्या प्रांतांत या उत्सवाचें निर्मळ व रमणीय स्वरूप विशेष खुलाशानें दृष्टीस पडेल. हल्लीं ह्या महोत्सवाचें जें सार्वजनिक रूपांतर होत आहे तेंहि अधिक गौरव करण्या सारखें आहे. आमच्यामध्यें एकीचे अंकुर अधिकाधिक दिसून येतात. निराळीच संघशक्ती बनत चालली आहे. आमच्या उत्सवांत मुसलमानांचा मत्सर नाहीं किंबहुना ते आमच्या महोत्सवांत अंशतः तरी मिळून मिसळूनच राहतात. निरनिराळे मेळे केशरी रंगाचीं कौपिनें बांधून श्रीमंगलमूर्तीच्या नामाचा गजर करीत करीत सर्व पेठा दणाणून देतात तेव्हां त्या भजनाचा प्रेमा कोणाच्या मनांत ईश्वराचें संनिधान जागृत करणार नाहीं बरें! कोठें मंत्रजागर. कोठें कथापुराणें, कोठें सुश्राव्य व्याख्यानें इत्यादिकांच्या मंगल नादांनीं सर्व आकाश कोंदलें आहे असा आभास होतो. जुने शास्त्री, पुराणिक, हरिदास इत्यादिका प्रमाणेंच आमचे अधुनिक अग्रणी रा. रा. अण्णासाहेब महाजनी सारखे गृहस्थ आपल्या बोधप्रद वक्तृत्वानें श्रोतृमंडळास आनंदित करण्यास उद्युक्त झालेले असतात हें विसरतां कामा नये. आमच्या येथील महोत्सवाचें हें सार्वजनिक स्वरूप विशेष अभिनंदनीय होय.

### पानसुपारी

मेजर मॉडवी साहेब गेल्या बुधवारीं येथून गेले तेव्हां त्यांच्या सन्मानार्थ येथील टौन हालांत मुद्दाम पानसुपारी करण्यांत आली होती. साहेब बहादूर अंतःकरणाचे कृपाळू आहेत; आणि त्यांच्या दोन तीन महिन्यांच्या सहवासांतच ते चांगले लोकप्रिय झाले. अधिकाराची प्रौढी ते बिलकूल मिरवीत नसत आणि लोकांस प्रेमळ बुद्धीनें ते आपलेसे करीत असत हें रा. रा. नारायण काशिनाथ दाते बी. ए. यांनीं पानसुपारीच्या वेळीं विशद रितीनें सर्वांस विदित केलें. अधिकाराची श्री मोठी असतेच पण तिच्या पेक्षां लोकमान्यतेचीच श्री अधिकाराच्या श्रीला फार शोभा आणिते. अधिकारी लोकांनीं आपला अधिकार गाजविण्यापेक्षां तो अधिकार लोकमान्य करण्यासाठींच प्रयत्न केला पाहिजे. मेजर मॉडवी यांचे दोष पुष्कळ असतील पण त्यांच्या सारखा प्रेमळ स्वभाव व अंतःकरणाची दया हीं अवश्य अधिकाऱ्यांना संग्रहणीय आहेत.

### कर्तव्याची दिशा

( एका मित्राकडून )

नुकतेंच अलवारच्या महाराजांनीं आपल्या एका संभाषणांत हिंदुस्थानांतील राजांच्या कर्तव्य कर्माचें सार सांगितलें. ते ह्मणालें कीं आह्मा राजांचे द्विविध कर्तव्य आहे. आपल्या सार्वभौम प्रभूच्या ठायीं दृढ निष्ठा ठेवणें हें आद्य कर्तव्य होय आणि दुसरें आपल्या राज्याचें व प्रजेचें हितचिंतन होय. येणेंप्रमाणें महाराजांनीं जी राजांच्या कर्तव्यांची फोड सांगितली ती आमच्या मतें चुकीची आहे. आमच्या राजे लोकांचे पहिलेंच एक कर्तव्य आहे. या खेरीज दुसरें कार्य त्यांच्याकडे नाहीं. प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टी करण्याचें आणि राज्य रक्षणाचे अष्टाधिकारहि इंग्रज प्रभूंनीं आपणाकडे घेतलेले आहेत. त्यांनीं आमच्या राजेलोकांना राज्यकारभाराची कटकट व चिंता फारशी ठेविली नाहीं. निःस्सीम भक्तिमार्ग जो आंखून दिला आहे त्याचें अतिक्रमण होऊं नये व ते भक्तिच्युत होऊन पापांत पडूं नयेत ह्मणून जितके कांहीं उपाय इंग्रजप्रभूंस सुचले तितके त्यांनीं योजिले आहेत. आणि आह्मांस आनंद वाटतो कीं, इंग्रजांच्या सदिच्छे प्रमाणें आमच्या राजांच्या अंगीं हा भक्तिभाव फारच चांगला बाणला आहे. तुकारामाची जशी ईश्वराच्या ठिकाणीं एकच तल्लीनवृत्ती झाली तशीच तल्लीनवृत्ती आमच्या प्रभूच्या ठिकाणीं आमच्या राजांची आहे आणि त्यांचें तें राजनिष्टेचें कर्तव्य ते उत्कृष्ट तऱ्हेनें बजावीत आहेत.

पूर्वीं सार्वभौमत्वाचें छत्र डोक्यावर नव्हतें तेव्हां मात्र आमच्या राजांना जीवापाड श्रम पडले. सर्वच कामें त्यांस स्वतां करावीं लागत असत आणि ते अत्यंत श्रमीकष्टी होत, व त्यांच्या हातून तीं जोखमीचीं अनंत कार्यें उरकतहि नसत. ही त्यांची दुःखद स्थिती पाहून इंग्रजांनीं त्यास आपल्या छत्रा खालीं घेतलें व त्यांच्या श्रमलेल्या आत्म्यास नुसत्या भक्तिभावाचा उपदेश सांगून त्यास शांती व विश्रांती यांची जोड दिली. आपल्या राजे लोकांनीं आपलें काय कर्तव्य आहे याची जागरुकता ठेवावी आणि भलतींच कामें आपलें कर्तव्यकर्म आहे असें समजून चुकी करूं नये ह्मणून आह्मी मुद्दाम सांगत आहों.

लोकांच्या हिताहिताच्या गोष्टी प्रत्यक्ष राजाधिराज प्रभूंनीं आपल्याच शिरावर घेतल्यामुळें त्या उत्कृष्ट होतील हें निराळें सांगणें नकोच. वारंवार अवर्षण होऊन दुष्काळ पडतात व लोकांची अन्नान्न दशा होते अशा समयीं खडी फोडण्याचीं कामें काढून त्यांचे कसे बसे तरी ते प्राण वांचवितात. प्लेगादि दुष्ट रोगाची साथ येते तेव्हां त्यास घरांतून बाहेर काढून रानांत राहण्यास सांगून औषधी देतात. त्यांच्यासाठीं आगगाडी, तारायंत्रें, पोस्टआफिसें, न्यायकचेऱ्या यांची चांगली सोय केली आहे. त्यांस वस्त्रप्रावरणें मिळण्यासाठीं खुद्द विलायती कपडा इकडे पाठवितात. त्यांचीं मनें रंजविण्यासाठीं अनंत कलाकुसरीचें पदार्थ त्यास आणवून देतात. त्यांस त्रास न व्हावा ह्मणून मोठमोठे पगार देऊन खुद्द युरोपियन लोक नोकर ठेविले आहेत. आपसांत लढाई मांडूं नये ह्मणून त्याच्या जवळची मनुष्याचा जीव घेणारीं शस्त्रें आपल्याच जवळ ठेवून घेतलीं आहेत. एवंच आपल्या लोकांनीं मोल मजुरी करून कष्टानें पैसे मिळवावेत व सुखानें अर्धी ओली कोरडी भाकरी खावी ह्मणून त्यांनीं काय काय व्यवस्था केल्या आहेत याची कल्पनाहि आपणांस येणार नाहीं. इतकी काळजी वाहणारे आपले सरकार आपल्या पाठीवर असल्यावर आपणांस त्यांचे गुणानुवाद गाण्या पलिकडे काय कर्तव्य आहे?

पण आपल्या लोकांस कांहींच कळत नाहीं. ते उगीच कॉंग्रेस व कानफरंन्से मरवितात, मोठमोठीं लेक्चरें व व्याख्यानें देतात; वर्तमान पत्रांतून अनेक लेख लिहितात ही त्यांची केवळी चूक होय. ह्या असल्या उठाठेवींनेंच राजद्रोहाचे अपराध त्यांच्या हातून घडतात व त्यास शिक्षा भोगावी लागते. कायदे कौंसिलांत आपले लोक असावेत; आपल्या लोकांस मोठ्या नोकऱ्या मिळाव्यात; आपल्यास स्वराज्याचे हक्क असावेत इत्यादि महत्वाकांक्षा आपणांस कशाला पाहिजेत? देशाभिमान देशस्वातंत्र्य यांची हाव आपणांस नको आहे. एकट्या स्वातंत्र्याची लालूच हा एक जहाल मद्याचा पेला होय. हा एकदां अंगांत उतरला ह्मणजे त्याची निशा कशानेंहि कमी होत नाहीं. ह्या निशेच्या पायीं रणकंदनें माजलीं आहेत; अंगावर कांटा येईल इतके रक्ताचे पूर वाहिले आहेत आणि शेवटीं स्वातंत्र्य स्वातंत्र्य असें ओरडत ओरडतच महाशूर वीर पुरुषांचे प्राण गेले आहेत. तर असल्या ह्या भयानक गोष्टीचा आपणांस संस्पर्श व विटाळ न होईल अशी मनाची साधुवृत्ती आपण ठेविली पाहिजे. नको तें स्वराज्य, व नको तें स्वातंत्र्य सौख्य!

मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयंकरः

## वऱ्हाडवृत्त

हवामान—— पावसानें सर्वत्र संतृप्ती करून सोडली. एकंदर पाणी २३ इंच पडलें. कपाशी, जवारी, तूर इत्यादि पिकें चांगलीं जोमदार आहेत. प्लेगाचा उपद्रव जळगांव व तेल्हारा येथें चालूं असून इलिचपूर व वाशिम या जिल्ह्यांतही तुरळक चालूंच आहे. सार्वजनिक आरोग्य इतर बाबदींत समाधानकारक आहे.

रा० रा० रुस्तुमजी फर्दूनजी वाचा डेपुटी कामिशनर यांनीं या जिल्ह्याचा चार्ज गेल्या बुधवारीं घेतला. स्पेशल ड्यूटीचें काम संभाळून ते डेपुटी कमिशनरीचें काम करीत आहेत. मुलकी सरक्युलरांचें परिचालन करण्याचें कार्य कंटाळा आणणारें व मनुष्याला जडत्व आणणारें आहे. तेव्हां या कार्याला जिल्ह्याच्या अंमलदारीचें कार्य जोडण्यांत आलें ही गोष्ट कर्तबगार, मेहनती व उत्साहशील अधिकाऱ्याच्या स्वभावाला अनुरूप अशीच होय.

रा. रा. शेख महमद इस्मायल एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, सिव्हील जज्ज, आकोला यांची बदली उमरावतीस झाल्याविषयीं सरकारी ग्याझिटांत हुकूम प्रसिद्ध झाला आहे. ही बदली पूर्वींच आह्मी प्रसिद्ध केली होती पण तिला आज दोन महिने तहकुबी देण्यांत आली होती; आणि त्यामुळें उमरावतीची सिव्हील जज्जची कचेरी बंदच होती ह्मटलें तरी चालेल.

जानेफळ तालुका मेहकर येथील सावकार रा. रा. गोविंद पुंजाप्पा आप्पा मिटकरी यांनीं श्रीमहादेवावर दुधाचा महारुद्राभिषेक करविला व नगरभोजन दिलें. समाप्तीच्या दिवशींच पर्जन्यवृष्टी होऊन सर्वत्र आनंद व साक्षात्कार वाटला. आप्पासाहेबांनीं एक सुंदरसें देऊळ, धर्मशाळा व विहिर बांधून या सार्वजनिक कार्यासाठीं पांच सहा हजार रुपयांची जमीन तोडून दिली आहे ही फार स्तुत्य गोष्ट होय.

'संगीत द्यूत-विपाक' हें नाटक आह्माकडे ग्रंथकार रा. रा. धुंडिराज रंगनाथ शेंबेकर यांनीं यवतमाळाहून पाठविलें आहे. त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. पुस्तकाची छापणी वगैरे सुबक आहे. राजश्री धुंडिराज यांचा हा प्रथम प्रयत्न चांगला जमला असून कांहीं कांहीं पद्यें तर फार रमणीय वाटतात.

रा. रा. स्पान्सकी पोलिस सुपरिनटेंडंट हे रजेवरून परत आल्यावर वाशिम जिल्ह्याच्या कामावर रुजूं होतील.

आणि रा. रा. फेअरवेदर पोलिस सुपरिनटेंडंट वाशिम यांस या नंतर इलिचपूर जिल्ह्याला बदलण्यांत येईल.

येथील सिव्हील सर्जन लेफटेनंट फौलर हे गेल्या शुक्रवारीं चांद्याकडे रवाना झाले. व त्यांच्या जागीं डाक्टर सदरलंड हे रुजूं झाले आहेत. नवे सिव्हील सर्जन विशेष कडक दिसतात.

लेफटेनंट फौलर हे फार सात्विक व सुजन आहेत. त्यांची बदली आमच्या येथें कोणास आवडली नाहीं. यांनीं मूतखड्याचे, डोळ्याचे वगैरे प्रयोग येथें फुकट केले. आपल्या वैद्यकाचा व शस्त्रक्रियेचा लाभ ते मनोभावानें रुग्णमंडळीस देत असत हें त्यांस भूषणावह आहे.

मेळ्यांचें संमेलन—— येत्या बुधवारीं 'वतनदाराच्या' गणपती पुढें सर्व मेळ्यांची हजिरी होणार आहे. रात्रीं ८॥ वाजतां प्रारंभ होईल. राजश्री पंढरीनाथपंत खेळकर हे मोठ्या परिश्रमानें हा समारंभ उत्कृष्ट करणार आहेत.

रा. रा. नारायण कृष्ण भावे बी. ए. असि० मास्तर हायस्कूल यांनीं काल सायंकाळीं 'पाणी' या पदार्थावर व्याख्यान दिलें आणि कांहीं रसायनिक प्रयोगही करून दाखविले.

### वर्तमानसार.

**टोळासाठीं सोपा उपाय--** आमचे एक मित्र कळवितात कीं, टोळांस एरंडाच्या झाडाचा वास फार वाईट आहे. शेतांत कोणचेंही पीक असो त्यांत किंवा निदान चारी बांधांनें तरी २०-२५ एरंडीचीं झाडें लावावीत म्हणजे टोळ त्या शेताकडे जावयाचें सुद्धां नाहींत, हा उपाय फार स्वस्ता व सोपा आहे. मुद्दाम अनुभव घेऊन पहावा.

**खोटे दांत बसविण्याची युक्ति—** अलीकडे खोटे दातांची कवळी मिळते व ती तोंडांत बसवावी लागते. परंतु मॉस्को येथील दंतवैद्यानें जी युक्ति काढली आहे, तिच्या योगानें हे खोटे दांत खऱ्या दांतां प्रमाणेंच हिरड्यांत बसले जातात. जे दांत बसवायचे त्याच्या मुळांत खळगी करावयाची व जेथें दांत बसवावयाचा असेल, तेथें हिरडींत खळगी करून त्यांत तो दांत बसवायचा. थोड्याच दिवसांत हिरडीचें मांस वाढायला लागून तें दांताच्या मुळाशीं असलेल्या हिरडींत शिरतें व कांहीं दिवसांनीं तो दांत अगदीं घट्ट बसून जातो. ज्या खळगींत तो दांत बसवायचा ती खळगी नुकत्याच पडलेल्या दांतांनीं झालेली असो, किंवा पुष्कळ दिवस झाले असल्यामुळें ती जागा भरून आली असून त्या ठिकाणीं खळगी करावी लागली असो, हिरडीच्या मांसाची वाढ होण्यास अडचण पडत नाहीं. श्रीमान् वृद्ध गृहस्थास ही एक अजब चीजच प्राप्त झाली म्हणावयाची.

**अंधळी बहिरी पण विद्वान् स्त्रीः—** हेलनकेलर नांवाची एक आंधळी व बहिरी तरुण युरोपियन स्त्री केंब्रीज युनिव्हर्सिटीची बी. ए. ची परीक्षा सर्व सन्मानांसह पास झाली आहे. तिनें 'माझ्या आयुष्याची कथा' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. आणि त्याच्या आठ आवृत्त्याहि निघाल्या आहेत.

**सर्पाच्या विषावर औषधी दिली** नागपूर येथील महाराज बागेंत एका माळ्यास विषारी सर्प चावला होता. त्यास सिताबर्डी येथील कुटी डिस्पेन्सरीवरील डा. बानर्जी यांनीं योग्य उपचार करून बरें केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. माळ्यास चावलेला सर्प फार विषारी होता असें असून डा. बानर्जी यांनीं त्यास बरें केलें, हें त्यांस भूषणावह आहे.

**वकिलावर जुलूमः—** पोरबंदर संस्थानांतील सर्व वकिलांनीं दरसाल संस्थानास १० रुपये भरून 'स्टेट गॅझेट' चे वर्गणीदार झालेंच पाहिजे असा हुकूम संस्थानांतून काढण्यांत आला आहे म्हणतात.

**असें कां:—** मुंबईच्या राजाबाई टावरवर लोकांस फुकट जाऊं देण्यांत येत असे, तें या पुढें दोन आणे फी घेऊन जाऊं देण्याचें ठरलें आहे.

**कुत्र्याकडून वाघ मारविलाः—** कोल्हापूर येथें नुकताच एक जंगली वाघ पकडून आणिला होता, त्यास उघड्या मैदानांत सोडून अश्वारचा रहिवासी किफायतुल्ला यानें गांवठी कुत्र्यांकडून मारविलें ही मौज पाहण्यासाठीं हजारों लोक जमले होते. वाघास पाहून कुत्र्यांनीं मिळून माघार न घेतां त्याच्यावर तुटून पडावें म्हणून वरील इसमानें त्यांस एक वनस्पती हुंगावयास दिली होती असें तिकडील पत्रावरून समजतें.

**जबर पोहणारा–**

बर्गेस नांवाच्या एका फ्रेंच मनुष्यानें इंग्लंड व फ्रान्स यांच्यामधील खाडी पोहून जाण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. फ्रान्सच्या किनाऱ्यापासून फक्त ३ मैल अंतर राहिलें असतां त्यास उचलून घेण्यांत आलें. परंतु तो फार जलद पोहला. ९ तासांत २२ मैल तो पोहून गेला. त्या वेळीं समुद्र शांत नव्हता. आजपर्यंत इतक्या लांब इतक्या जलद कोणी पोहला नाहीं.

**लोकोत्तर चमत्कार–** इंद्रठाणें नामक गांवांत गेल्या नागपंचमी पासून दोन गव्हाळे नाग आले आहेत. एक भराटीचे झाडावर असतो व एक पळसाचे झाडावर असतो. लोक त्यांना हात लावितात व षोडषोपचारीं पूजा करितात. दररोज बरीच यात्रा जमते लोक नवसहि करतात. हे नाग एकमेकांजवळ जातात आणि रंगहि बदलतात म्हणतात. काय असेल खरें कोणजाणें !

**काय हा चमत्कार–**

मद्रास इलाख्यांतील अर्काट गांवीं आज एक दोन आठवडे रोज संध्याकाळीं आकाशांतून तापलेले दगड पडत आहेत गांवांतील एका घरावर विशेष पडत असून त्याचीं दारें, खिडक्या बंद केल्या तरीही दगड वगैरे पदार्थ आंत शिरत होते, शेवटीं ह्या घरास आग लागली म्हणतात.

**शिक्षकाचा अनुभव–** मुलांना रात्रीचा वरी अभ्यास करावयास देऊं नये. म्हणजे त्याची दृष्टी कायम राहून अभ्यास चांगला होतो असें एका शिक्षकाचा अनुभव आहे. पण कोणीहि शिक्षक ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन वागेल असें वाटत नाहीं.

**१३० वर्षें वयाचा नोकर–** शेख इमामुद्दीन शेखमहंमद या नांवाचे एक गृहस्थ ब्रिटिश सरकारचे सर्वांत जुने मुसलमान नोकर आहेत. त्याचें वय १३० वर्षांचें आहे. ते मूळचे पंजाबी असून त्यांस उर्दू, फारशी, पंजाबी व अरबी अशा चार भाषांचें उत्तम ज्ञान आहे. हल्लीं ते कलकत्ता येथें फोर्ट वुइलियममध्यें असलेल्या १८ व्या पायदळ पलटणींत मौलवी आहेत व त्यांस आठ रुपये दरमहा पगार मिळतो. त्यांची उंची पांच फूट असून त्यांचें इतकें वय झालें आहे तरी ते सहज एखादी लहानशी मजल मारूं शकतात.

**आयानो लक्ष द्या–** एक बाई आपल्या लहान मुलासह पतियाला येथें जात होती. रस्त्यांत तिच्या निष्काळजीमुळें मूल गाडींतून बाहेर डोकावून पहात असतां एकदम गाडीबाहेर पडलें व गाडीखालीं सांपडून तावडतोब प्राणास मुकलें. बिचारी आई मुलाच्यामागोमाग उडी टाकण्याचा प्रयत्न करीत होती. पण तिला दुसऱ्या उतारू लोकांनीं तसें करूं दिलें नाहीं. लहान मुलांसह आगगाडींतून प्रवास करणाऱ्या स्त्रियांनीं या गोष्टीवरून सावध रहावें.

**पोट भरण्याची नामी युक्ति–** ज्यांच्या डोक्यास टक्कल पडलें आहे, अशा लोकांचें पोट भरण्याची एक नवीन युक्ति हल्लीं पारीस येथें अमलांत आली आहे. ती अशी कीं, डोक्याच्या ज्या भागावर टक्कल पडलें असेल, तेथें जाहिराती चिकटवून नंतर तसें डोकें उघडें ठेवून त्यास सार्वजनिक रस्त्यावर बसवावयाचें. त्या योगानें रस्त्याच्या लोकांस हा नवीन चमत्कार वाटून ते जाहिराती वाचतात व जाहिराती देण्याचें काम होऊन ज्याच्या डोक्यास जाहिराती लावतात त्याचा चरितार्थ चालतो. एक एक गोष्ट ऐकावी ती विलक्षणच!

**आठ वेळ लग्न करणारी स्त्री–** स्पेन देशांत लोग्रेनो नांवाच्या गांवीं एका स्त्रीनें आठ वेळ निरनिराळ्या पुरुषांशीं लग्न लाविलें. तिचें पहिलें लग्न तिच्या सोळाव्या वर्षी झालें होतें. पुढें दोन वर्षांनीं तिचा नवरा मेल्यावर तिनें दुसऱ्या पुरुषाशीं लग्न केलें. तो नवरा दोन वर्षांनीं मेल्यावर तिनें तिसरें लग्न केलें. याप्रमाणें लागोपाठ सात नवऱ्यांस या स्त्रीनें वाटेस लावून हल्लीं तिनें आठवा नवरा केला आहे. तिचा हल्लींचा आठवा नवरा एक उत्तम फोटोग्राफर आहे. त्यानें या नवऱ्याच्या मुळावर असलेल्या स्त्रीशीं लग्न लाविल्यामुळें त्याच्या आयुष्याचा विमा कोणतीही विमाकंपनी उतरीत नाहीं. या पायगुणी स्त्रीचें वय हल्लीं तीस वर्षांचें आहे.

**सुशिक्षणाची व्याख्या–** Education is not intended to make lawyers or physicians, soldiers or schoolmasters, farmers or artisans but men,

म्हणजे वकील वैद्य, शिपाई, पंतोजी, शेतकरी किंवा कारागीर या धंद्यांचीं मनुष्यें तयार होण्यासाठींच शिक्षण नाहीं आहे! तर "देशांत कर्ते पुरुष निपजावे हाच शिक्षणाचा खरा उद्देश होय !

**सुदाम्याचे पोहे—** या लेखा संबंधीं पुष्कळ विद्वान् लोकांचीं मनें खट्टू झालेलीं आहेत. हे लेख ग्राम्य व बाष्कळ कोट्यांनीं भरलेले असतात. अशा या पाणचट लेखापासून वाचकांच्या मनांत किळस मात्र उत्पन्न होते. तर असले लेख न लिहिण्याबद्दल लोकांची कळकळ जोडून विनंती आहे.

**प्लेगाचा अनर्थ—** जांबत प्लेगमुळें कित्येक गांवें व खेडीं इतकीं ओस पडलीं आहेत कीं, शेतांत उगवलेलें गेल्या सालचें पीक तसेंच तेथेंच पडून राहिलें आहे !

**देवाच्या चरणीं प्राण अर्पण करण्याचें फल–** कोईमतूर येथें एक नवराबायकोचें जोडपें देवदर्शनास गेलें असतां तेथें एकाएकीं देवाचे पायांवर आपले प्राण द्यावेत अशी उभयतांस इच्छा झाली. त्याप्रमाणें नवऱ्यानें बायकोचा गळा कापला; व नंतर आपला कापून घेतला ! बायको मेली; पण नवरा वांचला. त्याजवर खुनाचा व आत्महत्येचा खटला होऊन त्यास जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा झाली !

**अंगांत भूत आलें–** झांशी येथील एका बंगाली वकिलाच्या १८ वर्षांच्या मुलास कांहीं दिवसांपूर्वीं तीन भुतांनीं पछाडलें होतें. त्यांपैकीं एक भूत ५७ व्या बंडांत मेलेल्या एका इंग्रजी कप्तानाचें होतें. अंगांत आल्यावर मुलगा बोलूं लागला. त्यावरून असें समजलें कीं, झांशी येथील कत्तलींत झांशीच्या राणीचा मुळींच संबंध नव्हता. जिच्याविषयीं हें भूत फार आदरानें बोलत होतें. या भुताचेच सांगण्यावरून त्या मुलास अलाहाबादेंतील एका चर्चमध्यें नेतांच त्याच्या अंगांतील हीं पिशाच्चें नाहींशीं झालीं.

**पृथ्वीचें पोट फोडण्याची सल्ला—** पृथ्वीचे पोटांत काय आहे, याबद्दल अनेकांचे अनेक तर्क व सिद्धांत आहेत. पण मि. पार्सन्स नांवाचा इंजिनियर म्हणतो कीं, पृथ्वीस प्रत्यक्ष भोंक पाडूनच आंत काय आहे तें पाहावें ! पृथ्वीस १२ मैलांचें एक भोंक पाडावें; आंत हवा व गारवा कृत्रिम साधनांनीं उत्पन्न करावा; आणि आंत मनुष्यें पाठवावीं म्हणजे आंत काय आहे तें समजेल. असें विवर तयार करण्यास ८५ वर्षें लागून ५० लक्ष पौंड खर्च होतील, असा अंदाज आहे.

**शेपटाचीं माणसें—** बोर्निओमध्यें एका जर्मन प्रवाशास चमत्कारिक लोक आढळले आहेत. त्यांचें नांव फीरन असें असून ते फार साधे व प्रामाणिक आहेत. जिनसांची देवघेव नाण्यांत न होतां अदलाबदलानें होते. त्यांच्यांत चोरी कशी ती माहीत नाहीं ! विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, या सर्वांस त्यांच्या कंबरेजवळ शेपूट आहे !

**सर्पदंशावर मृत्तिकेचा उपायः—** कॅसर्टा शहरीं एक बाई गवत कापीत असतां तिच्या पायास साप चावला व ती बेशुद्ध झाली. तिच्या बापानें डाक्टराकडे नेलें पण त्यांनीं यावर आतां कांहीं औषध नाहीं म्हणून सांगितलें. बाप बिचारा निराश होऊन घरीं परत आला आणि तसाच चिंतेंत बसला असतां त्यास एकदम एक उपाय सुचला. ह्या उपायाची दंतकथा त्यानें ऐकली होती. त्याप्रमाणें त्यानें एक मोठा खड्डा खणला व त्यांत गळ्यापर्यंत त्या मुलीला त्यानें घट्ट पुरलें. असला अघोरी उपाय न करण्याबद्दल तेथील पोलीस अधिकाऱ्यांनीं त्यास मनाई केली पण त्यानें त्यास मुळींच जुमानलें नाहीं. पुढें २४ तासांनीं त्या मुलीला मातींतून वर काढलें व पहातात तों मुलगी चांगली बरी झालेली दिसली. ही गोष्ट खरी घडल्याबद्दल तेथील अधिकाऱ्यानें सर्टिफिकिट दिलेलें आहे. ह्या गोष्टीवरून सर्पदंशाचें विष उतरण्याचा मृत्तिकेच्या अंगचा हा अद्भुत गुण दृष्टोत्पत्तीस आला आहे. याचा अनुभव विद्वान् डाक्टर लोक घेतील तर सर्व जनतेचा मोठा फायदा होणार आहे.

## नोटीस

रा. रा. व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर एडिटर वैदर्भ छापखाना उमरावती यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं; पेठ उमरावती बुधवाऱ्यांतील मारुतीचे देवळा जवळची तीन मजले हवेली ही तुह्मी वैदर्भ छापखाना ठेवण्याकरितां व राहण्याकरितां भाडें दरम्हा १६ रुपये प्रमाणें महिन्याचे महिन्यास किराया देण्यचें कबूल करून घेतली त्याचें भाडें माहे सप्टेंबर तारीख ११ सन १९०४ पावेतों ३२३ रुपये ४ आणे ३ पै. शिवाय पडीत महिन्याचे व्याज मिळून घेणें निघाले आहेत ते तुह्मास अनेक वेळां मागितले असतां दिले नाहींत ह्मणून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आज तारखेपासून १० दिवसाचें आंत निघालेली रक्कम व्याजासह देऊन आमची रसिद घ्यावी तसें तुह्मी न केल्यास दिवाणी कोर्टात दावा आणला जाईल. व याच इमारतीचें संबंधानें पुढें असेंही कळविण्यांत येतें कीं तुमच्या राहण्यापासून मकानाची वारंवार दुरुस्ती होऊन दुरुस्त करण्याचा खर्च वारंवार फाराच लागलागत असतो. या पासून इमारतीचें नुकसानही होण्याचा संभव आहे. यामुळें पुढें आह्मी भाड्यानें ठेवणें इच्छीत नाहीं करितां सदरहु लिहिलेले मुदतींत आमचें मकान खालीं करून द्यावें तसें तुह्मी न केल्यास आमचे जें कांहीं नुकसान होईल तें व्याज व खर्चासह वसूल केलें जाईल असें समजावें. कळावें. तारीख १३ माहे सप्टेंबर सन १९०४ इ.

सही
गोपाळराव मुकुंद बुटी दुकान
उमरावती तर्फे विठ्ठल
व्यंकटेश मुनीम

## जाहिरात

### अल्प किंमतींत मोठा लाभ

खालीं लिहिलेलीं बोधपर, मनोरंजक, मोक्षमार्गदर्शक, चित्तवेधक व अगदीं नवीन पुस्तकें छापून तयार आहेत. तरी जिज्ञासु व मुमुक्षु लोकांनीं अवश्य मागविण्याची त्वरा करावी. खालील कोणतींहि पुस्तकें एकदम एक रुपयाची घेतल्यास टपाल खर्च माफ.

| पुस्तकाचीं नांवें | किंमत | ट० ख० |
|---|---|---|
| आत्मबोधामृत | ०—। | ०॥ |
| श्री सद्गुरुप्रासादिक अभंग | ०= | ०॥ |
| श्री व्यंकटेशाष्टक | ०। | ०॥ |
| श्रीरामप्रासादिक जिवन्मुक्तेचे अभंग | ०= | ०॥ |

पुस्तकें मिळण्याचा पत्ता— व्ही. बी.
हेड मास्तर मु० असलगांव
जि. आकोला वऱ्हाड.

## जाहिरात.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, आमचा विडीचा व्यापार पुष्कळ वर्षांपासून चालू आहे, परंतु आमच्या व्यापारास कमीपणा आणण्याकरितां व माल लोकांस नापसंत होण्याकरितां कांहीं दुष्ट बुद्धीच्या लोकांनीं बऱ्याच खटपटी केल्या त्यापैकीं झीनाभाई बेचरदास मुक्काम मलकापूर प्रांत वऱ्हाड यानीं आमच्या नांवाची खोटी लेबलें खोट्या मालावर लावून आमचे नांवानें माल विक्री करून बरेच दिवस आपला उदरनिर्वाह केला. परंतु आह्मी त्यास सुमारें सोळा महिन्यापूर्वीं मलकापूर येथें धरून त्याजवर सदर कृत्याबद्दल फौजदारी खटला केला. या कामांत त्यांस कैद व दंड या प्रमाणें शिक्षा झाली असून त्याच इसमानें पुन्हां तसेंच खोटें काम गेल्या कार्तीक महिन्यापासून सुरू करून माल विक्री करीत होता. करितां त्यास पुन्हां आह्मी मलकापूर येथें पकडून त्याजवर फौजदारी खटला केला त्यांत त्यास तारीख २८ माहे जून सन १९०४ इ० रोजीं सहा महिने सक्तमजूरी व ५०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली तरी अशीं खोटीं कामें करून मालविक्री करणारांनीं व आपल्या नांवाचा खोटा माल घेणारांनीं सावध रहावें. तरी आमचे नावाचा माल घेणारे ठोक व्यापारी लोक यांनीं व किरकोळ घणारे इसम यांनीं सदर ट्रेडमार्क रजिस्टर नंबर व आमचे नांव पाहून माल घेत जाणें.

सही—बाळाराम पुलया द० ख०
सही— गुंडाप्पा नसाप्पा दस्तुर
येलप्पा नरसप्पा.
शुक्रवारपेठ कामाटपुरा,—पुणे सिटी.

## कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु पेबलनें माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा
ठिकाणा— कॉटन मार्केटा समोर
कच्छी बाजार, आकोला.

मराठी भाषेंतील सर्वोत्कृष्ट पुस्तक

झांशी संस्थानच्या महाराणी

## लक्ष्मीबाई साहेब ह्यांचें चरित्र

इ० स० १८५७ च्या बंडामध्यें अद्वितिय शौर्य गाजवून प्रसिद्धीस आलेल्या ह्या स्त्रीरत्नाचें सविस्तर व साधार चरित्र. हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय होऊन त्याची गुजराथी, बंगाली, कानडी, हिंदी वगैरे भाषांमधून भाषांतरें झाली आहेत. इ. स. १८५७ च्या बंडासंबंधाचा मनोरंजक इतिहास ह्या पुस्तकाप्रमाणें मराठींत दुसऱ्या कोणत्याही पुस्तकांत आजपर्यंत आलेला नाहीं. पुस्तकाची छपाई व बांधणी सुंदर असून त्यांत झांशीच्या राणीचें चित्र व इतर चित्रें घातलीं आहेत. पुस्तकाची किंमत रु० २।८; ट० ह० व व्ही० पी० खर्च ०४

पत्ताः— डी. बी. पारसनीस,
[ सातारा. ]

## जाहिरात

लक्ष लावून एक वेळ वाचा ! वाचा !!

एम. एम्. ॲन्ड सन्स

फोटोग्राफर रबर स्टांप मेकर वॉच रिपेरर आणि स्टेशनरी मरचंट आकोला [वऱ्हाड]

आज पर्यंत कोणत्याही कंपनींनी इमीटेशन रासकोप अपना या नांवाचे घोड्या किमतींत विकली नसेल तो आह्मी रुपये ६ मध्यें ग्यारंटी वर्षें ५ ची देतो आहे. तर त्वरा करावी आणि घड्याळाबरोबर काच, कमान, पेटी आणि याचे बरोबर घड्याळें घेणाराचे नांवाचे रबरी पेनपेनसील स्टांप तयार करून पाठवूं आणि तीन घड्याळें घेणारांस व्ही. पी. खर्च माफ. व एक डझन घेणारास एक घड्याळ बक्षिस देऊं हे घड्याळ एक वेळ घेतलें तर पुनः १० वर्षें पर्यंत ब्यापास नको. आणि दर हर एक जातीचें घड्याळ किंवा हर एक जातीचें स्टेशनरी सामान माफक दरानें व सचोटीनें खात्रीलायक पाठवूं. या शिवाय रबराचे छप नांवाचे हर एक जातीचें करून देऊं. आणि रबर स्टांपाच्या नमुन्याकरितां अर्ध्या आण्याचे टिकीट पाठवावें ह्मणजे नमुना फुकट पाठवूं. आणि फोटो काढून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं येथें यावें. नाहीं पेक्षां आह्मांस बोलवावें. ह्मणजे आह्मी येऊं. आणि २५ रुपया पेक्षां जास्त माल घेणारास दर रुपयास ०८॥ अर्धा आण्या प्रमाणें कमिशन देऊं. आणि या शिवाय कांहीं विचारावयाचें असेल तर पत्र व्यवहार करावें ह्मणजे उत्तर देऊं. नाहींपेक्षां समक्ष येऊन भेटावें ह्मणजे समजेल. आणि कोणास छापील रबर बसायाला शिकणें असेल त्यानी यावें. शिकविण्या बद्दल फी रुपये १० पडेल. रबरस्टांप करितां हर एक गांवास एजंट पाहिजेत. कमिशन भरपूर मिळेल. या सर्व कामाची व सामानाचा मागणी करावी ह्मणजे खात्री होईल.

एम्. एम्. ॲन्ड सन्स आकोला.

### श्रीमद्भागवत दशमस्कंध

श्रीशिवकल्याणाच्या प्राकृत

ओवीबद्ध टीकेसहित

१

## कृष्णजन्म

( प्रथमपंचाध्यायी )

किंमत एक रुपाया ट. ख. दोन आणे.

ही पंचाध्यायी निर्णयसागर छापखान्यांत उत्तम मोठेदार कागदावर छापून तयार होत आहे. छपाई व बांधणी निर्णयसागरची आहे इतकें सांगितल्यावर ती उत्तम होईल हें निराळें सांगावयास नकोच. पृष्ठें दिवा अष्टपत्री साच्याचीं सुमारें २५० पृष्टें पूर्वे संकेताप्रमाणें पुस्तकें गणेश चतुर्थीला तयार होतील. श्रीशिवकल्याणाची टीका ह्मणजे मूळ श्लोकांचें रसभरित निरूपण असून तें इतकें चित्ताकर्षक आहे कीं, त्याची माधुरी प्रत्यक्ष चाखल्याशिवाय कळणारी नाहीं. आधीच भागवत ग्रंथ रमणीय, त्यांत दशमस्कंद रमणीयतर, त्यांत श्रीकृष्ण जन्म अतिमोहक आणि त्याला अलंकृत श्रीशिवकल्याणाच्या वाग्रसानें !

पुस्तकें पंढरपूर येथें आमचेकडे अथवा खालीं दिलेल्या पत्यावर विकत मिळतील.

डा० द० कृ० कोल्हटकर, आकोला (वऱ्हाड)
रा० रा० बा० गो० मेहेंदळ लायब्रेरिअन,
कोल्हापूर.
प्रो० नि० बा० रानडे बी. ए. सिताराम बिल्डिंग, फोर्ट मुंबई.
'महाराष्ट्र कवि' ऑफिस, ठाणें.
स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी, नागपूर
( अथवा असतील तेथें )

हायस्कूल, पंढरपूर
ता. २४।८।१९०४ } गणेश बळवंत मोडक संपादक.

ॐनमःश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ जाणली एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशो सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर ह्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुळाची खर जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, व अंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सार्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ०६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत राखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. राखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—— आलकडे २।३ वर्षे आंबरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूंस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी,

## आर्यौषधालय

( खामगांव- जळालपुरा )

आमच्या औषधालयांत ( दवाखान्यांत ) नाडी परीक्षा वगैरे अष्टविध परीक्षेनें रोगाचें निदान करून औषध योजना केली जाते. बाहेर गांवच्या रोग्यांनीं खुलासेवार प्रकृतिमान कळविल्यास त्यावरूनही अनुभवशीर गुणकारक औषधें पाठवूं. सर्व रोगांवर खात्रीचीं औषधें तयार आहेत; त्यां पैकीं मुख्य खालीं लिहिल्या प्रमाणें:—

सार्सापरिला— रक्तशुद्धि करणाऱ्या देशी व विलायती वनस्पतीं पासून हें औषध तयार केलेलें आहे. गरमी ( उपदंश ) पासून सर्वांगावर पुरळ उठणें किंवा काळे डाग पडणें, कच्चें रसायन अंगावर फुटणें किंवा त्यापासून सांधे दुखणें, सुजणें यावर हें अगदीं खात्रीचें औषध आहे. गरमी शिवाय दुसऱ्या कोणत्याहि कारणानें रक्त बिघडणें, कोरडे खरूज, कंडू, पुरूळ, गळ्याच्या वगैरे गांठीं सुजणें, संधिवात, ( सांधें दुखणें व सुजणें ) शरीराचा कोणताहि भाग दुखणें व जुना खोकला, गंडमाळा यांवरही ह्याचा उत्तम उपयोग होतो. किं० लहान बाटली १। रु. मोठी बाटली २॥ रु. पोस्टेज अनुक्रमें ।= व ॥·

धातुवर्धकगुटि—कामोद्दीपक गोळ्या पेक्षां ह्या गुटिका गुणांनीं फारच श्रेष्ठ आहेत; कारण कामोद्दीपक गोळ्यांनीं सप्त धातु न वाढतां विषय वासना मात्र वाढते; व त्यामुळें धातुचा फाजील व्यय होऊन त्या पासून धातु क्षीणता, धातुपातळ होणें वगैरे वाईट परिणाम होतात तसे ह्या गुटिकांनीं न होता सप्तधातु वाढून कामोद्दीपन ( विषयवासना ) होतें कोणत्याहि कारणानें आलेलें नपुंसकत्व अशक्तता, लवकर धातुपात होणें, स्वप्नांत धातुपात होणें वगैरे सर्व विकारांवर फारच उपयोगी किं० २९ गोळ्यास १ रु.

गरमी ( उपदंश ) वर गोळ्या—चट्टा. सुज, बद, पुरमी वगैरे सर्व विकार कितीही दिवसांचे असले तरी ह्या गोळ्यांनीं खात्रीनें बरे होतात. ह्यांत अपायकारक रसायनी औषध बिलकूल नाहीं, पथ्य विशेष नाहीं किं० ३० गो. रु. २

परम्यावर औषध— लवकरची जळजळ, तिडीक इ० २४ तासांत बरें होतात. किं० रु. १॥

बाळंत रोगावर औषध— हें अनुभवशीर खात्रीचें औषध आहे. किं० ३० गो. रु. ९

बालामृत— संग्रहणी, पंडु, अशक्तता, खोकला इ० विकारांवर मुलांना उपयोगी किं० दर बा. ·॥·

हिवताप व पानथरी यांवर औषधें-- प्रत्येक औषधास किं० १ रु.

भस्में, मात्रा, पाक, आसव वगैरे सर्व शास्त्रोक्त औषधें तयार आहेत त्यां पैकीं मुख्य:--

| | |
|---|---|
| अभ्रक भस्म- क्षय, खोकला, इ० | किं० दर तो. रु. १९ |
| लोहभस्म ( शतपुटी ) पंडु, अशक्तता इ० | ,, ,, रु. ३ |
| मंडूर भस्म-पंडु, संग्रहणी इ० | ,, ,, रु. १ |
| मधुमंडूर- वरच्याहून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| प्रवाळ भस्म नं. २ जीर्णज्वर, धातुविकार इ० | ,, ,, रु. १ |
| प्रवाळ भस्म नं० १ वरच्याहुन जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| सूत शेखर- पित्तविकार, मोंवळ इ० | ,, ,, रु. ४ |
| खोकल्यावर गोळ्या-खोकला दमा | ,, ,, ·॥· |
| सुवर्णमाक्षिक-धातुविकार जीर्णज्वर इ० | ,, ,, रु. २ |
| हेमगर्भ मात्रा- वात कफ इ० | ,, ,, रु. १८ |
| चंद्रप्रभा- मेह, मुरलेली गरमी इ० | ,, ,, रु. १॥ |
| सु० मा० वसंत-जीर्णज्वर, अग्निमांद्य इ० | ,, ,, रु. ६ |
| महायोगराज गुग्गुळ- सर्व वात विकार | ,, ,, रु. २ |
| रेचक गोळ्या ( जुलाब होण्यास ) | ३२ गो० रु. १ |

औषधें रोखीनें किंवा व्हो. पी. नें पाठवूं. पांच रुपयावर घेणारांस कमिशन. खुलासा पत्रद्वारें.

वैद्य वासुदेव शास्त्री गोडबोले
खामगांव ( वऱ्हाड )



## ORIENLTAL
### GOVERNMENT SECURITY
LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED,
Established 1874,
Head Office—**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED

## TWO CRORES AND TEN LAKHS
Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtaiued on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*



## मुंबई बँकची सेव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट



## जाहिरात

### स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
मनरक मरचन्टस्
काळबा देवी रोड
मुंबई.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. N

वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ०१
दुसरे खेपेस.... .... ....८१

All Subscriptions ... advance.
Single copy .................. 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line :2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 26 SEPTEMBER 1904 NO 38

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २६ माहे सप्टेंबर सन १९०४ इ० अंक ३८

### नोटीस

वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम १५० अन्वयें

आकोले म्यु० हद्दींत भाड्याच्या गाड्या व जनावरें या संबंधीं खालील नियम आकोले म्यु० कमिटीनें करण्याचें योजिलें आहे.

ह्या नियमांचा विचार आकोले म्यु० कमिटी ता० २० आक्टोबर नंतर करणार आहे. ह्या नियमांस हरकती करण्याचे असल्यास अगर सूचना करण्याच्या असल्यास या त्यांनीं वरील तारखे पूर्वी कमिटी चे सेक्रेटरी यांजकडेस लेखी कराव्या.

W. L. Chiplonkar

आकोला ता.१०।९।१९०४ } सेक्रेटरी म्यु० क० आकोला,

### नियमांचा मसुदा

आकोला म्यु० कमिटीचे हद्दींतील भाड्याच्या गाड्या आणि जनावरें यांचे मालकांनीं परवाना घेणें, व अशा गाड्या व जनावरें यांचे भाड्याचे दर, व त्यावर लादावयाचें ओझें, या संबंधीं वऱ्हाड म्यु० कायद्याचें कलम ११६ (१) अ. ब. आणि (२) या अन्वयें केलेल्या नियमांचा मसुदा.

१ आकोला म्युनिसिपाल कमिटीचे हद्दींतील भाड्याच्या गाड्यांच्या अगर जनावरांच्या मालकांनीं कमिटी कडून अगर कमिटीनें अधिकार दिलेल्या इसमाकडून परवाना घेणें जरूर आहे. सदर्हू परवाना खालीं नमूद केलेली फी अगाऊ घेऊन देण्यात येईल.

| वर्णन. | वर्ष किंवा वर्षाचा भाग सहा महिने पेक्षां अधिक मुदतीचा | सहा महिने किंवा त्याहून कमी मुदतीचा |
|---|---|---|
| उतारू नेण्याकरितां परवाना दिलेल्या. | | |
| चार चाकी गाडी | ८ | ४ |
| दोन चाकी गाडी | ५ | २८ |
| प्रत्येक जनावर | २ | ८८ |
| ओझें नेण्याकरितां परवाना दिलेल्या. | | |
| चार चाकी गाडी | ८ | ४ |
| दोन चाकी गाडी | ५ | २८ |
| प्रत्येक जनावर | २ | ८८ |

नोट—भाड्याच्या गाड्या व जनावरें याबद्दल सदर्हू प्रमाणें परवाना घेतल्यावर परवानाच्या मुदतीबद्दल कलम ४१ (१) अ. (क) अन्वये बसविलेल्या गाडी जनावर पट्टीचा आकार द्यावा लागणार नाहीं.

२ उतारूं नेण्याकरितां परवाना दिलेल्या कोणत्याही भाड्याचे गाडींत ओझें नेण्याची मर्यादा खालीं दिले प्रमाणें आहे.

| | | |
|---|---|---|
| खानदेशी साधी दमणी अथवा तांगा. | उतारूं | ४ |
| खानदेशी मोठा दमण | उतारूं | ८ |
| दोन घोड्याची गाडी | उतारूं | ४ |
| एक घोड्याची गाडी | उतारूं | ३ |
| चार चाकाची मोठी गाडी किंवा आमनिबस | उतारूं | ८ |

वरील संख्येमध्यें गाडी हाकणारा येत नाहीं.

३ ओझें नेण्याकरितां परवाना दिलेल्या गाडींत १४ चवदा मणापेक्षां अधिक ओझें नेऊं नये.

| | | |
|---|---|---|
| एक मण | = | ४० शेर |
| एक शेर | = | ८० तोळें |

ओझें नेण्याकरितां परवाना दिलेल्या गाडीचा उपयोग एकादे वेळीं उतारू नेण्याकडे केला तर त्या गाडींत ६ सहा उतारू पेक्षां अधिक उतारूं नेऊं नयेत;

४ गाडी हाकण्याचें कामीं योग्य आहे असे बद्दलचा परवाना घेतल्याशिवाय कोणींही परवाना दिलेली गाडी हाकूं नयें.

५ म्युनिसिपल आकाउंट नियमांतील नियम १३५ व १३६ यांत दर्शविलेल्या रिती प्रमाणें कमिटि परवान्याचे नमुने वगैरे व रजिस्टरें उपयोगांत आणील.

६. परवाने वार्षिक अथवा सहा माही मुदतीचे दिले जातील. वर्ष तारीख १ एप्रील ते ३१ मार्च पर्यंतचे समजलें जाईल. पहिली सहा माही तारीख १ एप्रिल ते ३० सप्टेंबर व दुसरी सहा माही ता. १—१० ते ३१—३ अखेर समजली जाईल.

वर नमूद केलेल्या मुदती शिवाय इतर मुदतीचा परवाना दिला जाणार नाहीं.

७ म्युनिसिपल कमिटीकडे केव्हांही अर्ज करून नवीन परवाना मिळवावा अथवा जुना परवाना नवीन करून घ्यावा. तथापि सदर्हू बद्दल प्रथम अर्ज, हे नियम अंमलांत येतील त्यावेळेपासून एक महिन्याचे आंत, केला पाहिजे.

८ गाड्यांच्या अगर जनावराच्या मालकांनीं अथवा ज्याचे ताब्यांत सदर्हू गाडी अथवा जनावर राहील त्यांनीं आपला परवाना, एकादे माजिस्ट्रेट, पोलीस, अथवा कमिटीचा अधिकारी अथवा कमिटीचा नवकर (ज्यास तपासणीचा अधिकार दिला आहे) पाहण्यास मागतील तेव्हां त्यांना दाखवावा.

९ परवाना खराब झाला, फाटला किंवा हारवला तर त्याची नक्कल फी दिली असतां मिळेल. गाडीच्या परवान्याबद्दल फी ०८ व जनावराचे परवान्याबद्दल ८= आणे पडेल.

१० प्रत्येक गाडीवाल्यानें आपले डावे बाजूनें गाडी हाकावी आणि सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत गाडीस दिवा असावा.

११ भाड्याच्या सर्व गाड्या आणि जनावरें वर्षांतून दोन वेळां मार्च आणि सप्टेंबर या महिन्यांत कमिटीचे आफिसांत तपासणी करितां आणाव्या. सदर्हु तपासणी जनरल कमिटीने नेमलेली सब्-कमिटी करील.

कोणतीही गाडी अगर जनावर भाड्यानें चालण्याचें कामीं योग्य असल्याशिवाय त्या बद्दल नवीन परवाना दिला जाणार नाहीं अगर जुना परवाना नवीन करून दिला जाणार नाहीं.

१२ ह्या नियमांचें उल्लंघन करणारे इसमाचा परवाना कमिटीचे सेक्रेटरी यांस सहा महिनेपर्यंतचे मुदतीकरितां तहकूब करितां येईल. मात्र सदर्हु तहकुबीचीं कारणें लिहून ठेवावीं.

सदर्हु मुदती नंतरही तहकुबीचीं कारणें चालू असल्यास जनरल कमिटीनें सदर्हू परवाना रद्द करावा ह्याचप्रमाणें गाडी किंवा जनावर भाडें वाहण्यास अयोग्य असेल तर गाडी किंवा जनावर दुरुस्त होऊन कामाला योग्य होई पर्यंत किंवा दुसरी गाडी किंवा जनावर आणीपर्यंत कमिटीचे सेक्रेटरी यांनीं त्या बद्दलचा परवाना तहकूब करावा.

एकादे गाडी किंवा जनावराचा परवाना तहकूब केला ह्मणजे त्या तहकुबीचे मुदतींत सदर्हु गाडी परवान्या शिवाय आहे असें समजलें जाईल. व अशा मुदतींत गाडी किंवा जनावर यांच्या मालकानें गाडी भाड्यानें चालूं ठेविल्यास त्यानें कलम १३ प्रमाणें गुन्हा केला असें समजलें जाईल. व ह्याप्रमाणें जो वारंवार नियमांचें उल्लंघन करील तो माजिस्ट्रेट पुढें मुकदमा शाबीत झाल्यास २० रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

१३ म्यु. कमिटीचे हद्दींत ह्या नियमांत सांगितल्याप्रमाणें परवाना घेतल्याशिवाय जो इसम भाड्यानें गाडी वाहील तो माजिस्ट्रेट कोर्टांत गुन्हेगार ठरल्यास २० रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

१४ ज्या इसमाचा परवाना नियम १२ प्रमाणें वारंवार तहकूब ठेवण्यात येईल अगर नियम १२ आणि १३ प्रमाणें ज्या इसमावर वारंवार गुन्हे शाबीत होतील अशा इसमास परवाना देणें अगर न देणें म्यु. कमिटीचे खुषीवर आहे.

१५ म्यु. कमिटीचे अगर म्यु. कमिटीनें या बाबतींत अधिकारी नेमले असतील त्यांचे परवानगी शिवाय परवान्यांत बदल करितां येणार नाहीं.

परवान्याचे मुदतींत गाडी अगर जनावराचा मालक बदलल्यास नवीन मालकानें मालकी बदलल्याचे वेळे पासून एक आठवड्याचे आंत कमिटीचे सेक्रेटरी याज कडेस लेखी अर्ज द्यावा ह्मणजे म्यु० सेक्रेटरी गाडीबद्दल ०८ आणि जनावराबद्दल दोन आणे फी घेऊन रजिस्टरांत व परवान्यांत जरूरीयात दुरस्ती करतील.

वर लिहील्या प्रमाणें ७ दिवसाचे आंत म्यु० कमिटीस खबर न देतां म्यु० हद्दींत गाडी किंवा जनावर भाड्यानें वाहील तो वर्षाची फी देण्यास पात्र होईल. व नियम १३ प्रमाणें मोकदमा होऊन गुन्हेगारीस पात्र होईल.

१६ विशेष करार केला नसल्यास म्युनिसिपल हद्दींत भाड्याचे दर खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत.

स्टेशन पासून गांवांत अगर पेठेंत.:—

| | शहर | पेठ |
|---|---|---|
| प्रत्येक उतारूंस | ....०१८६ | ८१ |
| स्वतंत्र बैलाची गाडी ४ माणसाची | ....०४ | ०३ |
| सहा माणसांची बैलाची गाडी | ८५ | ०४ |
| एका घोड्याची गाडी | ८५ | ८४ |
| दोन घोड्याचे गाडीस | ०६ | ८५ |

टीप:— एक तासाचें आंतील वेळे करितां

| | |
|---|---|
| एका स्वतंत्र गाडीस भाडे | ८८ |
| पुढील प्रत्येक तासास | ०८ |
| साहा तासाचे एका दिवसास | ३ रुपये |

टीप २:— मालाचे गाडीबद्दलचे दर गाडीचा मालक अगर हाकणार यांनीं व भाडे करणारा यांनीं आपसांत ठरवावें.

१७ आपली परवाना असलेली गाडी रोजाचे अथवा महिन्याचे करारानें भाड्यानें देण्यास गाडीचे मालकास ह्या नियमामुळें हरकत येणार नाहीं.

१८ एखादे इसमानें ठरलेलें भाडें देण्याचे कबूल केल्यास अथवा भाडे दिल्यास त्या इसमास आपली परवाना असलेली गाडी किंवा जनावरे कोणत्याही वेळी गाडीच्या मालकानें भाड्यानें दिले पाहिजे.

*HAIDAR ALI*
व्हाइस-चेअरमन
म्युनिसिपाल कमिटी आकोला.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य २ शके १८२६

## राष्ट्रीय सभा

राष्ट्रीय सभेची तयारी मोठ्या झपाट्यानें चालूं आहे. आणि मुंबईच्या वैभवाला शोभणारा असा हा श्रीमंती समारंभ टोलेजंग होईल असें रंगरूप दिसतें. वर्गणी आज मितीस ३० हजार रुपये जमली आहे आणि पुढील महिन्या दोन महिन्यांत ही वर्गणी एक लक्षावर जाईल असा अंदाजा आहे. राष्ट्रीय सभेला जो अवाढव्य खर्च लागतो. तो लक्ष्यांत घेऊन आणि तात्कालिक सुपरिणाम कोणताच दृश्यमान नाहीं हें पाहून एका प्रकारच्या निराशेनें लोकांच्या तोंडचे असेंही उद्गार ऐकूं येतात कीं, राष्ट्रीय सभा वगैरे सर्व थोतांड आहे आणि राष्ट्रीय सभा सर्वांगसुंदर असली तरी देखील राज्यकर्ते तिच्या अभिप्रायाला वजन देत नाहींत, तेव्हां राष्ट्रीय सभेचें दुकान आटोपावें व तिच्या निमित्त होणारा फंड एखाद्या राष्ट्रीय कलावृद्धीकडे लावल्यास तें काम शहाणपणाचें व दूरदर्शीत्वाचें होईल. वरील आक्षेपांत तथ्यांश नाहीं असें नाहीं. राष्ट्रीय सभेचे जे कर्णधार आहेत ते कांहीं कमी मुत्सदी आहेत असें नाहीं आणि त्यांच्या मनांत वरील विचार घोळत नसतील असें नाहीं. त्यांचे अंतश्चक्षु सर्वत्र फिरतात व इतक्या वर्षांच्या राष्ट्रीय सभेला गोड अमृत फळें यावींत ह्मणून त्यांचे अहर्निश प्रयत्न चालूं आहेत. राष्ट्रीय सभेची वकिली सरकारापुढें चालत नाहीं हें ओळखून राष्ट्रीय सभेंतील अग्रेसर संतमंडळींनीं औद्योगिक देशकार्याकडे आपल्या अमोघ शक्तींचा प्रवाह चालविला आहे, आणि राजकीय चळवळीला थोडीशी बाजूला सारली आहे हें वरवर पाहणारांच्या देखील लक्ष्यांत येईल.

खर्च फार होतो हें खरें पण तो कमी कसा करावा हें ठरविण्याचें काम फार चिकट आहे. राष्ट्रीय संस्था प्रपंचा प्रमाणें मोठ्या चातुर्यानें चालवाव्या लागतात. त्या संस्थेची इभ्रत कायम ठेवून खर्च कमी करण्याचा प्रयत्न चालूं आहे, आणि हळूं हळूं सर्व गोष्टी आपल्या आपणच सुयंत्रित करून घेतल्या पाहिजेत. राष्ट्रीय सभे सारख्या संस्था ज्या देशभक्तीच्या प्रेरणेनें चालल्या आहेत त्याच देशभक्तीला दुसरा विहित मार्ग दृष्टिपथांत येई पर्यंत चालूं क्रम सोडतां येत नाहीं. राष्ट्रीय सभेच्या खर्चा विषयीं डोकें फाडणें उपयोगाचें नाहीं. ती सम्यक् दृष्टी आपण सर्व व्यवहारांत चालविली ह्मणजे पुष्कळशा अडचणी आपल्या अनुभवाला येतील आणि होत असलेला खर्च अनिवार्य आहे असें पदोपदीं आढळून येईल.

आपण किंमत देतों त्यामपाणें फळ मिळत नाहीं ही गोष्ट ध्यानांत घेऊन आणि सरकारी कृपेची पुष्कळशी निराशा डोळ्या पुढें ठेवूनच औद्योगिक परिषदेचा क्रम राष्ट्रीय सभेनें चालूं केला आहे. यंदाच्या औद्योगिक प्रदर्शनाची संपदा कांहीं विलक्षणच दृष्टीस पडेल. मुंबईचे गव्हरनर साहेब या संस्थेला फार अनुकूल आहेत. आणि तारिख १० दिसेंबर रोजीं त्यांच्या हातून या प्रदर्शनाचा समारंभ साजरा व्हावयाचा आहे. श्रीमंत गायकवाड सरकार यांनीं पांच हजार रुपयांची देणगी दिलेली आहे ही गोष्ट सर्व संस्थानिकांनीं कित्या प्रमाणें डोळ्या पुढें ठेविली पाहिजे. प्रदर्शनाचा उपयोग मार्ग दाखविणाऱ्या स्तंभाप्रमाणें आहे. औद्योगिक प्रगतीची कार्यदिशा दाखविणारी प्रदर्शनें असतात आणि याच दृष्टीनें प्रदर्शनांनीं आमच्या देशाच्या कलाकौशल्याच्या प्रवृद्धीकडे लोकांचीं मनें आकर्षित व्हावीत अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

## मराठी क्रमिक पुस्तकें

आमच्या प्रांतांत जी मराठी वाचनमाला चालते ती बंद करून तिच्या ऐवजीं मध्य प्रांतांतील वाचनमाला सुरूं करावी अशा विषयीं शाळाखात्याचे मुख्य अधिकाऱ्यां कडून हुकूम सुटले होते. हा फेरफार आमच्या प्रांताला हितावह होणार नाहीं आणि वऱ्हाडांतील शाळांतून जी शुद्ध मराठी भाषा शिकवितात तिला नागपुराकडील अशुद्ध व भेसळ मराठीचें रूपान्तर येईल अशी मोठी भिति होती. त्या शिवाय इकडील वाचनमालेंत रयतवारी संबंधानें निराळे धडे आहेत ते या प्रांताला अवश्य पाहिजे होते. मध्य प्रांतांतील पुस्तकांतून मालगुजारी पद्धती विषयींचे पुष्कळ धडे आहेत ते आमच्या प्रांताला इतके आवश्यक नाहींत. आमच्या प्रांताची प्राथमिक तीन पुस्तकें अगदीं वेगळीं आहेत. तीं या प्रांतासाठीं मुद्दाम तयार केलेलीं आहेत तेव्हां त्यांस फांटा देण्यांत यावा हें बरोबर नव्हतें. चौथ्या क्रमिक पुस्तकापासून पुढील पाठमाला मुंबई इलाख्यांतली घेतली असून तिचा उपयोग या प्रांताला फार चांगला होतो. तेव्हां वऱ्हाडांतील चालूं वाचनपाठमाला बदलूं नये ह्मणून डायरेक्टर साहेबांकडे या प्रांतांतील सुशिक्षित गृहस्थांनीं मुद्दाम अर्ज पाठविला होता आणि प्रांतिक वर्तमानपत्रांतूनही मध्य प्रांतांतील क्रमिक पुस्तका संबंधानें प्रतिकूळ अभिप्राय गेल्या महिन्यांत प्रसिद्ध झाले होते. या प्रांतांतील लोकमताला विशेष पुष्टी आमचे इनस्पेक्टर राजश्री क्यांडी साहेब यांनीं दिली होती ही गोष्ट त्यांच्या सौजन्याला व दूरदर्शीपणाला अनुसरूनच झाली. वऱ्हाडच्या लोकमताविषयीं खुद्द डायरेक्टर मि० हिल्ल साहेब यांनीं आपली सहानुभूती प्रदर्शित केली आणि पूर्वीचा विचार बदलण्यांत आला ही परम संतोषाची गोष्ट होय. प्रसंगानुरोधानें आह्मी या बाबतींत रा० रा० रामचंद्र विष्णु महाजनी बी. ए. एल. एल. बी. यांच्या परिश्रमाचा उल्लेख मुद्दाम करितों. क्रमिक पुस्तका संबंधाची जी चळवळ झाली तिच्यामध्यें त्यांनीं अग्रकार्य आपल्या हातीं घेतलें होतें आणि त्यांच्या त्या प्रयत्नाला सुयश आलें ही आनंदाची गोष्ट होय.

मुंबई इलाख्यांतील क्रमिक पुस्तकांची परिचालना सरकारच्या हुकूमा खालीं चालूं आहे आणि हीं पुस्तकें चांगलीं सुधरण्यांत येतील तेव्हां त्या सुधारणेचा लाभ आपणांस सहजगत्याच मिळणार आहे. मुंबईकडील मराठी चौथें, पांचवें, सहावें व सातवें पुस्तक यांची जी सुधारलेली आवृत्ती तयार होत आहे तिच्या उभारणीच्या कामीं पुष्कळशी विद्वान् कार्यकर्त्री मंडळी निमग्न आहे. या मंडळीमध्यें आमच्या प्रांतांतील विद्वन्मुकुटमणी रा० रा० विष्णू मोरेश्वर महाजनी हेही एक आहेत. इलाख्यांतील पाठमाला जशी सुधारण्यांत येत आहे तशी वऱ्हाडची प्राथमिक तिन्हीं पुस्तकें सुधारण्यांत यावीं अशी आमची मनापासून इच्छा आहे. या पुस्तकांत पुष्कळशीं स्थळें दुरुस्त करण्यासारखीं आहेत आणि पहिलीं पहिलीं प्राथमिक पुस्तकें विद्यार्थ्यांस मनोहर वाटणासारखीं बाह्यतःहि पाहिजेत. आमच्या वऱ्हाडच्या पुस्तकांत अंतर्बाह्य मोहकपणा अधीक येईल अशी योजना शाळाखात्याकडून अवश्य झाली पाहिजे. हीं पुस्तकें सुधारून नवीन करण्याला एखादी मंडळी नेमण्यांत येईल तर विशेष हितप्रद होईल. रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी, हरी मोरेश्वर शेवडे, बाळकृष्ण लक्ष्मण बापट अशा सारखी पेनशनर मंडळी या कार्याला फार उपयोगाची आहेत आणि आह्मी अशी आशा करितों कीं, वऱ्हाडचीं क्रमिक पुस्तकें चालूं ठेवतांना तीं सुधारून उत्तमोत्तम करण्याविषयीं डायरेक्टर साहेब अवश्य प्रयत्न करितील.

## सारखा पोषाख

विद्यार्थ्यांचा पोषाख एक सारखा असावा असा डायरेक्टर साहेबांचा मुख्य आशय दिसतो; आणि या आशयाला अनुसरून सर्व शाळांतून तजावजी करण्यांत याव्या अशा विषयीं सरकारी आज्ञापत्रेंहि निघालीं आहेत असें कळतें. एक सारखा पोषाख डोळ्याला विशेष मनोहर वाटतो ही गोष्ट लष्करी कवाईत पाहण्यास गेलें असतां चांगली अनुभवास येते. लष्करी खाकी रंगाचा एकसारखा पोषाख, त्यावरील रंगी बेरंगी पट्टे वगैरेंनीं फार शोभायमान दिसतात. पोलिस, लष्कर इत्यादि खात्यांत एक सारख्या पोषाखाची महती विशेष आहे. पण हाच पोषाखाचा प्रकार शाळांतून सुरूं करावा अशाविषयीं मात्र लोकांच्या मतांची एकवाक्यता दृष्टीस पडत नाहीं. लष्करी बाण्याची दृष्टी शाळाखात्याला लागूं करावी ही गोष्ट पुष्कळास पसंत पडणार नाहीं. पोषाखाचा कायदा शाळाखात्याला नको आहे. विद्यार्थ्यांचा पोषाख चांगला स्वच्छ व ऐटदार असावा हें कोणीहि कबूल करील पण एकाच रंगाचा व एकाच नमुन्याचा पेहराव विद्यार्थ्यांमध्यें प्रचलित करावा अशी जरूरी आह्मांस दिसत नाहीं. किंबहुना विद्यार्थ्यांचा पेहराव चित्रविचित्र ठेविल्यापासूनच मनाला विशेष आल्हाद वाटेल. मातापितरांच्या दृष्टीला जो पोषाख आनंददायी वाटेल तो ते आपल्या मुलांस देतील. मुलांच्या पोषाखा संबंधानें आईबाप फार काळजी घेत असतात तेव्हां त्यांच्या त्या पेहरावामध्यें सरकारी खुषीचा विशिष्ट पोषाख दडपून देण्यांत यावा हें आह्मास पसंत वाटत नाहीं. आज पोषाखाच्याच संबंधानें सारखेपणा ठेवण्याचा हुकूम आहे पण उद्यां विद्यार्थ्यांच्या चेहेरपट्टी विषयींचा विशेष प्रकार सरकार निर्दिष्ट करील तर तोही अमलांत आणावा लागेल. आज टोप्या घाला ह्मणतील, उद्यां कंबरे पर्यंतचा कोट पाहिजे ह्मणतील, परवां बूट पाटलोणीचा निराळाच बूट निघेल तेव्हां ही सारख्या पोषाखाची कल्पना जितकी संकुचित राहील तितकें बरें असा आमचा समज आहे. चांगल्या नीटनेटक्या व स्वच्छ पोषाखाविषयीं सक्ती करण्यांत येईल तर ती सर्वमान्य होईल पण एकसारखा पोषाख शाळांतून चालूं करण्याचें प्रयोजन नाहीं. पोषाखच्या बाबतींत विद्यार्थ्यांच्या खुषीला प्राधान्य दिलें पाहिजे आणि आमचे राष्ट्रीय पोषाख टाकाऊ आहेत असें आह्मांस वाटत नाहीं. जसें ज्याला काम पडतें तसा त्याला पोषाख घालावा लागतो. कोणाला तुस्त, कोणाला ढिला, कोणाला तांबड्या रंगाचा, कोणाला शुभ्र रंगाचा, इत्यादि प्रमाणें जसा ज्याला पोषाख पाहिजे तसा त्याला घालूं द्यावा. सारांश, नवीन सारख्या पोषाखाचा बूट होईल तितका बाजूलाच सारण्यांत येईल तर फार बरें !

---

राजश्री हिल्ल साहेब डायरेक्टर, शाळा खातें यांची स्वारी गेल्या शुक्रवारापासून येथें आली आहे. हायस्कुलांतील विद्यार्थ्यांची कवाईत, ड्राईंग, लेखनपद्धती वगैरे पाहून डायरेक्टर बहादूर फार खूष झाले. इंग्रजी-मराठी शाळेसाठीं जी नवीन इमारत बांधावयाची आहे ती इमारत बांधण्याचें स्थळ निश्चित करण्यासाठीं तीन जागा पाहण्यांत आल्या; त्या पैकीं जी जागा पसंत होईल तिच्यावर शाळा बांधण्यांत येणार आहे. पुलाच्या पश्चिम भागांतील एखादी जागा सरकार देण्याला तयार आहे पण पुलाच्या पूर्वेकडील खुल्या जागा नंदनवनांतील स्थळाप्रमाणें पवित्र आहेत तेव्हां तेथें शाळेसाठीं इमारती बांधण्याची परवानगी सरकारांतून मिळण्या सारखी नाहीं आणि ह्मणूनच पुलाच्या पश्चिमेकडील एकादा भाग शाळेसाठीं पसंत करणें भाग झालें आहे. इंग्रजी–मराठी शाळेची जी नवीन इमारत व्हावयाची आहे तिच्यामध्यें विद्यार्थ्यांस राहण्यासाठीं वसतिगृहेंही बांधण्यांत येणार आहेत. ही योजना सरकारांतून मुद्दाम होणार आहे आणि विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवण्यासाठीं एका शिक्षकाची राहण्याची सोयहि तेथें करण्यांत येणार आहे. ही व्यवस्था तरुण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला फार लाभकारक होईल हें निर्विवाद होय. राजश्री हिल्ल साहेब पहिल्याच परिचयानें फार लोकप्रिय झाले आहेत. बोलून चालून प्रेमळ आहेत. आज ते येथील बाकीच्या शाळा तपासणार आहेत.

## लढाईची खबर

इतके दिवसपर्यंत लढाईची खबरबात लिहावयाची ह्मणजे रुसो-जपानी युद्ध आणि तिबेटची मोहीम यांची बातमी सांगावी लागत असे. खरोखरी पहातां तिबेटांत जें इंग्रजी मिशन गेलें त्याची हकीकत ह्मणजे लढाईची हकीकत नव्हे; परंतु तिबेटी लोकांच्या अज्ञानामुळें व हट्टी स्वभावामुळें मिशनला लढाईच करणें भाग पडलें आणि त्यामुळें या मिशनला तिबेटची मोहीम असें मलतेंच नांव प्राप्त झालें. तिबेटावरील स्वारी करण्याचें किंवा त्याजबरोबर युद्ध प्रसंग करण्याचें इंग्रजांच्या मनांत नसतां एकाकीं असा प्रसंग त्यांजवर ओढवला या गोष्टीस त्यांचा निरुपाय झाला. असो. सुदैवानें आतां यापुढें तिबेटची लढाई संपली आणि तिबेटांतील आनंदाची बातमी सांगण्याचा आजचा प्रसंग आला आहे. तिबेटी लोक इंग्रजांचे दोस्त झाले आहेत व त्यांनीं तहनामा लिहून दिला आहे. ह्या तहनाम्यांतील कांहीं शर्ती बाहेर आल्या आहेत त्या अशा—तिबेटनें ९ लक्ष पौंड खंडणी दाखल इग्रजांस द्यावेत. इंग्रज लोकांना मुख्य मुख्य शहरीं व्यापार करूं द्यावा. दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांस तिबेटांत बिलकूल थारा देऊं नये; त्यांस रस्ते, तारायंत्र किंवा रेलवे करण्याची परवानगी देऊं नये; तसेंच इतर कोणत्याही राष्ट्रास तिबेटच्या राज्य कारभारांत कोणच्याहि प्रकारें हात घालूं देऊं नये. इत्यादि अटी वाचून तिबेट देश इंग्रजांनीं आपल्या साम्राज्यास जोडला असा किंवा अशाच अर्थाचे आणखी कांहीं भलतेच तर्कवितर्क कोणी घेतील ही गोष्ट ध्यानीं आणूनच कीं काय खुद्द कर्नल यंगहजबंड यांनीं भर दरबारांत आपल्या मधुर वाणीनें सांगितलें कीं:—"तुमचा आमचा आतां तह झाला आहे. आतां विरोध उरला नाहीं. आणि पूर्वीचे गैर समज आतां दूर होऊन चांगली मैत्री झाली आहे." कदाचित कोणास शंका वाटेल कीं, तहाच्या शर्तींनीं तिबेटी लोकांच्या धर्मांत व अंतर्व्यवस्थेंत इंग्रजांनीं हात घातला; त्यांचा मुलुख खालसा केला, व पूर्वींची तिबेटावरील चीनची सत्ता झुगारून दिली परंतु असली शंका स्वप्नांतहि घेण्याचें कारण नाहीं ह्मणून कर्नल साहेबांनीं मुद्दाम स्पष्ट सांगितलें कीं, "ह्या शर्तींनीं तुमच्या धर्मांत ढवळाढवळ झाली नाहीं; तुमचा मुलुख खालसा करून घेतला नाहीं; तसेंच तुमच्या राज्यव्यवस्थेंत आह्मी आपला हात घातला नाहीं. आणि चिनी सरकारचें वर्चस्व आह्मी कबूल केलें आहे" बाह्य देशशीं व्यापार केला असतां आपल्या देशांतील व्यापारधंदा बुडेल अशी भीति कोणास उत्पन्न झाली असेल अशी शंका वाटूनच कीं काय त्यांनीं सांगितलें कीं "व्यापाराचें दळणवळण सुरूं होणें उभयतांसहि हितप्रदच होय. आणि हें दळणवळण जगांतील सर्व राष्ट्राशीं चालू आहे ह्मणून तिबेटाशींहि व्यापार सुरूं झाला पाहिजे" ह्यावरून इंग्रजाशीं व्यापार करणें किती हितप्रद आहे याचीसाक्ष चांगली पटेल. वरील गोष्टी सांगितल्या नंतर कर्नल साहेबांनीं, इंग्रजाशीं व इतर राष्ट्रांशीं तिबेटनें कसें वागावें व तसें न वागलें तर काय होईल ह्याबद्दल दोनच शब्दांत मोठ्या मार्मिकपणानें सांगितलें कीं:— "ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधीस तुह्मी मानमरातबानें वागविलें पाहिजे. आणि परराष्ट्राशीं तुमचें आजतागाईत जें वर्तन होतें तें सोडून दिलें पाहिजे" पुढें कर्नल साहेबांनीं तिबेटी लोकांस वचन दिलें कीं, हा तह आह्मी पाळूं आणि तुह्मांस पाळावयास लावूं. इतकें ही करून तुह्मी तह मोडल्यास किंवा इंग्रजी व्यापारास अडथळा केल्यास किंवा इंग्रजी मनुष्यास त्रास दिल्यास योग्य शासन करूं. तुह्मी आमच्या हिंदुस्थानांत आल्यास तुमचें आदरआतिथ्य करूं, तुमच्या पासून जकात घेणार नाहीं, आणि तुह्मास वाटेल तेथें जाण्यास व राहण्यास मनाई करणार नाहीं. शेवटीं, इंग्रजी लोकांशीं शत्रुत्व असणें आणि मित्रत्व असणें या दोन्ही गोष्टीचें पर्यवसान सांगून दरबारची यथासांगता केली. ते ह्मणाले कीं:— "इंग्रज लोक कडवे शत्रू आहेत पण ते उत्तम स्नेहीहि आहेत. तह मोडला वा ब्रिटिश राज्याचा अपमान केला तर आमच्या सारखे कडवे शत्रू नाहींत. ही गोष्ट तुमच्या अनुभवास येऊन चुकली आहे. आणि आतां तहाप्रमाणें वागाल तर आमच्या सारखे उतम मैत्र दुसरे कोणी नाहींत अशी तुमची खात्री होईल." येणें प्रमाणें कर्नल यंगहजबंड साहेबांनी तिबेट मिशनची इतिश्री मोठी गोड केली.

रुसो–जपांना युद्धाच्या बातम्या विशेष नाहींत. मुकडेन येथें लढाई होईल असा अंदाज आहे व त्या प्रीत्यर्थ उभयपक्षी तयारी चालू आहे. पोर्ट आरथर सर करण्याचा निश्चय कायम आहे पण हातघाईचा प्रसंग येण्यास अद्याप बराच काला वधी लागेल असा तर्क आहे.

## शिवजयंती

साऱ्या महाराष्ट्रांत असा एकहि हिंदू सांपडावयाचा नाहीं कीं ज्याला 'शिवाजी' हा शब्द प्राणप्रिय वाटणार नाहीं! आह्मा महाराष्ट्रीयांतील प्रत्येक मनुष्याचे कान त्याच्या पवित्र नांवानें भरून गेलेले आहेत; आमच्यांतील प्रत्येकाचें मुख त्या पुण्यश्लोक पुरुषाच्या धन्यवादानें पवित्र झालेलें आहे; त्या थोर महात्म्यानें ह्या महाराष्ट्रांत जन्म घेऊन आपला हा देश धन्य केला आहे! अशा थोर पुरुषाचा उत्सव करून, त्याचें नामस्मरण करून आणि त्याचें गोड गीत गाऊन कोणचा मनुष्य तल्लीन होणार नाहीं? शिवजयंतीचा उत्सव करण्यास आपणांस त्यानेंच प्रेरणा केली आणि ह्याच प्रेरणेनें परवां हिंदुस्थानच्या राजनगरींत शिवाजीचा उत्सव करण्यासाठीं हजारों बंगाली लोक मोठ्या भक्तीप्रेमानें एकत्र जमले होते. ह्या प्रसंगीं तेथील वक्तृत्व चतुर अशा नामांकित पुरुषांनीं आपल्या प्रेमळ संभाषणांत जो शिवरायाच्या गोपालकाल्याचा गोड प्रसाद वाटला तो थोडासा आज आह्मी देत आहों. ह्या प्रसादसेवनानें आपणांस सत्कर्म करण्याची उत्कट स्फूर्ति येवो, आपल्या अंगांत दृढ निश्चय बाणो, आणि आपल्या हातून स्वदेशाभिमानाची कांहीं कार्यें घडोत. अध्यक्ष सुरेंद्रनाथ बानर्जी ह्मांनीं सांगितलें कीं, शिवाजी उत्सव हा आपल्या राष्ट्रीय उत्सवापैकीं एक होऊन बसला आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

असले उत्सव ह्मणजे आपल्या देशाच्या प्रगतीचीं निशाणेंच होत. असे उत्सव आपणांस सन्मार्गाचे मोठे राजमार्ग दाखवितात. आणि अशा रितीनें आपल्या नैतिक सुधारणे बरोबर आपली राजकीय सुधारणाहि आपोआपच होते. आपल्याच देशांतील वीर पुरुष आणि स्त्रिया यांच्या गोड कथांनीं आपल्या मनांत जी कांहीं प्रेरणा होईल तशी सात्विक प्रेरणा दुसऱ्या देशांतील थोर लोकांच्या गोष्टींनीं होणार नाहीं. सीता, रामचंद्र, शिवाजी हीं नांवें हिंदु अंतःकरणांत जितका प्रेम पान्हा फोडतील तितका प्रेमा परकी थोर पुरुषांच्या नांवानें कधींहि उत्पन्न होणार नाहीं. आपल्या शिवाजीनें स्वदेशाभिमानाची आणि स्वार्थत्यागाची जी संपत्ति आपणासाठीं मागें ठेविली आहे तिचा सद्व्य करण्याची स्फूर्ति आपणा सर्वांस होवो!

## अतरगुलाब

पानसुपारीच्या वेळीं अत्तर गुलाबासारखीं सुगंधी द्रव्यें देण्याचा शिष्टाचार फार जुना आहे आणि हा दरबारांतील शेवटचा संप्रदाय आहे. सभा विसर्जन होण्याच्या वेळीं हा निरोपाचा पाहुणचार व आदरसत्कार असतो. तांबूल, पुष्पहार, पुष्पगुच्छ व अतर गुलाब हीं सुगंधी द्रव्यें वाटण्याची वहिवाट पिढीजादी आहे पण अलिकडे असा एक विलक्षण दुराग्रह होत चालला आहे कीं, साहेब लोकांस अतर गुलाब आवडत नाहींत, त्यांस लव्हेंडर वगैरेच विलायती सुवासिक पदार्थ अर्पण केले पाहिजेत आणि त्या साठीं अत्तर गुलाबाला फांटाच दिला पाहिजे. हा दुराग्रह फार चुकीचा आहे. या दुराग्रहा‍ला बऱ्याच पानसुपारीच्या समारंभांतून अग्रस्थान मिळतें. ही शोचनीय गोष्ट होय. हा दुराग्रह अगोदर फेंकून दिला पाहिजे. देशी अत्तरापुढें आह्माला विलायती लव्हेंडर वगैरे कांहीं नको, एवढीशी देशी अत्तराची क्षुल्लक बात्र आहे पण तिलाही आमची पांढरपेशी प्रतिष्ठित मंडळी तिलांजली देतात हें पाहून अति खेद वाटतो. आमच्या अत्तर गुलाबाचा असा अपमान होऊं नये आणि चांगलीं उंची अत्तरें लोकांनीं वापरावीं ह्मणजे त्यांची खुषबो खरोखर अनुभवण्याला सांपडेल. कोणी साहेब दरबारांत अतर गुलाब नको ह्मणेल तर त्याची रुष्टता पुरवली पण हा अत्तर गुलाबाचा जुना अधिकार कोणी काढून घेऊं नये अशी आमची मनापासून इच्छा आहे.

आमचे एक सन्मान्य 'प्रेक्षक' येथील श्रीमंगलमूर्तीच्या उत्सवा संबंधानें लिहितात कीं यंदाचे उत्सव फार उत्कृष्ट झाले. प्रत्येक उत्सवांत कांहीं तरी विशेष आनंदाची गोष्ट दिसत असे.

गेल्या बुधवारीं मेळ्यांचें संमेलन वतनदार गणपती पुढें झालें तेव्हां प्रत्येक मेळ्याच्या गायनवादनादि गोष्टींस गूण देण्यांत आले होते. गुणावगुण पाहून प्रत्येकीं रुपये ५, ३ आणि २ अशा तीन प्रतींचीं बक्षिसें देण्यांत आलीं. परीक्षकांनीं आपली पारंगतता किंवा सहृदय अभिज्ञपणा चांगलासा दाखविला नाहीं असा एकपक्षीय आक्षेप आहे पण 'प्रेक्षक' त्या आक्षेपास कांहीं महत्व देऊं इच्छित नाहींत.

'आनंदाश्रमां' तील सुंदर मखर, 'सार्वजनिक' गणपतिपुढील रांगोळ्यादी व रंगांचीं आसनें, 'वतनदार' गणपती पुढील देवळाचा देखावा व इतर टापटीप हीं फार प्रेक्षणीय होतीं. 'आनंदाश्रमां' तील भजनाचा समारंभ फार गोड होता. या भजनांत राजश्री रामभाऊ महाजनी यांचा पुढाकार होता ही प्रशंसनीय गोष्ट होय. विसर्जनाच्या दिवशीं अधिकाऱ्यांनीं उत्साहरंगाचा विशेष भंग केला. कित्येक गणपतीपुढें नटव्यांचे नाच झाले ही गोष्ट फार गर्हणीय होय. कांहीं कांहीं बाबदीत मोहरमांतील प्रकार दृष्टीस पडत होते ह्मणून प्रेक्षकांस विषाद वाटला.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—शरदृतूचा प्रारंभ ध्वनित करणारी थंडी किंचित् किंचित् पडूं लागली आहे. पहाटेला दंव चांगले पडतें. हस्त नक्षत्राचे कांहीं पाऊस पडतील तर फार बहार होईल. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे पण जळगांव व तेल्हारा येथील रोगराई अद्याप शमली नाहीं.

रा. रा. गाडविन आस्टीन आफि. कमिशनर यांची स्वारी इलिचपुराकडे वार्षिक तपासणीच्या कामासाठीं गेली आहे.

रा. रा. शेख महमद इस्मायल एक्स्ट्रा असि. कमिशनर हे आज रोजीं उमरावती कोर्टाचा चार्ज घेतील. हे गृहस्थ करारी, धर्मशील व पापभीरू आहेत. हे फार जुने, अनुभवी व स्वकार्यनिष्णात असे अमंलदार आहेत. यांच्या स्वभावांत व वाणींत कधीं अधीं कटुता दृष्टीस पडते पण एकंदरीनें अंतःकरणानें हे चांगले शुद्ध आहेत. यांस प्रतिवादीचे न्यायाधीश ह्मणत असतात आणि गरिबांची कदर करितांना त्यांची दृष्टी चकल्या सारखी होण्याचा संभव विशेष असतो.

रा. रा. चेंबरलेन इं. सि. स. असि. कमिशनर उमरावती यांची बदली चांदा येथें असि. सेंटलमेंट आफिसरच्या जागीं झाली.

रा. रा. गणेश बापूजी उटगीकर एक्स्ट्रा असि. कमिशनर हे रजेवरून परत येऊन उमरावती येथें सरकारी कामावर रुजूं झाले.

रा० रा० फ्रान्सिस डायरेक्टर आफ ल्यांड रिकार्डस हे ९ जुलै १९०३ पासून पेनशनदार झाल्या कारणामुळें खालील प्रमाणें बदल्या देण्यांत आल्या आहेत:—

| रा० रा० | बढतीचा हुद्दा. |
|---|---|
| मेजर कोलंब | डिपुटी कमिशनर वर्ग ३ |
| मेजर हेग | असि. कमि. वर्ग १ |
| करी | ,, वर्ग २ |

मेजर हेग असि. कमिशनर दुसऱ्या प्रांतांत गेल्यामुळें त्यांची बढती क्याप्टन मारिस यांस देण्यांत आली आहे.

**वैद्यांची धंदा ह्मणजे मुळावरची पोळी**—बलुचिस्थानांत एकाद्या वैद्यानें कोणा रोग्याला कांहीं औषध दिलें, तर तेंच औषध त्याला स्वतःलाही अगोदर पिऊन दाखवावें लागतें; तरच तें औषध खरें, नाहीं तर लबाडी असें समजलें जातें. त्याचा औषधोपचार सुरू असतां जर एकादा रोगी मेला तर त्या रोग्याच्या आप्तेष्टांना त्या वैद्याचा प्राण घेण्याचा हक्क असतो. हा हक्क फारसा कोणी बजावीत नाहीं, हें डाक्टर व हकीम यांचें सुदैवच होय. परंतु कांहीं बरें वाईट झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर नाहीं, असा जर अगोदर करार झाला असेल, तर मात्र त्या डाक्टरला भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु तसा कांहीं करार झालेला नसला आणि मयताचे आप्तेष्टांनीं मनावर घेतले तर मात्र डाक्तरांस मरणावांचून गत्यंतर नाहीं! आपल्या इकडेहि वैद्यानें प्रथम औषध घेतलें पाहिजे अशा राजवैद्याच्या दंतकथा आहेत.

**मुसलमानाचे येथें गणेशोत्सव**—खंडवा येथें एक मातीचीं चित्रें करणारा मुसलमान असून या वर्षी त्यांनीं कांहीं गणपती केले आहेत. या रहिम मुसलमानास श्री गणरायाचा कांहीं साक्षात्कार झाल्यामुळें त्यानें आपल्या घरीं श्री मोरयाचा उत्सव सुरू केला. ह्यालाच ह्मणतात कलीमहात्म्य!

**भविष्य**— इंग्लंड, हिंदुस्थान व काबूल यांस पुढील दिवस चांगले नाहींत; इंग्लिशांस प्रवास, वैरत्वामुळें चिंता व परावलंबन हीं भोगावीं लागतील; इंडियास अस्वस्थता, दैन्य आणि विरहादि दुःखें होतील; तिबेटि लोकांस आणखी २।३ वर्षें त्रास सोसावा लागेल; जपानास त्रास पडला तरी त्याचें यश व ऐश्वर्य वाढेल.

**चमत्कारिक संतती**—बोदवड ता. भुसावळ येथील राहणारे सुरजमल जेठमल मारवाडी यांचे ह्मशीस श्रावणशुद्धांत नरमादीचीं वोगारें झालीं. त्यांस दोन बाजूनीं दोन तोंडे व आठ पाय असून नाकडोळे वगैरे अवयव पूर्ण आहेत! त्यांचें पोट मात्र एक आहे. ही चमत्कारिक गोष्ट गांवांतील सर्व लोकांनीं व भुसावळच्या मामलेदारांनीं प्रत्यक्ष पाहिली.

अष्टीनजीक बांबर्डे ह्मणून गांव आहे; तेथील एका माळ्याचे ह्मशीस ता. १२।९।०४ रोजीं एक दुतोंडी वागर झालें. दोन्ही तोंडांस कानडोळे इत्यादि अवयव पूर्ण होते. पण धड एक व पाय चारच होते. एक तोंड पूर्वेकडे असलें तर दुसरें दक्षिणेकडे राही. हें वागर ओरडे तेव्हां दोनही तोंडांतून एकदम ध्वनी न निघतां आळीपाळीनें निघे. हें वासरूं दोन तीन तासांनीं मेलें; त्याचें कातडें काढून तें मुद्दाम आष्टी येथें ठेवलें आहे.

—कुटुंबांतील सात माणसांपैकीं एकानें अमीराचे सैन्यांत नोकरी धरलीच पाहिजे; त्या इसमास एक बंदुक वापरण्याची परवानगी मिळेल. याप्रमाणें अमीरानें लोक जमवून त्यांस तो लष्करी शिक्षण देऊं. जरूर पडल्यास गांवांतील घरेंकडे लोकच सैन्यांत सक्तीनें घ्यावे, असे आतां अमीरानें ठरविलं आहे.

**घोड्याचें प्रदर्शन**—अहमदनगर येथें ता. २७।२८।२९ आक्टोबर रोजीं घोड्याचें प्रदर्शन भरणार आहे. त्यांत जीं जनावरें उत्तम ठरतील त्या सर्वांस एकंदर २२०० रु. पर्यंत बक्षिसें वांटलीं जाणार आहेत. या प्रदर्शनांत जाणारीं जनावरें यांस रेल्वे भाडें कमी केलें असून जनावरांबरोबर जाणाऱ्या इसमांसही भत्ता मिळणार आहे. फार नामी गोष्ट होय.

**अमिराची तयारी**— जो सरदार १००० शिपाई घेऊन येईल त्यांस त्यांचा आफीसर नेमूं अशा प्रकारचा जाहिरनामा काबूलच्या अमिरानें लाविला आहे. अशा रितीनें चाळीस हजार सैन्य तो जमविणार आहे.

**मृत्तिकास्नान**—अंगास व डोकीस स्वच्छ काळ्या मातीचा चिखल लावून स्नान करण्याचा प्रघात गुजराथेंत फार दृष्टीस पडतो. चिखलांत अनेक क्षार मिसळले असल्या कारणानें त्याचा त्वचेवर उत्तेजक परिणाम होतो. असा चांगला अनुभव आहे.

**राकेलच्या विटा**—राकेल उर्फ केरोसिन तेलामध्यें सोडा, साफ्ट सोप वगैरे पदार्थांचें मिश्रण करून त्याच्या विटा बनविण्याची युक्ति नुकतीच निघाली आहे. नुसतें राकेल जाळून जितकी उष्णता मिळते, त्या पेक्षां ह्या विटांच्या योगानें, तिप्पट उष्णता अधिक मिळते.

—कलकत्ता म्यूझीयममध्यें दिल्ली दरबारच्या वेळीं लार्ड व लेडी कर्झन हत्तीवर बसून मिरवत गेल्याचें चित्र ठेवण्यांत येणार आहे. व या चित्राकरितां तेरा हजार रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**खिसे कापूची युक्ती**— न्युयार्क येथील शर्यतीचे मैदानांत जेथें लोक जमून पैजा लावतात तेथें त्यांनीं डायनामिटनें भरलेल्या केपा टाकून दिल्या. त्यावर लोकांचे पाय पडतांच एकदम बार उडूं लागले. तेव्हां लोकांत एकदम बडबड उडून ते सैरावैरा धावूं लागले व ह्या धांदलींत भामट्यांनीं आपला हात चालविला.

---

## जाहिरात

सर्व लोकांस या जाहीर लेखानें कळविण्यांत येतें कीं, आमची वडिलोपार्जित शेती व घर पिंपळगांवकाळे व पिंपरी येथील आमच्या भावजईच्या ह्मणजे सयीबाईच्या नांवानें असलेली ही कोणी गहाण, बक्षीस अगर खरेदी कोणापासून घेऊं नये. या इस्टेटीवर आमची मालकी आहे. या उपर कोणी आमच्या ह्या इस्टेटीसंबंधानें व्यवहार केल्यास त्याबद्दलची जबाबदारी ज्याची त्याजवर राहील. कोणी फसूं नये ह्मणून ही जाहीरात दिली असे. कळावें ता० २३।९।०४ इ०

सही

गोविंद पुरुषोत्तम पिंपरीकर

राहणार पिंपळगांवकाळे.

---

## नोटिशीचे उत्तर

नोटीस घेणारे रावजी वल्लद नारायण वढे राहणार आकोट यांसः-

खाली सही करणार बाबन वल्लद हनवती शिंपी राहणार आकोट. याजकडूनः—

नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी शुद्ध-वऱ्हाडी पत्राचे ता० ८-९-१९०४ चे अंकांत दिलेली नोटीस पावली. तुह्मी मला तुमचे हिश्याचे जमिनीचा ह्या सालचा निम्मे बटाईचा पट्टा लिहून दिला आहे. त्या प्रमाणें ती जमीन माझे ताब्यांतही दिली आहे. त्या जमिनीची मी किस्तगारी वगैरे करून ती जमीन मी माझे तर्फे दुसऱ्या इसमास बटाईनें दिली आहे. तुह्मी दिलेल्या नोटिशीनें माझा यंदाचे सालचा भाडेपट्टा रद्द होत तर नाहींच परंतु दुसऱ्याचे सांगण्यावरून तुह्मी माझे ताब्यास कांहीं हरकत केल्यास माझे होणारे पिकाचे नुकसानीचा दावा तुमचेवर करून खर्चासुद्धां रक्कम भरून घेईन. कळावें. तारीख २२-९-१९०४ इसवी.

सही.

बाबन वल्लद हनवती शिंपी

राहणार आकोट दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

बेमशी लक्ष्मण मोतीराम खडसे साहु राहणार नांदुरा ता० मलकापूर यांसः—

मी खाली सही करणार या लेखानें कळवितो कीं, नांदुरे येथील विठू वल्लद रावजी तेली याच्या मालकीचे घर आह्मी तुमच्यासाठीं तुमच्या सांगण्यावरून ७०० रुपयास खरेदी आमच्या नावानें ता० ६-४-०४ रोजी घेऊन नोंदूनहि घेतलें. पुढें तुह्मांस, तें घर खरेदी घेऊन आमचे ७०० रुपये आह्मांस द्या असें बरेच वेळां ह्मटले परंतु आतां उडवाउडवीच्या गोष्टी सांगतां. सबब ही जाहीर नोटीस देणें भाग पडले. तर आतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत वरील घराचें खरेदीखत आह्मापासून घेऊन आमचे सर्व रुपये आणि झालेला सर्व खर्च आह्मांस द्यावा. असें मुदतींत न कराल तर तें घर आह्मी विकावयास काढूं व जर नुकसानी आली तर त्याबद्दलची दिवाणींत फिर्याद करून अखेर निकाला पर्यंतच्या सर्व नुकसानीसह पैसे वसूल केले जातील. कळावें ता. २३।९।०४ इसवी.

सही

पांडू व. बुलाखी तेली राहणार

बडशिंगी पोस्ट व ता. जळगांव

वऱ्हाड दस्तुर खुद्द.

---

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार या कडून सर्वत्र लोकांस कळविण्याचें कीं माझा मुलगा नामे सूर्यभान वल्लद नारायण डुकरे राहणार वरफगांव तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें हा वाईट नादास लागलेला आहे व विनाकारण सावकार लोकांजवळून कर्ज काढून वाईट छंदांत पैसा खर्च करितो. याकरितां या नोटिसीनें जाहीर करितों कीं कोणीही सावकारांनीं वरील इसमासी देवघेव करूं नये. देवघेव केल्यास त्याचे पैशाचा जबाबदार मी किंवा माझी जिनगी नाहीं. शिवाय त्यानें माझे जिनगीचे संबंधानें गहाण, खरिदी अगर कोणत्याही प्रकारचा दस्ताऐवज लिहून देऊन रकम काढल्यास त्याची जोखीम माझेवर किंवा माझे जिनगीवर नाहीं. सावकारांनीं देणेंघेणें करणें ते पाहून करावें. मुलाचे कर्जाबद्दल मी कोणतेही प्रकारचा जबाबदार नाहीं. मुलगा वाईट छंदास लागल्यापासून मी माझे घरांतून काढून दिला आहे व हल्लीं तो वेगळा रहात आहे. ही नोटीस दिली सही तारीख १९ माहे सप्टेंबर सन १९०४ इसवी. दस्तुर कृष्णाजी परशराम राहणार नांदुरा.

सही

नारायण वल्लद विठोबा डुकरे राहणार मौजे वरफगांव तालुके मलकापूर निशानी खुद्द—हातची.

---

## नोटीस

नोटीस घेणारे— विठोबा बळवंतराव पाटील राहणार मौजे आंजी व पोष्ट राळेगांव ता० केळापूर जि० वणी यांसः—

नोटीस करणार रामा वल्लद रामा कोलाम राहणार सोनर्ली परगणे वाई तालुके केळापूर जिल्हा वणी सुमार सन १३१४ साल कारणे नोटीस करण्यात येते कीं मी पूर्वी तह्मास नोटीस ता० १२।११।१९०३ इ० पर्वी केली होती ती तुह्मी न घेतां परत केली. करितां तुह्मांस कळविण्यांत येते कीं तुह्मी मजला मुदतीपर्यंत देऊन दस्तैवज ता० १० माहे आगष्ट सन १९०३ इ० रोजीं लिहून घेऊन ता. ३१ माहे आगष्ट सन १९ ३ इ० रोजीं रजिस्टर करून घेतला त्या पैकीं भरणा गंगाजी वल्लद रोडबा यानें येण्याबद्दल दोन हजार २००० व नगदी रुपये ५०० पांचशें असें घरीं गेल्याबर देतो असें भू थाप देऊन रजिस्टरा समोर कबूल केले परंतु मजकडेस मुद्दतीच गंगाजी रोडबा याचे दोन हजार रुपये देणें फिरत नाहीं व तुह्मीही रुपये मजला कांहीं दिले नाहीं. करितां तुह्मांस नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत रुपये व माझे जनावरे गाई गोऱ्हे गंगाजी वल्लद रोडबा जवळ आहे ते देऊन माझी लेखी पावती घेऊन रजिस्टर करून घ्यावी. तुमचे साक्षी पावती कोणाचे हातानें लिहून घेतल्यास ते पावती रद्द समजली जाईल. मुदतींत रुपये व जनावरें न दिल्यास तुह्मावर दस्तैवज रद्द करण्याविषयीं योग्य कोर्टांत दावा केला जाईल. दुसरे मौजे सर्व पूर्ण रजिस्टरी गंगाजी पाटील यालकडून तुह्मी घेतले ते मजला दिलें नाहीं करितां ते दस्तैवज व माझा भरणा पूर्ण मजला देऊन माझी पावती लेखी रजिस्टरी करून घ्यावी तसें तुमचे कडून न झाल्यास तुह्मांवर दस्तैवज रद्द करण्याबद्दल दावा केला जाईल कळावें. १७ ता० माहे सप्टेंबर सन १९०४ इ०

(सहीची निशाणी) रामा वल्लद रामा कोलाम याचे हातची नांगरी रेघ

असें दस्तुर पद्माजी रघुनाथ.